४३


# शब्द रुची

जानेवारी २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६८











सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
"CENTRAL" TO YOU SINCE 1911
द्वारा प्रस्तुत
रिटेल धमाका
दिसम्बर 2017 माह के लिए विशेष ऑफर
सेन्ट होम लोन
सेन्ट शॉप
सेन्ट व्हीकल
सेन्ट मॉर्गेज
सेन्ट ट्रेड
सेन्ट रेंटल
सेन्ट स्वाभिमान प्लस
• शून्य प्रक्रिया प्रभार • ब्याज दर में कमी • पुनर्भुगतान अवधि में वृद्धि • त्वरित स्वीकृति प्रक्रिया • पीएमएवाई के अंतर्गत सबसिडी उपलब्ध
• आपकी दिन-प्रतिदिन की जरुरतों को पूरा करने वाला अभिनव उत्पाद अर्थात व्हीकल ऋण / आवास ऋण / सम्पति के समक्ष ऋण / ट्रेड ऋण / पर्सनल ऋण इत्यादि
आकर्षक शर्तों पर ऋण प्राप्त करें एवं इस अवधि के दौरान उपलब्ध लाभों का आनंद लें.
आपकी आकांक्षाएं... हमारी प्रतिबद्धता
www.centralbankofindia.co.in
हमें लाइक करें / Like us on: https://www.facebook.com/CentralBankofIndiaMumbai हमें फॉलो करें / Follow us on: https://twitter.com/centralbank_in

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**जानेवारी २०१८, वर्ष पाचवे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४३ ग्रंथाली

## अनुक्रम

**गौरव**
- शेतीनिष्ठ जीवनाचा प्रगल्भ आशय / ६
  **विजय चोरमारे**
- रुजणारी आणि उगवणारी लेखिका 'कृष्णा सोबती' / ८
  **डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**
- स्त्रीच्या आत्मसन्मानाचा संदेश देणाऱ्या कथा / १२
  **प्रा. आशालता कांबळे**
  - पुणे : एक अविस्मरणीय भेट / १५
    **डॉ. अनंत पांडुरंग लाभसेटवार**
  - भूषणावह भूषण.....! / १९
    **मेघना वर्तक**
  - सारस्वत बँकेचा शतकोत्सव / २६
    **प्रतिनिधी**

**'ग्रंथाली' २५ डिसेंबर वाचकदिन क्षणचित्रे** / ३१
- रामायणातील अनुल्लेखित कथा / ३९
  **धनंजय गांगल**

**'ग्रंथाली' वाचकदिन वृत्तांत**
- उत्तम साहित्याचा आस्वाद घडवणारी अभिवाचन स्पर्धा/४१
  **राजीव जोशी**
- आजचा वाचक काय वाचतोय?– वाचकस्पर्धा / ४२
  **प्रा. दीपा ठाणेकर**
- वाचकदिनाला लाभले अभिनव परिमाण! / ४३
- ब्लॉग... ब्लॉग... ब्लॉग... परिसंवाद / ४४
- पुस्तकप्रकाशनांची समृद्ध परंपरा! / ४६
- अभिजात कवितेचा 'अमृताचा वसा' / ४८
- ग्रंथपाल कार्यशाळा–परिसंवाद / ४९
  **चांगदेव काळे**

**पालक महासंमेलन वृत्तांत**
- मराठी अभ्यासकेंद्र आणि डी.एस्. हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठीप्रेमी पालक महासंमेलन' / ५२

**दिवाळी अंकातील लेखकांचे साहित्य संमेलन – वृत्तांत**
- असेही एक साहित्य संमेलन! / ५६

**पुरस्कार :** विजय शं. माळी, संदीप राऊत / ५८
  - ग्रंथपाने – **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ५९
  - ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ६३

## संपादकीय...

भिंतीवरचे कॅलेंडर बदलायचा दिवस येऊन ठेपला आणि २०१८ सुरूही झालं. वैयक्तिक स्तरावर नि सामाजिक स्तरावरही वर्षभराचा लेखाजोखा मांडायचा हा टप्पा! माध्यमांतून-वृत्तपत्रांतून वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रगती-पडझडीचा, ऱ्हासाचा-उभारणीचा, हरवल्या-गवसल्याचा, गमावल्या-कमावल्याचा, साठवण्या-निसटण्याचा ताळेबंद मांडला जातोय. वर्षभरात घडलेल्या विदारक घटना डोळ्यांसमोर येऊन उभ्या राहतात. प्रयत्न केला तरी त्या नजरेआड करता येत नाहीत. सामाजिक पातळीवर जे काही घडत असते, त्या साऱ्यात आपण ओढले जातोच. मूक प्रेक्षक बनून पाहत राहण्याच्या काळातही कोणालाच संवेदनशील माणसाला तटस्थ राहता येत नाही आणि कसलीच झळ स्वत:ला लावून न घेता आयुष्य घालवणारा माणूसही खरं तर भोवतालाच्या आगीच्या झळांमध्येच उभा असतो. आपली आपण पाठ थोपटत बसण्याच्या साथीचा पसरलेला रोग, आभासी 'लाईक्स' मिळाल्या नाहीत तर वाढत जाणारी अस्वस्थता, आपण जणू विकतच घेतलेले नवनवीन मानसिक आजार, डोक्यात साठत चाललेला सर्व प्रकारच्या फॉरवर्ड्सचा कचरा, सत्तेच्या राजकीय पटाची स्वार्थी समीकरणे, प्याद्यांप्रमाणे माणसांना वापरून घेण्याच्या वाढत्या प्रवृत्ती, अशा वातावरणात आपण जगतो आहोत. जगाचा अंत जवळ येत चालल्याची भाकिते अधिकाधिक ठळक होत जात आहेत तरी सभोवतालचा निसर्ग मात्र त्याची स्पंदने जिवंत ठेवण्याकरता झगडतो आहे.

संतोष पद्माकर पवार यांच्या 'भ्रमिष्टाचा जाहिरनामा' या दीर्घ कवितेतील ओळी इथे देते आहे.

*झाडं चालून आली नाहीत अजून नागरी वस्त्यांवर*
*अजून कुठे सोडली समुहांनी आपली जागा?*
*टेकड्या खाल्ल्या असतील घरांनी पण...*
*डोंगरदेवांनी कुठे धरला अजून हाती तीरकामठा*
*अजूनही आसऱ्याला मागताहेत वेलीफुलं जागा*
*त्यांनी कुठे केली अजून तीव्र आक्रमणाला सुरुवात?*
*अजूनही जमवून घेताहेत सारे जीव-जंतू-प्राणी*
*टाकताहेत एकेक पाऊल मागे*
*त्यांनी कुठे पुकारलाय अजून एल्गाराचा दणका?*

निसर्गातील विविध घटकांचं एकमेकांच्या अस्तित्वासाठी एकेक पाऊल मागे जाणं आणि माणसाने मात्र दुसऱ्यापेक्षा पुढे जाण्याच्या अटीतटीच्या रस्सीखेचीत एकमेकांचे पाय खेचणे! दोन वेगवेगळी टोकं आहेत ही! एका बाजूला व्हर्च्युअल जगात सतत एकमेकांशी कनेक्टेड असल्याच्या समाधानात जगणे नि दुसऱ्या बाजूला डोळ्यांत डोळे घालून संवाद करण्याचे टाळणे! एका बाजूला सतत माणसांच्या गर्दीत असणे आणि या गजबजाटात स्वत:चाही आवाज ऐकायला न धजावणे!

'सत्य असत्यासी मन केले ग्वाही' हा तुकारामांचं स्वर केव्हाच विरून गेला कारण 'सत्य-असत्यासी मन केले ग्वाही' असे म्हणायला धैर्य लागते. हे धैर्य हळूहळू आपण हरवत चाललो आहोत. घट्ट उभे राहावे अशी कोणतीच जमीन आपण धड धरून ठेवलेली नाही. ना भाषेची, ना मातीची, ना निष्ठांची, ना मूल्यांची, ना तत्त्वांची! लोंबकळणाऱ्या अवस्थेत जगत असलेल्या समाजाचा शक्तिपात आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत आणि त्याच वेळी त्या समाजाचा आपणही एक हिस्सा आहोत. मुख्य म्हणजे या सर्वांचा विचार करणेही आपण थांबवून टाकले आहे. कोसळत गेलेल्या गावगाड्यापासून प्रदूषित धुराने धुमसत राहिलेल्या शहरांपर्यंत सगळेच आता सारखे होऊ लागले आहे वेगाने! हा वेग इतका प्रचंड आहे की केदारनाथ सिंह म्हणतात तसे,

''समयही कुछ ऐसा है कि पानी नदीमें हो
या किसीके चेहरे पर...
झाँककर देखो तो तलमें कचराही दिखेगा...

या काळात स्वच्छ-नितळ-पारदर्शी काही राहिलेलेच नाही. माणसाने समाजाच्या वाटचालीकरता उभ्या केलेल्या संस्था-व्यवस्था, साहित्यिक-सांस्कृतिक आदान-प्रदान, कलाजाणिवांशी निगडित घटिते, उमलती मने घडवणारे शिक्षणासारखे क्षेत्र सगळेच गढूळत चालले आहे. हा गढूळपणा आता इतका सरावाचा होऊ लागला आहे की तकलादू काय आणि अस्सल काय यांच्यातला फरकही कळेनासा झाला आहे. अशा गढुळलेल्या जीवनशैलीत सर्वात मोठा धोका ज्या गोष्टीला निर्माण झाला, ती गोष्ट म्हणजे

मानवी नातेसंबंध! मानवी नात्यांमधला हरवत चाललेला नितळपणा ही आजच्या काळातील सर्वात मोठी पडझड आहे. जगण्याच्या ओघात आपल्याला आसपासच्या प्रत्येकच गोष्टीकडे अविश्वासाने पाहण्याची इतकी सवय झालीय की एकमेकांमधल्या नात्यांवरही विश्वास ठेवायला आपण धजावत नाही मग दुसऱ्याच्या प्रत्येक कृतीकडे आपण संशयाने पाहू लागतो, त्यात कुठलातरी डाव रचल्याचा वास येऊ लागतो. माणसातल्या माणूसपणावरचा प्रगाढ विश्वास गमावणे यापेक्षा क्लेशकारक काही असूच शकत नाही. हा सखोल विश्वासही पैशाने विकत घेणं शक्य नसलेली एकमेव गोष्ट आहे आणि पैशाने परत न करता येण्याजोगीही तीच एकमेव गोष्ट आहे.

मानवी नात्याला म्हणूनच व्यवहाराचे नाव देता येत नाही कारण एखाद्या व्यवहारात माणूस काही गमावतो तेव्हा तो रिकामा होतो आणि एखाद्या नात्यात तो खूप काही गमावूनही ओतप्रोत भरलेला राहतो. कोणतेच नाते सूक्ष्मदर्शकाखाली ठेवून एकाच फूटपट्टीने तपासता येत नाही कारण काळाच्या टप्प्यावर प्रत्येक नाते नव्याने जन्माला येते म्हणून ते समजून घेण्याकरता सत्त्व आणि स्वत्व दोन्ही पणाला लागते. नात्याच्या तुटलेपणाकरता चौकशी आयोग नेमता येत नाही. नाते एकमेकांना जखडून ठेवत मुक्तपणाने जगण्याचा अवकाश देते आणि मुक्तपणे जगण्याचं स्वातंत्र्य देताना नकळत दृढपणे जोडूनही ठेवते. माणसांना जोडून ठेवणारे असे 'मैत्र जीवांचे' विस्तारत जावो ही मनापासून शुभेच्छा!

**– डॉ. वीणा सानेकर**
सी–१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई–४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

ग्रंथाली

**अपरांतातील प्राचीन बोलीभाषा**

# वडवाळी शब्दकोश

**अशोक परशुराम सावे**

**संपादन – डॉ. अनंत देशमुख, चांगदेव काळे**



**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ४०० रुपये**

'माझ्या पंधरा वर्षांच्या इतिहास संशोधनाच्या कार्यात मला असे जाणवले की, महाराष्ट्रातल्या बोलीभाषांमध्ये जुन्या संत वाङ्मयाचे शब्द येतात. परंतु नागरिकीकरणामुळे ते लुप्त झाले आहेत. ह्याच कारणासाठी मी शब्दकोश लिहिण्याची संकल्पना आखली. अपरांतकातील 'वाडवळी' मराठी भाषेच्या जुन्या शब्दांच्या संदर्भातून ठाणे जिल्हा (पश्चिम) विभागाच्या इतिहास आणि संस्कृतीचा संग्रह मी तुम्हाला अर्पण करतो आहे. हा उपक्रम वाडवळ समाजाच्या भाषा संवर्धनाशी संबंधित आहे. अपरांताच्या जुन्या मराठीच्या अपूर्वाईचा आणि शब्दसामर्थ्याचा एक उत्तुंग ठेवा आहे...'

**– अशोक सावे**

# शेतीनिष्ठ जीवनाचा प्रगल्भ आशय

**विजय चोरमारे**

**ब**ळीवंत आम्ही भुईचेच दास/मातीचाच वास आंगोपांगी' अशी स्वतःची ओळख मिरवत आलेल्या श्रीकांत देशमुख यांचे मूळ गाव बुलडाणा जिल्ह्यातले राहेरी. खेड्यातल्या शेतकरी कुटुंबातल्या कुणाही मुलाच्या वाट्याला जे अभावग्रस्त जगणे येते, ते त्यांच्याही वाट्याला आले. शाळेत हुशार असल्यामुळे शिक्षकांनी प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या शेतकरी वडिलांनीही कष्ट उपसून पुढे शिकवले. आपल्या शिकण्यासाठी धडपडणाऱ्या या माणसांप्रती कृतज्ञ जाणीव ठेवून श्रीकांत देशमुख यांनीही शिक्षणासाठी अपार कष्ट घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, तिथले प्राध्यापक आणि मित्रांच्या सहवासात त्यांची कविता फुलत गेली आणि भूमिकाही बनत गेली. आस्थेच्या केंद्रस्थानी शेती असल्यामुळं शेतकरी संघटनेशी जोडून घेऊन काम केले. नांदेडला महाविद्यालयात अध्यापक म्हणून नोकरीला सुरुवात केली, काही काळाने एमपीएससीच्या माध्यमातून सहकार खात्यात अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.

'बळीवंत' आणि 'आषाढमाती' या दोन कवितासंग्रहांनंतर त्यांचा 'बोलावें ते आम्ही' हा संग्रह आला, नोव्हेंबर २०१३ मध्ये. तीन कवितासंग्रहांबरोबरच 'महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ', 'कुळवाडी भूषण शिवराय' हे वैचारिक ग्रंथ, 'पडझड वाऱ्याच्या भिंती' हा ललितलेख संग्रह, 'समकालीन साहित्यचर्चा', 'भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य' आणि 'महानोरांची कविता' ही संपादने अशी ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे.




**श्रीकांत देशमुख यांच्या 'बोलावें ते आम्ही' या कवितासंग्रहाला यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी' या संग्रहाला मिळालेल्या पुरस्कारानंतर कवितेसाठी मिळालेला हा पुरस्कार आहे. त्याच्याही आधी ना. धों. महानोर यांच्या 'पानझड' संग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. हे इथे मुद्दाम नमूद करण्याजोगती बाब म्हणजे श्रीकांत देशमुख हे नव्या पिढीतले कवी आहेत. साहित्य अकादमी पुरस्काराने नव्या कवितेकडे मोर्चा वळवला आहे, याचे हे निदर्शक मानावे लागेल.**

**बोलावें ते आम्ही**

ग्रंथालीने प्रकाशित केलेला हा संग्रह मजबूत १५३ पृष्ठांचा असून त्यात एकूण ६८ कविता आहेत. काही कविता दीर्घ स्वरुपाच्या आहेत, हे यावरून लक्षात येऊ शकते. कवीनेच सुरुवातीला संग्रहातील कवितांचे पाच विभाग केले आहेत. १) भूमी सावरण्याची गोष्ट, २) एका गावाची गोष्ट, ३) उजळमाथ्यानं भूमीपुत्र, ४) उजेडाचे मोर आणि ५) नेणतं झाड, असे हे पाच विभाग आहेत. ढोबळमानाने काही समान सूत्र असलेल्या कवितांचा विभाग केला जातो. ते सूत्र कवीच्या मनातले असते. त्यामुळे वाचकांची सोय होते किंवा नाही याबद्दल निश्चित काही म्हणता येणार नाही, परंतु कवीला तसे वाटत असावे. नाहीतर पहिल्या पानापासून दीडशे पानापर्यंत सलग वाचत नेण्यामध्ये वाचकाची दमछाक होऊ शकते. स्वतंत्र विभाग केल्यामुळे वाचकांची अशी दमछाक टाळता येऊ शकते. कविता हा थांबत थांबत वाचण्याचा साहित्यप्रकार आहे. त्यादृष्टीनेही विचार केला असावा. असे असले तरी श्रीकांत देशमुख यांच्या एकूण कवितेचे एक सूत्र आहे, आणि पहिल्या संग्रहापासून त्यांनी हे सूत्र टिकवून ठेवले आहे. कृषिजीवनामध्ये, खेड्यामध्ये होणारी स्थित्यंतरे आणि त्यात तिथल्या माणसांची होणारी होलपट आणि होरपळ हेच त्यांच्या एकूण कवितेचे सूत्र आहे. जे या संग्रहातही कायम आहे.

तो  
बोलत नाही युगांतराबद्दल  
सांगतो  
फक्त नांगराच्या फाळाची गोष्ट

या ओळींपासून कवितासंग्रह सुरू होतो. त्याअर्थाने पाहिले तर या ओळींतून एकूण संग्रहाच्या आशयासंदर्भातले विधान करण्यात आले आहे. कारण नांगराच्या फाळाच्या गोष्टीमध्येच कृषिसंस्कृतीतल्या तमाम सगळ्या उलथापालथी समाविष्ट होतात.

२०१३ साली प्रसिद्ध झालेला हा कवितासंग्रह आहे, याचा अर्थ साधारणपणे जागतिकीकरणानंतरच्या दहा वर्षांनंतरची म्हणजेच जागतिकीकरणाचा प्रभाव स्पष्ट झाल्यानंतरची ही कविता आहे. जागतिकीकरणाने माणसांच्या व्यक्तिगत जगण्यावर परिणाम केले, कवीच्या व्यक्तिगत आयुष्यात खूप काही घडत असताना बाहेरही ब-याच उलथापालथी होत होत्या. त्याच्या परिमामातून शेती आणि शेतकरी उद्ध्वस्त होण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. सामाजिक पातळीवरही बऱ्याच उलथापालथी होत होत्या. कुणाही संवेदनशील लेखक-कवीसाठी हे आव्हान होते आणि श्रीकांत देशमुख यांनी हे आव्हान स्वीकारले. त्याचाच प्रगल्भ अविष्कार 'बोलावे ते आम्ही'म धून दिसून येतो. शेतीनिष्ठ जीवनाचा आशय प्रगल्भतेने त्यातून व्यक्त झाला. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी पारंपरिक कविता भाबड्या वर्णनात्मकतेत अडकलेली दिसते. अलीकडच्या काळातील ज्या कवींनी ही मर्यादा ओलांडून सत्त्वशील कविता लिहिली त्यात श्रीकांत देशमुख यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. मागील पृष्ठावर केलेल्या विधानाप्रमाणे, बहुस्तरीय सांस्कृतिक परिवर्तनांना कधी प्रतिसाद देत, तर कधी प्रतिकार करीत भूमीत पाय घट्ट रोवून उभ्या असलेल्या भूमिनिष्ठांची गाथा म्हणजे या संग्रहातील कविता.

भौतिक सुखाचा मोह प्रत्येकाला असतो आणि ओढग्रस्तीत आयुष्य जगणारा शेतकरीही त्याला अपवाद ठरत नाही. त्यातूनही जुन्या खोडांनी परंपरेला घट्ट बिलगून राहून जे आपले आहे ते टिकवण्याचा प्रयत्न केला तरी नव्या पिढीला स्वप्नांकडे मोहाच्या सापळ्यात अडकण्यापासून रोखता येत नाही. पडझडीच्या काळात चिवटपणे तग धरून राहणारी कृषिसंस्कृती आणि आधुनिक जगण्याच्या मोहात पडलेली नवी पिढी या द्वंद्वामध्ये श्रीकांत देशमुख यांच्या कवितेची प्रेरणा आहे. शेतापासून माळापर्यंत आणि गावापासून मुंबईसारख्या महानगरापर्यंत सर्व थरातल्या जगण्याचा वेध ही कविता घेते. एखाद्या वाहनाचा किंवा अगदी माणसाचाही गावापासून शहरापर्यंतच्या प्रवासासारखा एकरेषीय असतो, तसा हा प्रवास नाही. हा प्रवास कवितेतला असल्यामुळे तो अनेक खाचखळग्यांचा आणि वळणावळणांचा आहे. या वळणांवरचे विभ्रम वाचकालाही कवितेसोबत प्रवास करायला भाग पाडतात.

काळाबरोबर जीवनपद्धती बदलत गेली. गावगाड्यातील व्यवहार बदलत गेले. शेतीमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार तो पिकवणाऱ्या शेतकऱ्याला राहिला नाही. कारखानदार आपल्या वस्तूचे मूल्य ठरवतो आणि ती वस्तू बाजारात आणून नफा कमावतो. सर्वांच्या श्रमाचे मूल्य देऊन कारखानदार स्वतःचाही फायदा करून घेतो. परंतु शेतक-याची परिस्थिती भिन्न असते. आपण पिकवलेला शेतीमाल कधी बाजारात न्यायचा, कुठल्या बाजारात न्यायचा, त्याची किंमत काय असेल यापैकी त्याच्या हाती काहीच नसते. त्यातूनच शेती आणि शेतकरी कंगाल बनत गेले. शेतकऱ्याचे हे दुखणे कवीला बोचत राहते. मग कधी कर्जवसुलीसाठी येणारी जप्ती टाळण्यासाठी सारा गाव घराला कुलुपे लावून शेतात जातो. अन्नदाता म्हणून फुकाचा गौरव केल्या जाणाऱ्या शेतकऱ्याला आपली व्यवस्था सतत या ना त्या कारणाने पळवत असते. शेतकऱ्याची ही जीवघेणी परवड कवितेतून ताकदीने व्यक्त होते.

कोणतेही मरण दुःखदायक असले तरी शेतकऱ्याच्या वाट्याला येणारे मरण अत्यंत वेदनादायक असते. कर्जासाठी गळफास लावून घेणारे शेतकरी रोज वृत्तपत्रांतून भेटतात. परंतु सालभर राबून पिकवलेला शेतमाल बाजारपेठेत नेताना टेंपो वळणावर उलटतो आणि मातीला श्वास देऊन त्यानं उबवलेल्या दाळदाण्याच्या थप्पीखाली शेतकऱ्याचा मृत्यू होतो. अशावेळीही उरावरचा धान्याचा गोळा दूर करायला भूमीला हात फुटत नाहीत, अशी कवितेतून व्यक्त होणारी वेदना काळजाला घरे पाडते.

कृषिजीवन म्हणजे केवळ शेती आणि शेतकरी नव्हे तर अवतीभवतीचे सगळे पर्यावरण त्यात येते, हे भान कवीला आहे. म्हणून मग त्याला पोटच्या पोरांसारखी वाढवलेली झाडं तोडताना तुकोबा आठवतो. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी वगैरे. माणूस वीतभर शेताच्या तुकड्यासाठी एकमेकांच्या जिवावर उठतो, आयुष्यभरासाठी वैर पत्करतो अशावेळी, आपले समजून विनातक्रार पानाफांद्यांवर पाखरांचे, किड्यामुंग्यांचे संसार सांभाळत वाढणारी झाडं कवीला आठवतात. उंदरा-कोल्ह्यानी हंगाम नष्ट करू नये म्हणून शेतकरी डोळ्यात तेल घालून पहारा करतो, पण त्याची पुढची पिढी मातीपासून दूर होत आहे, हे वास्तवही सूचकपणे व्यक्त होते.

पाण्याचा शोध घेताना कवी जमिनीच्या खूप खोल तळात जातो, परंतु केवळ पाण्याच्या नैसर्गिक स्रोतांपाशीच थांबत नाही, तर पाण्याच्या लढायांपासून राजकारणापर्यंत सगळ्यांना भिडतो. पाणी खूप आहे, खूप आहे पाणी भूमीच्या पोटात, भूमीच्या ओटीतही पाणी खूप आहे हे सांगता सांगता पाण्याचा शोध घेत कुराण, भगवद् गीतेपासून शेतकऱ्यांचा असूड, रिडल्स इन हिंदूइझमपर्यंत जातो. सरदार सरोवरापासून मेधा पाटकरांच्या डोळ्यापर्यंत पाण्याचा शोध घेतो. दहशतवादी हल्ल्यातील शहीदांच्या बातम्या वाचताना, शेती करणं म्हणजे शहीद होणं नाही का, आपल्या पिढ्या न् पिढ्या शेती करत शहीद झाल्या, आपल्याला कधीच कसं कोणी अभिवादन केलं नाही हा एका शेतकरी तरुणाचा प्रश्न अस्वस्थ करून सोडतो.

लोकसंचिततातले पूर्वसंस्कार पचवून, समकाळाला कवेत घेऊन आपल्या स्वत्वाची मांडणी करणारी ही कविता आपल्या संवेदनेच्या समग्र अवकाशाला हलवून टाकते. प्रसंगी सुटीसुटी वाटणारी ही कविता प्रदीर्घ अशा आख्यानाचे रूप घेते.

**– विजय चोरमारे**
भ्रमणध्वनी : ९५९४९९९४५६
vijaychormare@gmail.com

**बोलावें ते आम्ही**
**श्रीकांत देशमुख**
**ग्रंथाली**
**पृष्ठे १५३, किंमत १८० रुपये**
**सवलतीत रुपये ११० रुपये**

# रुजणारी आणि उगवणारी लेखिका

# 'कृष्णा सोबती'

## डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे



**साहित्य क्षेत्रात दिला जाणारा देशातील सर्वोच्च असा 'ज्ञानपीठ पुरस्कार' या वर्षी हिंदी भाषेतील श्रेष्ठ लेखिका कृष्णा सोबती यांना देण्यात आला. त्यांच्या लेखनाचा हा मर्मग्राही आलेख...**

कृष्णा सोबतींचा जन्म १८ फेब्रुवारी १९२५ रोजी चिनाब नदीकाठी वसलेल्या गुजरात या गावात झाला. हे गुजरात आता पाकिस्तानमध्ये आहे. त्याचे शिक्षण लाहोरला झाले. फाळणीनंतर त्या दिल्लीला आल्या. त्यांनी पंजाब, सिमला, दिल्ली, राजस्थान इत्यादी ठिकाणी अध्यापनाचे काम केले. त्यावेळी हिंदी साहित्यात कुर्रतुल एन हैदर, इस्मत चुगताई, अमृता प्रीतम यांसारख्या लेखिका लिहीत होत्या.

स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात कृष्णा सोबतीचं व्यक्तित्व मोकळ्या वातावरणात विकसित झालं. त्यामुळे त्याचं साहित्य फक्त आशयाच्या स्तरावरच नव्हे तर भाषा आणि रचनेच्या स्तरावर ही विकसित झालं. त्यांच्या साहित्यातील विशिष्ट संवेदना, भाषाशैली व गावातील वातावरणाचा अनुभव वाचकाला विचलित व रोमांचितही करतो. त्यांनी आपल्या साहित्यात सामाजिक संदर्भ तर मांडलेच परंतु माणसा-माणसांमधले संबंध आणि संवेदनेचं उत्कटपणे चित्रण केलं. त्यांनी आपल्या साहित्यात स्त्रियांना स्वातंत्र्य व न्याय मिळायला हवा याचं समर्थन केल आहे.

साहित्य लेखनाबद्दल त्याचं म्हणणं आहे की- ''लेखक फक्त आपली लढाई लढत नसतो, तसेच आपलं दु:ख, वेदना आणि आनंद व्यक्त करीत नसतो. लेखकाला रुजवावं-उगवावं लागतं, प्रत्येक ऋतू आणि कालखंडाशी भिडाव लागतं. जवळ येणाऱ्या आणि दूर जाणाऱ्या नात्यांशी आणि इतिहासातील निर्णय आणि निर्माण झालेल्या अंतराशी भिडाव लागतं.'' 'साहित्यसृजना'साठी लेखकाला नेहमीच भोवतालचं वातावरण, घटना, माणसं यांची मदत होते.

कृष्णा सोबती म्हणतात- माझ्या आजूबाजूच्या वातावरणाने माझं सृजन आणि भाषा निश्चित केली. जे मी पाहिलं, जे मी जगले तेच मी लिहिलं. मी नेहमीच असा प्रयत्न केला की माझी पात्रं सदैव माणुसकी आणि निसर्ग याच्या जवळ असतील. सत्यापासून दूर जाणार नाहीत.

कृष्णा सोबती इतिहास जगल्या आहेत. त्यांनी देशाच्या फाळणीचं दु:ख सहन केलं. देश स्वतंत्र होताना आणि राष्ट्राचे संविधान लिहिलं जात असताना त्यांनी बघितलं. तीन पिढ्यांच्या त्या साक्षीदार आहेत. जीवनातील हा बृहद् अनुभव त्यांच्या प्रत्येक कथा-कादंबरीत जाणवतो. त्यांचं लेखन काळाच्या पुढे आहे असं वाटतं. ज्यावेळी हिंदी साहित्य घर, संसार-कुटुंब, भांडण-तंटे आणि जीवनातील संतोष यामध्ये गुंतलं होतं, स्त्री मुक्तीचा विचार ही नव्हता.त्यावेळी त्यांनी 'मित्रो मरजानी'सारखी अमर कादंबरी लिहिण्याचं साहस केलं. त्यांच्या 'जिंदगीनामा', 'दिलोदानिश', 'मित्रो मरजानी', 'समयसरगम', 'यारों के यार', 'सूरजमुखी अंधेरे में' अशा प्रत्येक कृतीचा रंग वेगळा आहे. विशिष्ट आहे. कुठेही तोच तोचपणा नाही.

बी.बी.सी.च्या एका मुलाखतीत त्यांना विचारलं की- एक स्त्री असून आणि तुमच्यावर अश्लीलतेचा आरोप होईल हे ठाऊक असूनही 'यारों के यार' आणि 'मित्रो मरजानी'ची भाषा बोल्ड आहे. यावर तुम्ही काय सांगाल?

त्यावर त्यांनी उत्तर दिलं, भाषिक रचनेच्या दृष्टीने आपण जर फक्त बोल्डच्या दृष्टिकोनातून बघितलं तर लेखक आणि भाषा दोन्हीवर अन्याय होईल. भाषा लेखकाला आतून-बाहेरून समान करते. त्याची अंतर्दृष्टी आणि सामाजिक कोलाहल एका लयीत गुंफते. तिची रचना फक्त कोशातील भाषेच्या ताकदीवर होत नाही. जेव्हा लेखक आपल्या उद्देशानुसार त्याला रुपांतरित करतो तेव्हा काहीतरी नवीन निर्माण होतं. माझ्या प्रत्येक कृती बरोबर भाषा बदललली आहे. ती मी नाही, रचनेतील पात्रांचा भाषेवर प्रभाव










असतो. 'जिंदगीनामा'ची भाषा शेतकरी समाजातून आली आहे. 'दिलोदानिश'ची भाषा राजधानीच्या (दिल्ली) जुन्या शहराची, नव्या दिल्लीची नाही. त्यात उर्दूवर शहरी प्रभाव आहे. 'ए लडकी'च्या भाषेचा चेहरा वेगळाच आहे. आशय अधिक सूक्ष्मपणे व्यक्त करणारी भाषा आहे. 'मित्रो मरजानी'मध्ये अगदी वेगळी भाषाशैली आहे. ती बोल्ड नाही की असंबद्ध नाही, वाचताना ती नक्कीच वेगळी वाटते. स्वत: लेखकालाही ती चकित करते! ती लेखकाची नाही तर कादंबरीतील 'मित्रो'ची भेट आहे. 'यारो के यार'मध्ये अशा काही शब्दांचा उपयोग केला आहे जो काही लोकांना अश्लील वाटतो. ही कथा 'ऑफिस'मधील रोजची कामे-हालचाली आणि काम करणाऱ्या माणसांच्या आजूबाजूला घडत असते. ऑफिसच्या, फायलींच्या कामातील कंटाळवाणा तोच तोचपणा दूर करण्यासाठी काही पुरुषी शिव्या दुबळ्यांचा आक्रोश व्यक्त करतात. समाजात त्या कदाचित म्हणूनच निर्माण झाल्या असाव्यात.

त्यांना कोणी तरी विचारलं की, 'तुमच्या लेखनात फाळणीचं दुःख आणि धार्मिक दंगलींची खोल वेदना जाणवते.' त्यावर त्या म्हणाल्या, ''स्वातंत्र्य आणि फाळणीचा अगदी जवळून अनुभव घेतलेली माणसं एवढी वर्षं उलटली तरी अजूनही त्या दुःखद आठवणी विसरलेली नाहीत की फाळणीशी जोडलेलं देशाचं स्वातंत्र्यपर्व विसरली नाही. फाळणी विसरणं कठीण आहे आणि आठवत राहाणं धोकादायक आहे. त्यावेळचा तिरस्कार, खून-मारामाऱ्या काही नको. आपल्या मूल्यांसोबत आपल्याला जगायचं आहे ही जाणीव मनात होती. मी १९४८-४९ मध्ये 'सिक्का बदल गया' ही कथा लिहिली. थोड्या दिवसांपूर्वी ही कथा मी वाचली तेव्हा मला आश्चर्य वाटलं. त्यावेळच्या भयंकर तणावपूर्ण स्थितीत मी एवढ्या थंडपणे ही कथा कशी लिहू शकले? ही त्या दुःखातून सावरायची तयारी होती का? दुःख शोक आता खूप झाला. आता जगण्यासाठी संघर्ष ही अट आहे. परंतु कोणीही नागरिक वैयक्तिक जखमा विसरू शकला नाही.''

'सिक्का बदल गया' कथेत स्वातंत्र्य मिळाल्यावरच्या आणि फाळणी झाल्यावरच्या विदारक स्थितीचं तसेच सत्तापरिवर्तनानंतर झालेल्या बदलामध्ये अनेक वर्षं एकमेकांबरोबर राहिलेल्या लोकांच्या मनातील बदल रेखांकित केला आहे.ही कथा त्यांच्या आजीचा अनुभव आहे. कथेतली म्हातारी शाहनी एकटी आहे. खूप मोठी हवेली आहे. भरपूर शेत जमीन आहे. गावातील सगळ्यांचं ती प्रेमाने करते. तिलाही हिंदू-मुस्लिम सगळेच मदत करतात परंतु आज तिला कोणी मदत करू शकत नाही. मुलासारखी माया केलेल्या शेरेने मित्रांच्या सांगण्यावरून तिला मारायचं ठरविलं होतं परंतु ती समोर आल्यावर तो वरमला.त्याला वाटलं हिचा काय अपराध? हिंदुस्थानात जायला निघालेल्या स्वाभिमानी शाहनीने सगळ्यांनी पुन्हा पुन्हा सांगूनही हवेलीतील चीजवस्तू, पैसे काहीच बरोबर घेतलं नाही. उलट म्हणाली, ''ते सगळं तुम्हाला आहे.'' शेवटी डोळे पुसून इस्माईल पुढे आला व म्हणाला, ''काही तरी सांगून जा. तुझा आशीर्वाद खोटा ठरणार नाही. तिनेही हुंदका दाबून म्हटलं- 'रब्ब तुहानू सलामत रखे बच्चा, खुशिया बक्शे....' शेवटी शेरे पुढे आला, तिच्या पायाला हात लावून म्हणाला, ''शाहनी कोई कुछ नही कर सका। राज भी पलट गया।'' त्याच्या डोक्यावर थरथरणारा हात ठेवून ती म्हणाली, ''तैनू भाग जगण चन्ना।'' (तुझं नशीब जागो.)

तिला आठवत होतं, ''वक्त ही ऐसा है, राज पलट गया है, सिक्का बदल गया है...'' कॅम्पमध्ये पोचल्यावर जमिनीवर पडल्या-पडल्या दुःखी मनाने तिने विचार केला, ''राज पलट गया है -सिक्का क्या बदलेगा? वह तो मै वहा छोड आयी।''

ही कथा म्हणजे फाळणीचा काळ जिवंत करणारं एक शब्दचित्र आहे.यामध्ये कृष्णाजी, इस्माईल आणि शेरेमधील माणूसपण शोधण्याचा प्रयत्न करतात. शाहनीची नदी, हिरवीगार शेतं, माणसं सगळं जिथल्या तिथे राहिलं. यानंतर नुकतीच २०१६मध्ये प्रकाशित झालेली आत्मकथनासारखी कादंबरी 'गुजरात-पाकिस्तानसे गुजरात हिंदुस्तान'मध्येही या आठवणी पुन्हा येतात, कधीही न पुसल्या जाणाऱ्या...!

'ए, लडकी' ही अशीच एक दीर्घकथा. ज्यामध्ये नाट्य आहे, काव्य आहे.आयुष्यातील सगळे रंग, गंध एक-एक करीत गुंफले आहेत. म्हणूनच मृत्यू समोर ठाकलेला असताना, ही कथा मृत्यूच्या भयाबद्दल नव्हे तर त्याच्याशी लढण्याची-जिंकण्याची आणि त्याच्या निषेधाची कथा बनते. आयुष्यात मुक्ती आणि निष्काम कर्मयोगाला महत्त्व देत ही स्त्री पुन्हा-पुन्हा सांगते- 'जगणं आणि आयुष्य म्हणजे प्रतारणा नव्हे.उलट या दुनियेतून निघून जाणे म्हणजे फसवणूक आहे. हे जग खूप सुंदर आहे. वारा, उन, ढग, पाऊस, अंधार, प्रकाश सारच सुंदर आहे. या मृत्यू लोकातील सगळा खेळ अदभुत आहे. शरीर तर एक वस्त्र आहे, धारण केलं आणि या लोकात आलो, अंगावरून उतरवल्यावर परलोकात!' अशी ही स्त्री, जीवनातील आठवणींचा आनंद, सुख अतिशय आसुसलेपणाने भोगते.

संवादातून रचलेली ही कथा माय लेकीची आहे. म्हाताऱ्या स्त्रीचा स्वतःशीच एकालापही आहे. अनेक गोष्टी आठवणीच्या रूपांत मुलीला सांगते आहे. एकटी रहाणाऱ्या मुलीची तिला चिंता आहे. ती मुलीला विचारते, ''तुझ्या या एकटीच्या जगण्यात तू काय सिद्ध करणार? एकमेकांबरोबर राहताना, जगताना काहीतरी शिल्लक राहातं, काही वाहून जातं, एकटं असल्यावर काहीच शिल्लक रहात नाही की वाहूनही जात नाही. गरज पडली तर कोणाला हाक मारशील?''

मुलगी म्हणाली, ''मी कोणाला हाक मारणार नाही. जो मला हाक मारील त्याला उत्तर देईन. अम्मू आता झालं समाधान?'' या बिंदूभोवतीच ही कथा रचली गेली आहे.

इथे मोह, मृत्यू आणि जीवनाच्या व्याख्येचा शोध आहे. स्त्री-पुरुष संबंध, नाती, स्त्रीचं कुटुंबातील स्थान, पैतृकसंपत्तीवरील हक्क, स्वातंत्र्य आणि बंधनं अशा स्त्रीजीवनाशी निगडित मुद्यांवर चर्चा आहे. अतिशय जिवंत भाषेत लिहिलेल्या या कथेत फक्त स्वत:ची जागरूकता नव्हे तर सामाजिक जागरुकता आणि विकासही रेखांकित होतो. इथे आठवणींना इतिहास नव्हे एक चांगली कथा रचण्याची जिद्द आहे. हेच या कथेचं वेगळेपण.

कृष्णा सोबतींची समय 'सरगम' ही एखादी कविता वाटावी इतकी अप्रतिम, संवेदनशील कादंबरी आहे. १९९१ मध्ये या कादंबरीला 'बिर्ला फाउंडेशनचा सन्माननीय व्यास' पुरस्कार मिळाला. या कादंबरीत (स्त्री आणि पुरुष) वृद्धांच्या एकाकी जीवनातील मैत्री आणि समस्यांचं निराकरण खूप संवेदनशीलतेने साकारलं आहे. जीवनातील चांगल्या- वाईट स्थिती, त्याच्याशी दिलेली टक्कर, झालेला त्रास, हे सगळं सहन करण्याची हिंमत एकमेकांच्या साथीने मिळते. हेच रंग आपल्या आयुष्याचा भाग असतात. यामुळे जगणं सुंदर होतं. यातूनच जीवनातली उन-सावली अर्थपूर्ण होते. जगण्यातली 'सरगम' शोधून ते सुंदर करायला शिकवणारी अशी रचना आहे.

लेखनाला जगण्याचा पर्याय मानणाऱ्या कृष्णा सोबतींची जिंदगीनामा ही कादंबरी खरोखरच जगण्याचा पर्याय आहे. अठराव्या-एकोणिसाव्या शतकात पंजाबमध्ये प्रचलित असलेल्या दंतकथा आणि परंपरांचं वर्णन इथे आढळत. तसेच पंजाबी लोकगीतांचा उपयोगही आहे. यामध्ये नायक नाही की खलनायक नाही, फक्त माणसं आणि माणसं! आनंदी, वीर-पराक्रमी. जी अनेक वर्षे परधर्मी, पराक्रमी सैन्याशी लढत राहिली. तरीही (पिके) धान्य पिकवत राहिली. जगण्याच्या रसपूर्ण आशेवर आयुष्य उधळीत राहिली. जिंदगिनामा मध्ये आशय आणि रचना वेगळीच आहे. इथे आपल्याला शेताच्या बांधावर एकाच वेळी बादशाह आणि फकीर, दरवेशी आणि शेतकरी उभे असलेले दिसतील. तसेच सर्वसामान्यांची गर्दीसुद्धा नेहमी प्रत्येक गावात, प्रत्येक पिढीला सुरक्षिततेचा विश्वास देताना दिसेल.

सन २०१५ मध्ये वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी देशातील असहिष्णुते विरुद्ध आवाज उठविला, धार्मिक कट्टरता आणि हिंसाचाराचा विरोध करून त्यांनी साहित्य अकादमीकडून मिळालेले पुरस्कार परत केले. यामधून त्यांची सामाजिक जागरुकता आणि मूल्यांचे भान समजून येतं. म्हणूनच कृष्णा सोबती फक्त नाव नाही तर एक ओळख आहे. मागील पन्नास वर्षात त्यांनी अनेक कथा कादंबऱ्यांच्या माध्यमातून आणि विचारातून हिंदी साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्याचं म्हणणं आहे की धर्मग्रंथ आणि साहित्यिक कृती यात अंतर आहे. ते दोन्ही एकत्र जोडून विचार करू नये कारण साहित्य आणि कलेचे आपले नियम व शिस्त असते. त्यावर श्लील-अश्लील असे प्रश्न उठवू नयेत.

सन २०१० मध्ये त्यांना सरकारकडून पद्मभूषणसाठी विचारलं, तेव्हा त्यांनी ते नाकारलं आणि सांगितलं की, 'मला व्यवस्थेपासून दूर राहायचं आहे.' अशा प्रकारे स्वतंत्र आणि थेट विचार करणाऱ्या कृष्णा सोबतींचा वयाच्या ९२व्या वर्षी 'ज्ञानपीठ पुरस्कारा'ने यथोचित सन्मान झाला आहे.

**- डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**
भ्रमणध्वनी : ९८२०००९८५९
vasudhavs@yahoo.co.in




मेहता पब्लिशिंग हाऊस
अकबर बिरबल मालिका
(१४ पुस्तके)
मंजूषा आमडेकर
गंमत कोडी
गंमत कोडी
(भाग १ ते ५)
घनश्याम देशमुख
चरित्र मालिका
(२१ पुस्तके)
रा.वा.शेवडे गुरुजी
गोष्टी अशा सुरस
वाचनासाठी
लागेल चुरस...
समादचा वाळवंटातील व
रानातील फेरफटका
•
शिकारी बनला शिकार
मोहम्मद उमर
अनुवाद - लीना सोहोनी
मेहता पब्लिशिंग हाऊस
www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse
WhatsApp us on
9420594665
700 Marathi books
Available as e-Book
E-book available : play.google.com/store/books
m.dailyhunt.in/Ebooks/marathi and www.amazon.in

# निर्भया लढते आहे...

# स्त्रीच्या आत्मसन्मानाचा संदेश देणाऱ्या कथा

**प्रा. आशालता कांबळे**

**'ब**लात्कार' हा शब्द जरी उच्चारला तरी सर्वसासामान्यांचा थरकाप उडतो, मग प्रत्यक्ष ज्या बाईने बलात्काराचा अत्याचार सोसलाय, त्या बाईला, त्या कुटुंबाला केवढ्या दिव्यातून जावं लागत असेल? नीलम माणगावे यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेला 'निर्भया लढते आहे' हा कथासंग्रह वाचकांना जणू हे जिवंत अनुभव देण्याचं चोख काम बजावतो. लेखिकेने मनोगतातच म्हटलंय, ''खरं तर या कथा लिहिताना आनंद नव्हता झाला. झाल्या त्या वेदनाच! एक मूक बधिरता व्यापून राहिली होती. अशा कथा कुणाला कधीच लिहाव्या लागू नयेत, अशी समाजव्यवस्था निर्माण व्हायला हवी.''




**'ग्रंथाली' प्रकाशित केलेल्या नीलम माणगावे यांच्या 'निर्भया लढते आहे' या कथासंग्रहास लघुकथा या वाङ्मयप्रकारासाठी दिवाकर कृष्ण पुरस्कार २०१६ घोषित झाला. अंतर्मुख करणाऱ्या या कथासंग्रहाचे पैलू उलगडणारा हा लेख...**

लेखिकेने या कथा लिहून समाजापुढे खूप सारे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. भावनिक पातळीवरच या घटनांचा विचार न करता सामाजिक, मानसशास्त्रीय पातळीवर विचार करून समाजाचं वास्तव उघडं पाडलेलं आहे. निर्भया बलात्कार घटनेनंतर या विषयावर सारा देश ढवळून निघाला. त्याआधी खैरलांजीमधील प्रियंका आणि सुरेखा भोतमांगे या मायलेकींवर उभ्या गावाच्या साक्षीने बलात्कार झाला होता. नंतर त्यांच्या देहाची विटंबना करून त्यांची निर्घृणपणे हत्याही केली होती. समूहाच्या विकृत मानसिकतेचा हा पुरावा होता. जातव्यवस्थेची उतरंड आणि राजकीय लागेबांधे यांचाही त्यात समावेश होता. अगदी अलीकडचं कोपर्डी बलात्कार प्रकरणही भयानक निर्दयीपणे केलं गेलेलं. संपूर्ण भारतात अशा कितीतरी घटना रोज घडताहेत. साऱ्याच घटना उजेडात येत नाहीत आणि काही उजेडात आल्याच तरी त्यातील किती प्रकरणात उचित न्यायनिवाडा होतो हेही माहीत नाही. गुन्हा करणाऱ्याचे राजकीय वजन आणि जातीच्या उतरंडीतील त्याचं वरचं स्थान या दोन गोष्टींचा प्रामुख्याने न्यायनिवाड्यावर परिणाम होतो ही वस्तुस्थिती आहे.

लेखिका नीलम माणगावे यांनी या कथासंग्रहात अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकलेला आहे. तटस्थपणाने साऱ्या घटनांचा विचार करून कथांची रचना केलेली आहे आणि यामागचं स्वत:चं एक उद्दिष्टही लख्खपणाने वाचकांच्या समोर ठेवलेलं आहे. यासंदर्भात लेखिकेचं भाष्य लक्षात घेण्यासारखं आहे. लेखिका म्हणते, ''काही वर्षांपूर्वी माझ्या घराच्या जवळच्या शाळेत शिकणाऱ्या एका नववीच्या मुलीवर पी.टी.च्या शिक्षकाने आपल्या मित्रांसोबत बलात्कार केला, तेव्हा मी हादरले. माझं छोटंसं गाव हादरलं. विविध संघटनांनी मोर्चे काढले. शाळेची तोडफोड केली. अनेक राजकीय पक्षांनी आपापल्या परीने त्यात हस्तक्षेप केला. पंधरा दिवस गाव ढवळून निघालं. शेवटी निष्पन्न काय झालं?... तर 'ती मुलगीच तसली होती' आणि माझ्यातली लेखिका, एक स्त्री म्हणून विचार करू लागली. बलात्कारासंबंधी अधिक माहिती मिळवण्यासाठी अनेक लोकांशी चर्चा करू लागली. अशा घटनांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहू लागली.''

'निर्भया लढते आहे'मध्ये वेगवेगळ्या दृष्टिकोनातून 'बलात्कार' या घटनेचा वेध घेणाऱ्या किंवा त्याचं विश्लेषण करणाऱ्या अशा एकूण दहा कथा आहेत. प्रत्येक कथेतील सामाजिक परिस्थिती वेगळी, घटनेचे परिणाम वेगळे, वातावरण वेगळं, घटनेला सामोरे जाण्याची प्रत्येकीची रीत वेगळी अशा विविध सामाजिक आणि मानसिक स्तरांवरील या सर्व कथा विखुरलेल्या आहेत. पण तरीही त्यात एक समान सूत्र आहे ते म्हणजे, 'बलात्कार करणाऱ्याला शिक्षा होणं जेवढं गरजेचं आहे त्याहीपेक्षा जास्त पीडित स्त्रीने पुन्हा उभं राहण्यासाठी, नव्यानं जगण्यासाठी समाजाने तिला अवकाश

निर्माण करून देणं. तिचं पुनवर्सन करणं आणि बलात्काराला एखाद्या अपघातापेक्षा जास्त महत्त्व न देणं.'

'उत्तर आहे?' ही पहिलीच कथा बाई 'घरातसुद्धा सुरक्षित नाही' या सत्यावर प्रकाश टाकते. सासऱ्याने सुनेवर बलात्कार केला आणि मुलगा तो गुन्हा स्वत:वर घेऊन घर सोडून जातो. जाताना वडिलांना आणि वहिनीलाही शपथ घालून जातो की, 'सत्य कुणाला सांगू नका.' दोघांनीही ती शपथ पाळली. एकाने निर्लज्जपणाने तर दुसरीने असहाय्यतेने! तब्बल दहा वर्षानंतर कुटुंबाला हे सत्य समजतं तेव्हा दुसरंही एक सत्य समजतं की बलात्कार करणाऱ्याच्या बायकोला म्हणजे आजीला चाळीस वर्षांची असल्यापासून एका स्वामीने ब्रह्मचर्याचं व्रत दिलं होतं. म्हणजे तेव्हापासून दोघांच्याही लैंगिक इच्छा मारल्या गेल्या होत्या, पण बाई म्हणून संयमाच्या नावाखाली मन मारणं तिला जमलं होतं. आजोबांना मात्र ते जमलं नव्हतं. त्यांनी संधी मिळताच चक्क आपल्या सुनेवरच बलात्कार करून स्वत:ची लैंगिक इच्छा भागवून घेतली होती. लेखिका विचारते, ''पुरुष म्हणून मन मारणं-संयम ठेवणं त्यांना कुणी शिकवलंच नाही. हेच जर उलटं झालं असतं तर? आजीने काय केलं असतं? एखाद्या बाईनं काय केलं असतं?''

लेखिकेने या कथेत अध्यात्म, संस्कार यात होणारी माणसाची घुसमट आणि हतबलता यावर जळजळीत प्रकाश टाकला आहे.

'प्रेम म्हणजे नेमकं काय' या कथेत वेगळंच चित्र आहे. समजूतदार, सुसंस्कृत जोडपं. सहजीवनात एकमेकांशी अत्यंत प्रामाणिक असणारं, पारदर्शी जीवन जगणारं. कथेतील 'वसू' उच्चविद्याविभूषित आहे. आपल्या नवऱ्याशी म्हणजे आदित्यशी तिचे अतिशय उच्च पातळीवरील निरोगी नातं आहे. या कथेतील पुरुष एक आदित्य आणि दुसरा पुरुष म्हणजे वसूचा आधीचा प्रियकर हे दोघेही खूप सुसंस्कृत आहेत. प्रकाश हा वसूचा आधीचा प्रियकर. ती उटीला एकटीच सेमिनारला जाते तेव्हा अचानक भेटतो. तिच्या रूमवर तिला सोडायला येतो तेव्हा एकरूपतेची मागणी करतो, जशी वसूच्या लग्नाआधी शेवटच्या भेटीत त्याने केलेली असते. वसू मात्र निग्रहाने स्वत:वर ताबा ठेवते. दोन्ही वेळी. यावेळी तर त्याला म्हणते, ''जोडीदाराला सांगायला लाज वाटावी किंवा त्याच्यापासून काही लपवावं लागावं असं काही वागायला नकोय. आपलं प्रेम होतं, आहे आणि राहील.'' स्त्रीच्या नकाराचा मान राखणारा हा पुरुष या कथेत वाचकाला भेटतो तसाच बायकोवर बलात्कार झाल्याचं कळताच ''आपण हा एक अपघात म्हणून, वाईट घटना म्हणून या गोष्टीकडे पाहूया'' असं म्हणत तिला सावरणारा निरोगी मनाचा पुरुषही भेटतो. लेखिकेने या कथेत खूपच वरच्या पातळीवरील मनोविश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केलाय. जसे- उटीला वसूवर तीन अनोळखी लोकांनी बलात्कार केला आणि त्यातून तिला गर्भ राहिला. तिच्या पतीने- आदित्यने एका क्षणी अपरिहार्यतेतून ही परिस्थिती स्वीकारली. दहा वर्षांत आपल्यापासून तिला गर्भ राहिला नाही आणि आता अपघाताने तो कुणाकडून तरी राहिलाय. इतरांना कुणालाच हे माहीत नाहीय. आपण ते आपलं मूल मानायचं इथपर्यंत त्याची मन:स्थिती ठीक आहे, पण जेव्हा त्याच्या मनात विचार चमकतो की जर हा गर्भ तिच्या आधीच्या प्रियकरापासून राहिला असता तर? आपण स्वीकारला असता का तो? पुरुषी अहंकार, स्त्रीवरचा मालकी हक्क अशा खूप साऱ्या मानवी पैलूंवर ही कथा प्रकाश टाकते.

'बाकी शून्य' आणि 'भर दुपारी बारा' या दोन कथा एकाच समस्येवर आधारित पण परिस्थिती वेगवेगळी आणि सामाजिक स्तर वेगवेगळे आहेत. जसे- 'बाकी शून्य'मधील नायिका 'जै' लग्न झाल्याझाल्याच फसवणुकीच्या आघातामुळे नवऱ्याला सोडून माहेरी आलीय. तिला पुरुषाचा स्पर्श माहीतच नाही. पोट दुखतं म्हणून डॉक्टरकडे तपासायला गेलेलं असताना झालेला पुरुषाचा स्पर्श तिच्यासाठी पहिला ठरतो आणि तो तिला हवाहवासा वाटतो. नकळत ती त्या शरीरसुखात गुरफटते. त्यासाठी डॉक्टर बदलते. एक डॉक्टर तिच्या या अगतिकतेचा फायदा घेतो. तिच्याशी वारंवार शरीरसंबंध ठेवतो आणि एक दिवस मित्रांनाही बलात्कार करायला तिला उपलब्ध करून देतो. ती चिडते, मी पुन्हा येणार नाही म्हणते तेव्हा व्हिडिओ क्लीप प्रसारित करण्याची धमकी देतो. 'भर दुपारी बारा'मध्ये सुद्धा अशीच व्हिडिओ क्लीप प्रसारित करण्याची धमकी देऊन शिल्पा या आधुनिक विचारांच्या सुशिक्षित तरुणीला तिचा प्रियकर संकटात टाकतो. 'जै' अशिक्षित, तिचं कुटुंब अशिक्षित तर 'शिल्पा' सुशिक्षित. स्वत:च्या बऱ्या-वाईटाची जाण असणारी पण तरीही नैसर्गिक भावनांनी दोघींना समान पातळीवर आणलंय आणि त्यांना फसवणारे दोन्ही पुरुष 'पुरुषी विकृती' या समान पातळीवरचे. 'जै' मात्र आत्महत्या करून मोकळी होते तर शिल्पा कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे पोलिसात जायचा निर्णय घेते.

'तिची गोष्ट' आणि 'घाबरू नको, आम्ही आहोत' या दोन कथांतही बरंचसं साम्य आहे. म्हणजे दोन्हींकडे दारिद्र्य, अडाणीपणा, सामाजिक प्रतिष्ठा नाही आणि ज्यांनी त्यांच्यावर बलात्कार केलाय ते सामाजिक प्रतिष्ठा असलेले, राजकीय वरदहस्त असलेले. कथानिवेदिकेच्या घरी घरकाम करणाऱ्या राधाची, शाळा शिकून मोठं होण्याची स्वप्नं बघणारी मुलगी, शाळेतील शिपाई आणि धनदांडग्यांच्या दोन पोरांच्या हौसेची शिकार बनते. यातून गरोदर राहते आणि तिला मोकळी करण्यासाठी आई अघोरी उपाय करते. यात मुलीचा मृत्यू. पंधरा दिवस मीडियामध्ये वातावरण ढवळतं आणि मग सारं निवळतं. 'घाबरू नको, आम्ही आहोत'मध्ये पीडिता खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतली आणि त्यात पुन्हा गरीब. या कथेतील हौसाबाईच्या सुनेवर इलेक्शनला उभ्या राहणाऱ्या गावातील सावकाराच्या मुलाने बलात्कार केलाय. यात म्हातारी हौसा म्हणते, 'राजकारणानं बापयांचं हात बांधल्यालं आणि बापयांनी बायकांचं पाय बांधल्यालं.' यातील कथानिवेदिका म्हणते, 'लक्षात आलं, जात, धर्म, राजकारण, पुरुषी व्यवस्था

या सगळ्याच्या पार खाली – खालच्या पातळीवर असते स्त्री. त्यातून विधवा असेल तर आणखीच खाली.' लेखिकेने या कथेत ८ मार्चच्या स्त्रीमुक्तीदिनाची पार्श्वभूमी घेतलीय. कथानिवेदिका नुसतं भाषण करून आपलं कर्तव्य इथे संपवत नाही तर हौसाबाईच्या सुनेला न्याय मिळवून देण्यासाठी उभी राहते. तिच्याबरोबर गावातील साऱ्या बायकाही उभ्या राहतात.

'फक्त पाच दिवसात' या कथेत प्रत्यक्ष नवऱ्यानेच बायकोवर बलात्कार करून तिला आपल्या मित्रांनाही उपलब्ध करून देण्याचा करंटेपणा केलाय. वाचताना विश्वास बसणार नाही अशी ही कथा आहे. मात्र समाजात अशाही घटना घडत असतात हेही वास्तव आहे. 'मुलीचं लवकर लग्न करून मोकळे होऊया', या मानसिकतेवर इथे लेखिकेने बोट ठेवलंय. कथेच्या शेवटी विधवा मुलीचा बी.एस्सी. लास्ट इयरला फॉर्म भरायचा निर्णय घेणारे वडील म्हणतात, ''खूप शिक. आपल्या पायावर उभी राहा. मी पाठीशी आहे तुझ्या. घाईगडबडीत निर्णय घेऊन खूप मोठी चूक केली.''

'श्वास' कथा अशीच विश्वास न वाटण्याजोगी. चार वर्षाच्या चिमुरड्या मुलीवर तिच्या सख्खा मामा बलात्कार करतो. मुलगी कोमात जाते. दोन वर्ष कोमात असलेल्या लेकीची उच्चशिक्षित, उच्च पगार घेणारी आई, तिची घुसमट, तिची अगतिकता, सख्ख्या भावाविरुद्ध केस लढताना तिला आलेली प्रत्यक्ष जन्मदात्री आईची दडपणे, यातूनही तिचा खंबीरपणा, पतीची पुरुषी वृत्ती या सर्व गोष्टींचे खूप बारकावे लेखिकेने रेखाटले आहेत. या कथेचा शेवट तर वाचकाचं काळीज पिळवटून टाकणारा. वाचकाने त्याचा प्रत्यक्षच अनुभव घ्यायला हवा.

'धिंड' कथाही अशीच करियरिस्ट लेखिकेची आहे. ऐंशी वर्षांचा म्हातारा मनीचंद, तिच्या आजोबांच्या वयाचा. तिला सारखा फोन करून हैराण करतो. प्रेमाची मागणी करतो. ती बधत नाही म्हटल्यावर 'तुझी परीक्षा घेत होतो आणि तू त्यात डिस्टिंक्शनने पास झालीस' म्हणतो. कथानायिका इथे खूप चिडते, तेव्हा 'बलात्कार झालेली बाईसुद्धा एवढा आकांडतांडव करत नाही' असं निर्लज्जपणाने म्हणतो. बलात्कार फक्त शारीरिकच नसतो तर तो मानसिक असू शकतो आणि त्याचेही परिणाम स्त्रीवर शारीरिक बलात्काराइतकेच भयानक होतात हे सत्य इथे लेखिकेने मांडलेले आहे. 'काही पुरुषांना शारीरिक दुर्बलता पचवता येत नाही.' या सत्यावरही इथे प्रकाश टाकलेला आहे.

'असं व्हायला नको आहे' ही कथा मात्र लेखिकेची 'माणूस' म्हणून आत्यंतिक उच्च दर्जाची परिपक्वता अधोरेखित करते. बलात्कार करणे ही वृत्ती वाईटच. त्या पुरुषांना शिक्षा व्हायलाच हवी पण ज्या पुरुषांच्या वाट्याला हक्काच्या शरीरसुखासाठी वैवाहिक जीवनच येत नाही त्यांचं काय? समाजाच्या 'नाही रे' घटकातील तरुण पोरांची लैंगिक सुखासाठीची तडफड लेखिकेने इतक्या समर्थपणाने शब्दबद्ध केलीय की, त्यांच्या वासना चाळवणाऱ्या चित्रपटांसारख्या माध्यमांना आपण नक्कीच दोषी ठरवतो. संपत, किशा आणि नंदन हे तिघेही झोपडपट्टीत राहणारे, शाळा-कॉलेज शिकण्याच्या वयात हमाली करण्याचं काम वाट्याला आलेले. त्यांना वाटतं, 'कशाला जगतोय आपुन? ना खायला, ना प्यायला, ना ऱ्हायला घर, ना झोपाय हक्काची बायकू?' जगात कितीतरी लोक हे प्रश्न घेऊन जगत आहेत.

अपरिहार्यतेने बलात्कारासारखा गुन्हा करणाऱ्या या घटकाचा लेखिकेने खूप करुणेच्या अंगाने विचार केलेला आहे. माणसाच्या नैसर्गिक गरजांवर भाष्य केलेलं आहे. समाजालाच अंतर्मुख व्हायला भाग पाडलेलं आहे.

बलात्कार हा शेवटी गुन्हा आहे. माफ करता न येण्यासारखा गुन्हा. हा गुन्हा कुणाकडूनच होऊ नये अशी समाजव्यवस्था निर्माण करणे, या गुन्ह्यासाठी धाक बसावा अशी कायदेव्यवस्था निर्माण करणे आणि ज्या स्त्रीबाबत हा गुन्हा घडतो त्या स्त्रीला सर्वस्वी बळ देणारी समाजाची निरोगी दृष्टी बनविणे, एवढी सजगता वाचकाच्या मनात नक्कीच निर्माण करणारा हा कथासंग्रह आहे.

या कथासंग्रहाचं अजून एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे एवढ्या गहन विषयावरचा हा संपूर्ण कथासंग्रह असूनही तो कुठेच प्रचारकी वाटत नाही. कथांतील अनुरूप भाषाशैली, वातावरणनिर्मितीसाठी नैसर्गिक दृश्यांचा केलेला सुरेख वापर, छोट्या-छोट्या वाक्यांनी सजवलेले संवाद, कुठेही नकारात्मकतेचा संदेश दिला जाणार नाही याची घेतलेली दक्षता आणि शारीरिक पातळीवरच्या वर्णनांतून देखील दाखवलेला कमालीचा संयम या गोष्टी एकूणच कथासंग्रहाला खूप उंची प्राप्त करून देतात. या विषयावर संपूर्ण कथा असलेला असा हा मराठी साहित्यातील पहिला कथासंग्रह आहे. प्रत्येक स्त्री आणि पुरुष (पालकत्वाच्या आणि पाल्याच्या भूमिकेतील) यांनी तो जरूर वाचायला हवा.

**– प्रा. आशलता कांबळे**
भ्रमणध्वनी : ९९३०३७३०५३
k.ashalata@yahoo.co.in

**'निर्भया लढते आहे**
**नीलम माणगावे**
**ग्रंथाली प्रकाशन**
**पृष्ठ २७०, मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# पुणे : एक अविस्मरणीय भेट

**डॉ. अनंत पांडुरंग लाभसेटवार**

**उ**त्तर हिंदुस्थानातल्या मुख्य नद्यांचं मूळ जसं हिमालय तसं मला अमेरिकेत भेटणाऱ्या अधिकांश बांधवांचं कूळ एकतर मुंबई नाही तर पुणे! ते आपली उत्तुंग बुद्धिमत्ता बरोबर घेऊन अमेरिकेत स्थायिक होतात. मी महाराष्ट्राच्या अनुल्लेखनीय भागातून येत असल्यामुळे मला या शहरांकडे निरपेक्ष दृष्टीनं बघता येतं.

पुण्याला मराठी माऊलीचं व संस्कृतीचं माहेरघर समजण्याची वहिवाट आहे, पण आता औद्योगिकीकरणाच्या जात्यात या गोष्टी भरडल्या गेल्या आहेत. ग्रंथनिर्मितीपेक्षा आता पुण्यात वाहनबांधणी व मंत्रणा व्युपत्ती (Software) जास्त होते. हे परिवर्तन अर्थातच अमेरिकेच्या प्रभावामुळे झालेलं आहे. अमेरिकेने इथे कारखाने उघडले, संगणक कंपन्यांनी माहिती व तंत्रज्ञानाचे पार्कस् स्थापन केले आणि शीघ्र उपहारगृहांनी सगळं पुणे परिपूर्ण केलं. आज जवळजवळ सर्व अमेरिकन फास्ट फुडची आस्थापनं पुण्यात सापडतात किंबहुना पुण्यातली काही अमेरिकेतल्या बांधवांपेक्षा सरस आहेत. अमेरिकेतल्या 'KFC'ला व 'पिझ्झा हट'ला जाळ्या जळमणं लागलीत तर पुण्यातल्या शाखा भरभरटीला आल्या आहेत. कल्याणीनगरच्या पिझ्झा हटमध्ये मी एकदा गेलो होतो. त्यांची अन्न यादी (Menu) अमेरिकेपेक्षा विस्तारित, व्यामिश्रता असलेली आणि चविष्ट. ही आहारगृहं अमेरिकेत बंद पडत आहेत.

> **भारतामध्ये धर्मादाय कार्य करण्यासाठी देखील हात ओले करावे लागतात हा अनुभव मला नवीन होता. आमच्या लेखापालांनी याची किंमत लक्षात घेऊनच मला आपली फी सांगितली होती. तो म्हणाला की पैसे जोडल्याशिवाय फायलीला पाय फुटत नाही. मग ते धर्मादय कार्य असो की फायद्याचा उद्योग असो.**

अमेरिकेचा हा आर्थिक विस्तार एकटा येत नाही. डॉलरबरोबर त्यांची संस्कृती येते. हा परिणाम आता पुण्यात बघायला मिळतो. अन्नाप्रमाणे आपली वेशभूषाही बदलली. खांडेकरांच्या काळात फर्ग्युसनच्या मुली लुगडं व आंबाडा घालीत. मग साड्या आणि वेण्या आल्या. आता ह्या कालबाह्य होऊन जीन्स व टी शर्ट आले. साडी चढवलेली तरुणी एक तर पुण्याला भेटायला आलेली नाहीतर भांडी घासणारी मोलकरीण. स्वत:ला आधुनिक समजणारी तरुणी फक्त सणवाराच्या दिवशीच भारतीय संस्कृतीचं प्रतीक समजल्या जाणाऱ्या वस्त्रांत सापडेल. पैठणी, टोप, उपरणं वगैरेप्रमाणे आता साडीही पुराण वस्तुसंग्रहालयात संग्रही ठेवण्यायोग्य झाली आहे.

मुंबईवरून पुण्याला द्रुतमार्गानं जाताना, 'आपलं गंतव्यस्थान जवळ आलं का? हे कुणाला विचारण्याची जरुरी नसते. राजे जसं हवेत गुलाल फेकून आपलं आगमन जाहीर करीत, तसं पुणं आपलं अस्तित्व दुतर्फा लावलेल्या मोठ्या फलकांवरून प्रवाशांना सांगतं. ही फलकबाजी म्हणजे पूर्वीच्या काळातले जणू ढोलताशेच! आपल्या एकाच कोवळ्या वयाच्या मुलाबरोबर घर शोधणारं तरुण जोडपं व पार्श्वभूमीला असलेल्या देखण्या (चित्रात तरी) दिसणाऱ्या बहुमजली रहिवासी संकुलाच्या सदनिका यांचा त्या फलकावर कलात्मक मेळ बसलेला असतो. एवढी मोकळी, लसलशीत हिरवळ व तरण तलाव असलेली जागा या विकासकांना कुठून मिळते देव जाणे. माझ्या भाच्याचा मुलगा उदय एका आलिशान काँडोमध्ये रहातो. पण त्याच्या पोहण्याच्या तलावात पाणी नाही व त्या चित्रातली हिरवळही कुठे दिसत नाही. ती केव्हाच करपली कारण त्यांना नगरपालिकेचं पाणी अजून न मिळाल्यामुळे पाण्याच्या गाडीनं हा जीवनरस दूरस्थ ठिकाणांहून आयात करावा लागतो. ही वस्तुस्थिती त्या जाहिराती सोयीस्करपणे डोळेआड करतात ही गोष्ट वेगळी.

'आता पुणे जवळ आलं याची तुतारी' या जाहिराती फुंकतात. पण घर जवळ आलं म्हणून उसासे सोडण्यात अर्थ नाही. मुंबईवरून इथपर्यंत येण्यास आपण गरुडझेप घेतली तरी इथून घरी पोहचण्यास गोगलगायीची गती पत्करावी लागते. इतर आंतरराष्ट्रीय शहरांचा पुण्यालाही रोग जडला आहे. रस्त्यांना वारुळाचं रूप आलं आहे. यात मुंग्यांची जागा वाहनांनी घेतली आहे एवढंच! उड्डाण रस्ते बांधलेले आहेत, पण त्यांची बांधणी संपेपर्यंत वाहतूकच एवढी वाढलेली असते की त्यामुळे फारसा फरक पडलेला दिसत नाही.

पुणे आता सर्वच अर्थानं एक आंतरराष्ट्रीय शहर झालं आहे. लोहगावच्या विमानतळावरून परदेशात जाता येतं. पुणेरी लोकांना




ठाऊक असेलच की त्यांच्या शहराला आता सोनेरी किनार लागली आहे. भारतातील सर्व शहरांमध्ये पुण्यात जास्त आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आढळतात. त्यांच्या भिन्न संस्कृतीचा व विचारांचा आपल्याला फायदाच होतो. अमेरिकन विद्यापीठं गोऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या विचारांचा एकजिनसीपण हटवून त्यात वैचारिक व सांस्कृतिक व्यामिश्रता ओतण्यासाठी खास प्रयत्न करतात. त्यामुळे होणाऱ्या देवाणघेवाणीमुळे देशी आणि परदेशी विद्यार्थी समृद्ध होतात, त्यांचा दृष्टिकोन विस्तारतो व वैचारिक क्षितिजं रुंदावतात असा अनुभव आहे. हे लोण पुण्याला लाभलं आहे हे त्यांचं भाग्यच म्हणायला पाहिजे.

आंतरराष्ट्रीयीकरणाचं दुसरं एक चिन्ह म्हणजे पुण्यात आता अमेरिकन नाममुद्रेची जवळजवळ सर्व हॉटेलं सापडतात. मेरियाट, 'हायाट', 'वेस्टीन', 'हिल्टन' ही टाटांच्या पंचतारांकित हॉटेल्सबरोबरच उभी आहेत. त्यामुळे परदेशी पर्यटकांना रहाण्याचा मुळीच त्रास होत नाही. आता मुंबईप्रमाणेच पुण्यालाही नवीन विस्तारित विमानतळाची जरुरी आहे.

या आंतरराष्ट्रीय रेट्यामुळे पुण्यात पंडितांची संख्या कमी झालेली नाही असा माझा तरी अनुभव आहे. **'लाभसेटवार प्रतिष्ठान,** अमेरिका' या धर्मादाय संस्थेनं शंभर वर्षीय 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन' मंदिरात महाभारतीय मूल्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचावी म्हणून एक व्याख्यानमाला पुरस्कृत केली. सुप्रसिद्ध लेखिका **डॉ. अरुणा ढेरे** यांनी द्रौपदीवर तीन व्याख्यानं दिली. जनतेचा प्रचंड प्रतिसाद बघून पुणेकर आधुनिकीकरणाच्या मार्गावर असूनही भारताची प्राचीन संस्कृती विसरले नाहीत याची खात्री झाली. बराचसा श्रोतृवर्ग सभागृहाच्या बाहेर उभा राहिला. काही जमिनीवर आसनस्थ झाले, तर काहींनी व्यासपीठाभोवती ठाण मांडलं. त्यावेळी एवढ्या पंडितांची भेट झली की पु.लं.नी म्हटलेलं खरं वाटू लागलं. ते म्हणाले होते की पुण्यात एक खडा फेकला तर ते एखाद्या पंडिताच्या डोक्यावर पडण्याची शक्यता जास्त. संस्कृत इंग्रजीचे पंडित, पुराण वाङ्मयाचे वाचस्पती आणि इतिहासाचे तज्ज्ञ मला भेटले. याशिवाय तरुण पिढीही तिथे मोठ्या संख्येनं होती. फेसबुकशिवाय ते दुसरं पुस्तक वाचत नाही असा त्यांच्यावर आरोप केला जातो. अशा विद्यापीठीय पिढीला महाभारतात रस असावा हा आपल्या सांस्कृतिक सातत्याचा विजयच समजायला पाहिजे. पण पुणे हे भारतातलं एक शहर आहे हे कसं विसरता येईल? त्यामुळे देशाला लागणारे कलंक पुण्यालाही लागले तर नवल कसलं?

मी एके दिवशी भांडारकरमध्ये जाण्यास उबर केली. लवकरच एका पोलिसानं अडवलं. आपण कुठला कायदेभंग केला हे न

कळल्यामुळे मी संभ्रमात पडलो. अमेरिकेत जवळजवळ ६००० कायदे आहेत. त्यापेक्षा जास्त भारतात असावेत. काही, देश पारतंत्र्यात होता तेव्हापासून अस्तित्वात आहेत. गाडीवानानं कुठला तरी कायदा मोडला असावा म्हणून मी सचिंत झालो. काचेचं घर जसं दगडफेक करण्यासाठी तसं कायदे हे भंग करण्यासाठी असतात असा जनमानस भारतात सर्वत्र आढळतो. खरं म्हणजे भारतातले सर्वच कायदे पाळले तर जीवन जगणं अशक्य होईल म्हणून लोक पोलीस उभा असताना लाल दिव्यातून जातात. तो हिरवा होईपर्यंत थांबलं तर आपल्याला म्हातारपण येण्याची शक्यता. कचरा केरकुंडात फेकण्याऐवजी कुठेही भिरकावून देण्याचं स्वातंत्र्य अभिव्यक्तिस्वातंत्र्यापूर्वी आंबेडकरांनी आपल्याला दिलं असं तमाम इंडिया समजतं. अल्पवयात लग्न करू नये व हुंडा घेऊ नये यासाठी देशात कायदे आहेत, पण ते पाळणाऱ्यांना असामान्य व्यक्ती म्हणून भारतरत्न देण्यास हरकत नाही. अशा स्थितीत मी बुचकळ्यात पडलो तर नवल कसलं? पोलिसानं माझ्या गाडीवानाला वाहन चालवण्याचा व्यापारी दाखला दाखल कर म्हणून हात पुढे केला. यावेळी उबरसाठी टॅक्सी चालवण्यासाठी साधा दाखला चालणार नव्हता आणि म्हणून आपल्याला दक्षिणा मिळण्याची दाट शक्यता अशा अविर्भावानं तो गस्तवाला उभा राहिला. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझ्या गाडीवानाजवळ आवश्यक दाखला होता. त्यामुळे पोलिसाची भारी निराशा झाली. मी ड्रायव्हरला विचारलं की जर सनदी दाखला नसला असता तर काय झालं असतं? तो म्हणाला, ''त्यानं दंड आकारला असता. त्याची पावती पाहिजे असेल तर ४००-५०० रुपये भरावे लागले असते. नाहीतर निम्म्या पैशात काम झालं असतं. हे पैसे नगरपालिकेच्या तिजोरीत रस्ते दुरस्तीसाठी न जाता कुणाच्या खिशात जातात हे विचारणं रामाची सीता कोण? असा प्रश्न विचारल्यासारखं होईल.''

हा खिसा नव्हता. त्या बिचाऱ्या पोलिसाला वरच्यांना हिशेब द्यावा लागतो हे सर्वांना ठाऊक आहे व त्यात सिंचन घोटाळ्यासारखा अनियमितपणा कधी सापडत नसल्यामुळे तो हिशोब अचूक असतो. हे खिसे किती व कुणाचे हे अणुबॉंबच्या गौप्याएवढं गुपित ठेवण्यात येतं, पण राजकीय इच्छाशक्ती असेल तर ते उघडण्यास फार वेळ लागणार नाही. या पोलिसावर पाळत ठेवली किंवा त्याच्या गैरव्यवहाराची चोरून चित्रफित केली तर सगळा खेळ संपण्यास फार उशीर लागणार नाही. त्या भितीनेच अमेरिकेतले पोलिस अशा भानगडीत पडत नाही. त्यांची विश्वासर्हता एवढी दांडगी की सुनावणीचे वेळी न्यायाधीश त्याच्या साक्षीला खास महत्त्व देतो. आपल्या देशात असं होण्यास सूर्याला पश्चिमेकडे उगवावं लागेल.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्या देशात प्रगती झाली काय असा प्रश्न निघतो. स्वातंत्र्य मिळालं पण सुराज्य प्राप्त झालं का? याचं उत्तर मला पुणे विद्यापीठात आम्ही स्थापन केलेल्या लाभसेटवर व्याख्यानमालेच्या या वर्षीच्या (जानेवारी २०१७) भाषणाच्या वेळी मिळालं. त्याच्या वक्त्या होत्या समाजसुधारक रेणूताई गावस्कर. माझ्याशी बोलताना त्या स्पष्ट म्हणाल्या की भारतात काही एक प्रगती झाली नाही. भौतिकदृष्ट्या आपण दोनचार सडका बांधल्या असतील, एखाददुसरा वीजस्तंभ उभारून खेड्यात उजेड नेला असेल, पण नैतिकदृष्ट्या आपण प्रगती केली आहे का याचं उत्तर मला त्या पोलिसानं त्याच्यामागे उभ्या असलेल्या अज्ञात राजकारण्यांनी दिलं. हा कारभार पुण्याएवढाच मर्यादित आहे असं कुणी समजू नये. तो देशव्यापी आहे. त्यासाठी पोलिसांना दोषी ठरवणं म्हणजे रोग बरा करण्याऐवजी लक्षणांवर उपचार केल्यासारखं होईल.

इतर ठिकाणीही मला नैतिक दौबल्य सापडलं. सतरा वर्षांपूर्वी आम्ही जेव्हा धर्मादाय कार्य करण्यासाठी भारतात 'लाभसेटवार प्रतिष्ठान' स्थापन केलं तेव्हा असाच कटू अनुभव पदरात पडला. तेव्हा दाखला मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांनी सरळ हात पुढे केला. लाभसेटवार साहित्य पुरस्काराचे मानकरी कविवर्य विंदा करंदीकरांनी असं लिहिलं होतं की घेण्याचा हात पुढे न करता देण्याची ओंजळ खुली करावी, पण ओंजळ उघडण्यापूर्वीच कुणीतरी हात पुढे केला होता. भारतामध्ये धर्मादाय कार्य करण्यासाठी देखील हात ओले करावे लागतात हा अनुभव मला नवीन होता. आमच्या लेखापालांनी याची किंमत लक्षात घेऊनच मला आपली फी सांगितली होती. तो म्हणाला की पैसे जोडल्याशिवाय फायलीला पाय फुटत नाही. मग ते धर्मादय कार्य असो की फायद्याचा उद्योग असो.

पण या कटू अनुभवांचं पुराण अजून संपलं नव्हतं. मी सहज म्हणून कोरेगावच्या स्टारबक्समध्ये सपत्निक गेलो. निवडणूक तोंडाशी आली की राजकारण्यांची जीभ फुलते तसं आजकल कॉफीगृहाची आस्थापनं जगभर प्रसवत आहेत. एकानं विनोद केला की तो तळघरात गेला आणि त्याला तिथे स्टारबक्स सापडलं. अमेरिकेत विस्तारासाठी जागा न उरल्यामुळे कंपनीनं चीनला व भारताला लक्ष्य केलं. आपल्या खेड्यात पिंपळाच्या झाडाखालचा चबुतरा जसं गावचं गंडस्थान समजण्यात येतं तसं अमेरिकेत ते कॉफीगृह मित्रमैत्रिणांना भेटण्याचं व गोष्टी खापलण्याचं सामाजिक स्थळ मानण्यात येतं. मला वाटलं भारतासारख्या गरीब देशात की जिथे दिवसाला १०० रुपये पगार दिला तर दारासमोर आचार्याची पदवी असलेले गर्दी करतात तिथे या कॉफीगृहातलं पेयं अमेरिकेपेक्षा स्वस्त असेल. मागच्या वर्षी उत्तर प्रदेशच्या सरकारनं डझनभर बाबूंच्या नोकऱ्यांसाठी (Peons) जाहिरात दिली तेव्हा पोतंभर नव्हे तर गाडीभर अर्ज आले. त्यात २५० पीएच.डी. मिळवलेले होते. अमेरिकेत या कॉफीगृहात काम करणाऱ्या नोकरांना ताशी १२ ते १५ डॉलर्स (८०० ते १००० रु.) पगार व अतिरिक्त लाभ द्यावे लागतात म्हणून मी स्वस्त कॉफीची अपेक्षा केली तर माझं काय चुकलं? पण कॉफीचं बिल मी तपासलं आणि मला धक्काच बसला. ते न्यूयॉर्क या अतिमहागड्या शहरापेक्षा अंमळ जास्तच होतं. असं कसं? आपले मजूर स्वस्त, दुधाचे, साखरेचे व कॉफीच्या पुडीचे भाव कमीच. मग मॅनहॅटनमध्ये १३१ रुपये (२ डॉलर्स)ला मिळणारी कॉफी पुण्यात १८० रुपयांना विकली जात होती. खरं म्हणजे कॉफीची किंमत १३० रुपयेच होती व त्यावर निरनिराळ्या प्रकारचे

एकूण चार प्रकारचे कर आकारण्यात आले होते. त्यामुळे करपश्चात किंमत १८० वर गेली होती. मूल्यवर्धक, सेवा व वस्तू कर त्यातले सर्वात मोठे. याशिवाय त्यात दोनतीन सेस (cess) अनुस्यूत केले होते. 'सेस' म्हणजे विशिष्ट गोष्टीसाठी गोळा केलेला कर. स्वच्छ भारत, कृषिक्षेत्र व शिक्षणक्षेत्र यासाठी पैसे उकळण्यात येत होते. ग्राहक एवढे कर बघून एवढा थकतो की त्याला बक्षिसी (tip) देण्याचं भान राहत नाही. याउलट अमेरिकेत एकच कर. ते म्हणजे विक्रीकर. त्याचे दर जास्तीत जास्त १० टक्के. ते पैसे राज्य व नगर सरकारला जातात.

हे सर्व सांगायचं कारण असं की भारतातले मजूर, संसाधनं, भाडं वगैरे स्वस्त असल्यामुळे ती स्वस्ताई वस्तूंच्या किंवा सेवेच्या किंमतीत का प्रतिबिंबित होत नाही? असं चीनच्या बाबतीत आढळत नाही. तो देश स्वस्त वस्तूंचा जगाचा कारखाना म्हणून ओळखला जातो. त्यामुळे चीन भरभराटीला येऊन औद्योगिक माल निर्मितीच्या बाबतीत (manufacturing) अमेरिकेच्या पुढे गेला आहे. आपला देश या क्षेत्रात चीनशी स्पर्धा करू शकत नाही. २०१६ मध्ये आपली निर्यात घटली होती. पुण्याच्या स्टारबक्सनं मला जागतिक अर्थकारणाचा धडा शिकवला होता. कॉफीप्रमाणे पेट्रोलचे भावही भारतात जबरदस्त करामुळे अमेरिकेपेक्षा जास्त आहेत हे या देशाला भेट देणाऱ्या भारतीय पर्यटकाच्या चट्कन लक्षात येईल. तसंच स्थावर इस्टेटीचे मुंबईतले भाव मॅनहॅटनला लाजवतात हे विशेष!

भारतात आलो म्हणजे मला अनेक लोक भेटायला येतात. अशा कधीही न भेटलेल्या लोकांशी संवाद साधणं व त्यांच्या जीवनाविषयी परिचित होणं मला नेहमीच आवडतं. यावेळी भेटलेले राजपूत नावाचे गृहस्थ असेच! या तरुण उद्योजकानं पुण्याजवळ ट्रॅक्टर, स्वयंचलित दुचाकी यासारख्या यंत्रासाठी खास बॅटऱ्या बनविण्याचा कारखाना काढला होता. हा लघुउद्योग उघडण्यास त्याला काय अडचणी आल्यात हे जाणून घेण्यास मी उत्सुक होतो. साधं धर्मादाय प्रतिष्ठान स्थापन करण्यास मला हात ओले करावे लागले तर त्याचा नफेखोर उद्योग उघडताना चाकात किती वंगण घालावं लागलं ते ऐकण्यास मला रस होता. त्यानं मला सरळच सांगून टाकलं की कारखाना सुरू करण्यास जे विविध दाखले लागतात ते सर्व प्राप्त करण्यास सुरुवातीला एकूण २५-३० लाख रुपयांचा प्रसाद वाटावा लागला. साहेबांची कृपा रहावी म्हणून अजूनही दर तीन महिन्यांनी त्याला जो अबकारी कर भरावा लागतो, त्यावेळी नोटांनी भरलेलं एक पुडकं त्यांना तो देतो. म्हणजे उद्योग भरभराटीला आला होता काय? मुळीच नाही. अमेरिकेत औद्योगिक कर खर्च पश्चात नफ्यावर आकारण्यात येतो, पण भारतीय माणूस ही आकडेवारी पाहिजे तशी बदलू शकतो म्हणून सरकार त्याच्या ढोबळ खपावर करपट्टी लावते. त्यामुळे सुरुवातीपासूनच शासन व उद्योजक यामध्ये अविश्वासाचे सबंध निर्माण होतात. राजपूत म्हणाला त्याचा उद्योग तोट्यात चालत असला तरी त्याला कर भरावे लागतात.

याप्रमाणे लक्तरं तोडली जात असताना तो कारखाना बंद का करीत नाही? कारण त्याला त्यातली एक क्लृप्ती माहीत आहे. तो म्हणाला, 'उत्पादनाचा काही भाग तो बिनापावती रोख घेऊन विकतो. महसूल खात्याला त्याचा गंध नसतो.' या अवैध व्यवहारातून त्याला फायदा होतो आणि तरंगत रहाण्यास मदत होते. भारतातले अधिकांश लघुउद्योग याच तत्त्वावर चालतात. क्रिकेटपेक्षा 'करचुकवेगिरी' हा भारतातला मोठा खेळ आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आकडेवाडीनुसार १.४ कोटी भारतीयातले फक्त १.५% लोक उत्पन्न कर भरतात, पण हा राजपूत मला त्याच्या उद्योगातलं रहस्य सांगण्यास आला नव्हता. त्याला सामाजिक कार्य करण्याचे डोहाळे लागले होते. तो म्हणाला मोदींच्या 'स्वच्छ भारत' या अभियानात कचऱ्याची झाडलोट करून अनेकांनी गांधी होण्याचा प्रयत्न केला. कॅमेऱ्यासमोर लाक्षणिक झाडू लावून राजकारण्यांनी प्रचंड प्रसिद्धी मिळवली. पण या गोळा केलेल्या कचऱ्याचं काय करायचं हे कुणाला ठाऊक नाही. अनेकांनी तो शेजाऱ्याच्या अंगणात लोटून भारत स्वच्छ केल्याचा आनंद लुटला, पण खेड्यापाड्यातून ग्रामवासीयांनी त्याला पेटवून त्याची राख केली. अर्थातच हे कायद्याविरुद्ध आहे. थुंकणंसुद्धा कायद्याला धरून नाही. म्हणून जिथे-तिथे मुखरसाची पिचकारी सोडण्याचं लोकांनी थांबलं का? पण कचरा जाळणं एवढं निरूपद्रवी नाही हे राजपूतनं माझ्या निदर्शनास आणलं.

ग्रामवासी जरी आधुनिक झाले नसले तरी त्यांच्या कचऱ्याचं आधुनिकीकरण झालं आहे. त्यांच्या कचऱ्यात प्लास्टिकच्या पिशव्या तर असतातच पण त्यांना आतून कल्हई लावलेली असते. त्या जाळण्यानं जो विषारी वायूचं उत्सर्जन होतं ते कर्करोगजन्य असल्यामुळे त्यापासून सर्व पंचक्रोशी बाधित होते. त्याविषयी जनजागृती करण्यासाठी राजपूतनं एक धर्मदाय संस्था स्थापन करून भाषणांचं आयोजन केलं होतं. त्यात मी भाग घ्यावा अशी त्याची इच्छा होती. या ज्वलन प्रक्रियेमुळे आता शहराप्रमाणे खेड्यातही फुफ्फुसाच्या विकारांचं प्रमाण वाढलं आहे असं राजपूत म्हणाला. ते सत्य एका कानानं ऐकून आपण दुसऱ्या कानानं सोडून देतो. पण इथे चप्पल चिखलाला भिडली होती. पर्यावरण प्रदूषणाचे खरे परिणाम गोचर होत होते.

शेवटी पोलिसानं अडवलेली गाडी म्हणा, स्टारबक्सची कॉफी म्हणा की खेडुतांनी जाळलेला कचरा म्हणा या सर्वांना जोडणारा एक सामान्य धागा आहे. तो म्हणजे अनैतिक वागणूक. आपण रोज पोथीपठण करतो. देवळात जाऊन नमस्कार करतो, पण मंदिराबाहेर पडलं की त्या पुण्याचं कुठला ना कुठला भ्रष्टाचार करून पापात रूपांतर करतो. हा अपप्रकार इथे उल्लेखिलेल्या क्षेत्रांपुरता सीमित नसून तो देशाच्या कणाकणात, रंध्रारंध्रात भिनलेला आहे हे दुर्दैव! याचं निवारण करणं म्हणजे देशाची प्रगती करणं हे उघड आहे.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

# भूषणावह भूषण.....!

**मेघना वर्तक**

**साडेतीन हजार तास विविध प्रकारची एअरक्राफ्ट चालवणारे एअर मार्शल भूषण गोखले विविध पुरस्कारांचे मानकरी ठरले. राष्ट्रपती पुरस्कार, परम विशिष्ट सेवा मेडल, अति विशिष्ट सेवा मेडल, वायू सेना मेडल पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. निवृत्तीनंतर, ११ मे २०१३ या 'राष्ट्रीय तंत्रज्ञान दिना'च्या प्रसंगी अतिशय मानाच्या अशा अग्नी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.**

''I know you are disappointed! I know you can fly more! Let me tell you one thing, whatever goes up, must come down. So keep your feet firmly on the ground!" हा जो गुरुमंत्र माझ्या करिअरच्या सुरूवातीला मिळाला त्याने म इझे जीवन व्यापून टाकले आणि शिकवण दिली की कितीही वरती गेलात तरी पाय जमिनीवरच भक्कम हवेत! निळयाभोर नभाच्या अनंताचा ध्यास घेत, १९६८ साली हवाई दलात दाखल झालेले एअर मार्शल भूषण गोखले म्हणाले, समाजाला परत देण्याची भावना जी आज माझ्यात निर्माण झाली आहे ती या गुरुमंत्रामुळेच!

'नभःस्पृशं दीप्तम्' हे वायुसेनेचे बोधवाक्य ज्यांच्या मनः पटलावर कोरले आहे असे एअर मार्शल भूषण गोखले सांगत होते. मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचा सायन्सचा विद्यार्थी होतो. पण १९६२ मध्ये सुरू झालेल्या भारत चीन युद्धाने माझ्या जीवननौकेची दिशाच बदलली. त्याकाळात सर्व तरुण देशभक्तीने प्रेरित होऊन भारत देशाची सेवा करण्यासाठी उत्सुक होते. माझ्या आईवडिलांच्या सक्रिय पाठिंब्यामुळे माझा भाऊ वैभव १९६३मध्ये NDA-National Defence Academy मध्ये आर्मी कॅडेट म्हणून जॉईन झाला. १९६४ मध्ये त्याची पाऊलवाट मीही अनुसरली आणि एअरफोर्स कॅडेट म्हणून प्रवेश घेतला.

NDAमध्ये सहाव्या टर्मला सर्वांना प्रॅक्टिकल ट्रेनिंग असायचे. खडकवासला येथे 'जे पिकॉक बे' आहे, तिथे नेव्हीची मुले शिप सेलिंग (ship sailing) करतात, आर्मीचे लोक त्यांचे टार्गेट प्रॅक्टिस (target practice) करतात आणि आम्ही फ्लाईंग करतो. त्या काळात इंजिनविरहित गिल्डर्स (gliders)चे वर्ल्ड रेकॉर्ड २४ तासांचे आहे. त्यावेळी वर हवेच्या दाबाने आणि तपमानाने पॉकेट्स तयार झाली आणि त्यामुळे ते वर राहू शकले. करिअरमधील पहिलेवाहिले फ्लाईंग करायला मीही खूप एक्साइटेड होतो. पहिले प्रेम, पहिले मूल यांचे जे जीवनात स्थान असते ते माझ्या जीवनात माझ्या पहिल्या फ्लाईंगचे होते. मी आणि माझे फ्लाइट इन्स्ट्रक्टर फ्लाइट लेफ्टनंट मेनेझिस (flight instructor Flt Lt Menezes) सर्व चेक करून ३०० फुटांवर गेलो, पण वर हवा नाही आणि काही नाही, त्यामुळे लागलीच खाली यायला लागले कारण तुम्ही असे नुसते कुठे अडकून राहू शकत नाही. माझी पहिली फ्लाईट फक्त '३ मिनिटे २० सेकंद' होऊन संपली! मी पाहिले होते वेगळेच स्वप्न आणि घडले भलतेच! खूप खट्टू झालो. खूप निराश झालो, स्वतः वरच चिडलो! पण तेवढ्यात काही शब्द कानांवर पडले आणि हा अनमोल गुरुमंत्र जीवनात यशस्वी होण्यासाठी किती महत्त्वाचा आहे हे आज जीवनाच्या ह्या टप्प्यावर समजते आहे.

निःस्सीम देशभक्तीचे व्रत घेतलेल्या एअर मार्शल भूषण निळकंठ गोखले यांचे विनम्र शब्द ऐकले आणि भारावलेल्या मनानेच मी त्यांना म्हटले, ''ह्या गुरुमंत्राचे पालन करून आपल्या आचरणाद्वारे आपण जो आदर्श निर्माण केला आहे, तो तरुण पिढीला मार्गदर्शक ठरेल!''

भूतकाळात रमलेले भूषण गोखले आठवणींचा एकेक धागा उलगडू लागले. १९५०च्या काळात माझे आईवडिल पुण्यातील डेक्कन जिमखान्यावर राहायला आले. माझे वडील सीआयडी (CID) त होते आणि आईची छोटीशी पद्मजा प्रकाशन संस्था होती. लहानपणी आईने सांगितलेल्या शिवाजी महाराज आणि क्रांती वीरांच्या गोष्टींमुळे शौर्य आणि सैनिकदलाविषयी उत्सुकता निर्माण झाली होती. माझे शालेय शिक्षण तेव्हाचे भावे स्कूल (आताचे विमलाबाई गरवारे स्कूल) मध्ये झाले. आमचा सर्व वर्ग अभ्यासात चांगला होता आणि याचे सर्व श्रेय आमच्या शिक्षकांना जाते.

मी त्यांना मधेच म्हटले, ''खरं आहे तो काळच तसा होता. हाडाचे शिक्षक होते आणि आपल्या विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक बनवण्याचे आणि त्यांचा व्यक्तिविकास घडवण्याचे व्रत जणू त्यांनी

घेतले होते.''

त्यावर प्रसन्न मुद्रेने ते म्हणाले, ''अभ्यासाव्यतिरिक्त इंग्रजी ड्रॉईंग, हिंदी यांच्या सर्टिफिकेट परीक्षांसाठी ते अभ्यास करून घेत असत. मला आजही आठवतंय त्यावेळच्या महाराष्ट्राच्या गव्हर्नर श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांच्या हस्ते मला बक्षीसही मिळाले. अशा बारीक-सारीक गोष्टीतून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते हे नक्की. शाळेच्या वार्षिक कार्यक्रमात नाटक, फॅन्सी ड्रेस अशा स्पर्धांतून सर्व मुले भाग घ्यायची Auxiliary Cadet Corps (ACC)सारख्या ॲक्टिव्हिटीमध्ये मी भाग घेतला. खाकी युनिफॉर्म घालून परेड करायची! एक वेगळाच जोश अंगात संचारायचा. 'कामात परफेक्शन येण्यासाठी खूप मेहनत करा, त्यात तडजोड नाही', ही आमच्या अत्रे सरांची शिकवण माझ्या पुढच्या करिअरच्या प्रवासात मला उपयोगी पडली.

आमचे अकरावीचे वर्ष होते. १२ जुलै १९६१ रोजी पानशेतचा पूर आला सर्वंकडे हाहाःकार उडाला होता. लोकांची घरे पाण्याखाली बुडाली होती. वित्तहानी, जीवितहानी झाली होती आमच्या शाळेचा तळमजला पाण्याखाली होता. सर्व प्रसंगातून बाहेर पडायला दोन-तीन महिने लागले. पण आमच्या शिक्षकांनी त्याही परिस्थितीत आमचा अभ्यास करवून घेतला आणि सर्व शाळेचा उत्तम रिझल्ट आला. नंतर मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सायन्सला गेलो, पण ईश्वराच्या मनात वेगळेच होते. त्याचवेळी १९६२ मध्ये भारत-चीनचे युद्ध सुरू झाले. सर्वत्र देशभक्तीचे वारे वाहात होते. सैन्यात भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न तरुण बघत होते. गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या स्वर्गीय स्वरातील 'ए मेरे वतनके लोगो' हे अजरामर गीत देशभक्तीची ज्योत अधिक प्रकाशमान करत होते. भारताच्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळी तरुणांमध्ये निर्माण झालेल्या देशभक्तीचा पुन:प्रत्यय येत होता. आम्ही दोघे भाऊही त्याला अपवाद नव्हतो. इथे जीवनाला वेगळेच वळण लागले! खरे म्हटले तर वडिलांची इच्छा होती की तिसरा भाऊ असता तर त्याला नेव्हीत घातले असते. पण बहीण पद्मजा होती आणि त्याकाळात मुलींना या सर्विसेसमध्ये प्रवेश नव्हता. नाहीतर तिनेही देशसेवेतच आपले आयुष्य वेचले असते. योगायोगाने आज तिचे पती 'जीपी कॅप्टन राजेंद्र आपटे' इंडियन एअर फोर्समधेच आहेत.

मी म्हटले, ''तुम्हा भावंडांच्या आजच्या यशाचे श्रेय अनेकांना आहे. पण तुमच्या आईवडिलांचा वाटा त्यात फार मोठा आहे.'' सद्‌गदित स्वरात एअर मार्शल भूषण गोखले म्हणाले, ''आम्ही खरंच भाग्यवान आहोत. आम्हाला आईवडिलांनी देशसेवेची परवानगी दिली. त्यांचे ऋण आम्ही कधीच विसरू शकत नाही. घरातील वातावरण हे सुसंस्कारित, शैक्षणिक होते. मला असे वाटते की लहान मुलावर दोन गोष्टींचा प्रभाव पडतो. पहिले म्हणजे अर्थातच स्वतःचे घर! आणि दुसरी शाळा! मी अतिशय सुदैवी आहे, कारण घर आणि शाळा या दोन्ही ठिकाणाहून माझ्यावर लहान वयातच जे संस्कार घडले नीतिमूल्यांची जी शिकवण मिळाली, त्यामुळे केवळ माझी करिअरच नव्हे तर माझे संपूर्ण आयुष्य घडवायला


एअर मार्शल भूषण गोखले

मदत केली आहे. माझ्या मित्रवर्गाने माझ्यात 'हेल्दी कॉम्पिटिटिव्ह स्पिरिट' निर्माण केले. आज मी जो काही आहे त्यात या सर्वांचाच वाटा खूप मोठा आहे!

यशाच्या शिखरावर असलेल्या परंतु पाय घट्टपणे जमिनीवर असलेल्या भूषण गोखले यांच्या बोलण्यातून त्यांची कृतज्ञता आणि विनम्र स्वभाव प्रतीत होत होता. शाळेच्या, बालपणीच्या कटू-गोड आठवणींतून बाहेर येत एअर मार्शल गोखल्यांनी पुढे करिअरच्या कारकिर्दीतील आठवणींचा खजिनाच रिता केला.

ते सांगत होते, ''मी जेव्हा NDA जॉईन केले तेव्हा वेगळाच अनुभव आला. इतके दिवस सैन्याबद्दल कुतूहल होते, पण तेथील वातावरण वेगळेच होते. माझ्या शाळेने माझ्या शिक्षणाचा भक्कम पाया घातला. पुढे जेव्हा बाहेरच्या जगात गेलो जिथे देशभरातून मुले आली होती, तिथे मला माझ्यातील दोन उणिवा प्रामुख्याने जाणवल्या आणि त्यामुळे सुरुवातीला त्रास झाला, पण मेहनत आणि निःश्चय यांच्या जोरावर मी त्या उणिवाही दूर केल्या. एक म्हणजे ओघवत्या भाषेत इंग्रजी बोलता येत नव्हते आणि दुसरी उणीव म्हणजे शारीरिक तंदुरुस्ती! आमच्या शाळेत पीटी आणि गेम्सचा तास होता, पण त्यावर जास्त भर दिला जात नव्हता. आपल्या शाळांतून अभ्यासावर जेवढा भर दिला जातो तेवढा खेळांवर आणि फिटनेसवर दिला जात नाही. मी आजकाल नेहमी म्हणतो, ''आता आपली पटांगणे कमी होत आहेत, इमारती वाढत आहेत, सकाळची/दुपारची शाळा यातच वेळ जातो!''

मन विचार करू लागले. यावर आपण मात कशी करायची?

कारण पब्लिक स्कूल किंवा सैनिकी स्कूलमधून येणाऱ्या मुलांचा फिजिकल फिटनेस कुठल्याकुठे असायचा! त्यामुळे पहिल्या आणि दुसऱ्या टर्मच्या सुट्टीमध्ये ठरवले की आता आपणच यातून मार्ग काढायचा. त्यावेळी NDAपर्यंतचा रस्ता ओसाड होता. सायकलवरून दररोज १७ किलोमीटर जायचो आणि परत यायचो. तिथे २ तास हॉर्स रायडींग करायचो. संध्याकाळी फर्ग्युसनच्या टेकडीवर जाऊन जोरात ओरडायचो, कमांड द्यायची सवय करायची म्हणून! दोन-तीन दिवसांनी पोलीस तिथे येऊन विचारू लागले, '' तू असा का ओरडतोस?'' त्यांना सांगितल्यावर ते हसले आणि परत गेले. अशा प्रकारे मेहनत आणि निश्चय यांच्या जोरावर ह्या उणिवांवरही मात केली. दुसऱ्या टर्मला जेव्हा मी गेलो तेव्हा माझ्यात खूपच फरक झाला होता. आत्मविश्वास वाढला होता. मला लहान मुलांना सांगावेसे वाटते की कित्येक गोष्टी या आपल्याला स्वतःलाच करायच्या असतात. दुसरे कोणी येऊन करेल म्हणून थांबायचे नसते. नंतर मात्र मी कधीच मागे वळून पाहिले नाही.

मी म्हटले, ''तुमचे हे उदाहरण ऐकून क्रांतिवीर लोकमान्य टिळकांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. शाळा सोडून, शालेय जीवनातील एक वर्ष खर्ची घालून, व्यायाम करून त्यांनी फिजिकल फिटनेस आत्मसात केला आणि नंतरच स्वातंत्र्य युद्धात उडी घेतली!''

एअर मार्शल गोखले त्यांनी दिलेले स्वतःचे उदाहरण बरेच काही सांगून जाते. आजच्या काळात शाळा, पालक तसेच विद्यार्थी यांनी आपल्यातील उणिवा जाणून खेळ आणि फिजिकल फिटनेसला महत्त्व दिले तर महाराष्ट्राचे चित्र नक्कीच बदलेल! धडधाकट शरीरयष्टी ही महाराष्ट्राची खरी गरज आहे!

एअर मार्शल गोखले भूतकाळाच्या आठवणींशी एवढे समरस झाले होते की जणू प्रत्येक प्रसंग आत्ताच घडत होता आणि म्हणूनच कधी ७१ च्या युद्धाच्या आठवणींनी, देशप्रेमाने त्यांना गहिवरून येत होते, तर कधी शत्रूविरुद्ध रक्त खवळत होते आणि सियाचीनच्या थरारक प्रसंगाने मन शहारत होते. ते सांगत होते आणि डोळ्यासमोर जणू तो प्रसंग उभा राहत होता.

NDAचे ट्रेनिंग संपले आणि नंतर अर्थातच फ्लाईंग सुरू झाले. अनेक प्रकारची विमाने चालवून झाली. फायटर एअर क्राफ्ट चालवणे हा एक विलक्षण अनुभव होता. 'बागडोग्रा' विमानतळावर मी साडेचार वर्षे होतो. दार्जिलिंगच्या पायथ्याशी अतिशय असे हे महत्त्वाचे क्षेत्र, तेव्हाच्या ईस्ट पाकिस्तानच्या डोक्यावर आहे. मी हंटर एअर क्राफ्ट चालवायचो आणि तिथे ७ स्क्वॉड्रन होते. त्याचा मोटो होता 'शत्रूंजय!' म्हणजे शत्रूवर विजय! अशा वेळी युद्धाच्या वेळच्या सर्व प्रकारच्या युक्त्या याव्या लागतात, आणि सुदैवाने माझ्या त्या सर्व पक्क्या झालेल्या होत्या. १९६२च्या युद्धानंतर जेव्हा ६५चे युद्ध झाले, तेव्हा पाकिस्तानला वाटले होते की आपण झट्कन भारताच्या विरुद्ध काही ना काही करू! त्यावेळी मी NDAत होतो, पण आम्हाला सर्व बातम्या कळत होत्या. एअर फोर्सने कसा विजय मिळवून दिला, नुसते थोपवूनच धरले नाही तर आपले सैन्य पार लाहोरपर्यंत पोचले होते. ह्या सर्व बातम्या उत्साहवर्धक होत्या. त्यामुळे ७१च्या युद्धाच्या वेळी अशीच मानसिक भावना केवळ तिन्ही दलातच नव्हे तर सर्व देशभर भारतीयांच्या मनात होती.

१९७१चा रोमांचक थरारक अनुभव ज्यांनी याची देही याची डोळा अनुभवला ते एअर मार्शल भूषण गोखले म्हणाले, ''मी भाग्यवान होतो की ७१च्या युद्धामध्ये ईस्ट आणि वेस्ट फ्रंटवर हंटर फायटर (Hunter fighter aircraft) घेऊन मी भाग घेऊ शकलो. माझा मोठा भाऊ त्यावेळी मुक्तिवाहिनींबरोबर प्रशिक्षण देण्यासाठी होता. त्यावेळी मोबाईलच काय पण लॅण्डलाईनही नव्हते. संपर्क करण्याचा काही मार्गच नव्हता. एकदोन महिन्यांनी पत्र पोचायची, ती पण सेन्सॉर्ड होऊन! पण आईवडिल खंबीर होते. 'नो न्यूज इज गुड न्यूज' अशी मनाची समजूत करून घेऊन दैनंदिन व्यवहार चालू होते.

३ डिसेंबरला पाकिस्तान्यांनी हल्ला केला आणि युद्ध सुरू होण्याची चिन्ह दिसू लागली. मी ज्युनिअर मोस्ट फ्लाईंग ऑफिसर होतो. आम्हाला चौघांना दुसऱ्या दिवशी सकाळी मिशनवर जायचे होते. माझे विंग कमांडर कोयलो यांनी त्या रात्री आम्हाला स्क्वॉड्रन मधेच रहायला सांगितले होते. हेतू हा की दुसऱ्या दिवशीच्या पहाटेच्या मिशनसाठी आम्ही तयार असावे! ती रात्र वेगळीच होती. मनात एक वेगळ्या प्रकारची अनामिक हुरहूर जाणवत होती, शत्रूवर हल्ला करायला हात शिवशिवत होते. रेडिओवर वारंवार सांगत होते की लवकरच एक महत्त्वाची सूचना घोषित होणार आहे. अखेर रात्री दहा वाजता त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी घोषणा केली की ''पाकिस्तानने हम पर हमला किया है, हम सही जवाब देंगे'' आणि युद्ध घोषित झाले.

एअर फोर्सचे युद्ध आर्मीपेक्षा वेगळे असे असते की आम्ही जेव्हा वरून गोळे टाकतो, बॉम्बिंग करतो, रॉकेट्स टाकतो तेव्हा प्रत्यक्ष रक्ताचा थरार अनुभवता येत नाही. पण नंतर मी भावाकडून जेव्हा ऐकले की जेव्हा त्याने पहिल्यांदा कोणाला मारले, तेव्हा काही वेगळेच वाटले. त्या भावनाच काही वेगळ्या असतात. शत्रूला मारण्यात एक वेगळा अनुभव मिळतो. त्या अनुभवात देशप्रेम, इर्षा, शत्रूबद्दलचा राग, सूड अशा अनेक भावभावनांचे मिश्रण असते. आम्ही पण अशा लाइव्ह फायरिंगची प्रॅक्टिस करत असू; चार डिसेंबरला सकाळी स्क्वॉड्रनची मानवंदना स्वीकारत मिशनला जायला तयार झालो तेव्हा एक वेगळीच भावना मनामध्ये निर्माण झाली.

आमचे मिशन जिथे होते, त्यावेळच्या पाकिस्तानच्या नॉर्थ वेस्ट भागाला हिली (Hilly) म्हणतात. तिथे पहिल्यांदा आम्ही रेल्वे स्टेशनचे जंक्शन होते त्याला उडवले, नंतर ऑइल टँकर्स होते त्यांना उडवले. पुढे तीन-चार दिवस तरी त्यातून धूर येत राहिला होता.

युद्ध म्हणजे काय ही जाणीव जी असते ती अशा प्रकारे पहिल्यांदा झाली. आत्तापर्यंत आपण शत्रूला पराभूत करायचे आहे, भारताला विजय मिळवून द्यायचा, त्यासाठी बलिदानाची सुद्धा तयारी

होती पण जेव्हा प्रत्यक्ष वेळ आली, सहकारी त्यात मारले गेले तेव्हा युद्धाचा खरा अर्थ कळला. बलिदानाची व्याख्या कळली! नाहीतर एअर फोर्समधील युद्ध हे तसे स्वच्छ असते.

त्यानंतर आमचे मिशन होते पाकिस्तानी सैन्याला मेघना नदीतून ढाक्क्याकडे घेऊन जाणाऱ्या बोटी आणि पाकिस्तानी आर्मीने भरलेल्या ढाक्काकडे जाणाऱ्या ट्रेन्सवर हल्ला करणे! आजही आठवते पाकिस्तानी सैनिक जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळत होते आणि आमचा जोरदार हल्ला चालू होता.

पूर्व पाकिस्तानवर हवाई वर्चस्व मिळवल्यानंतर आम्हाला बिकानेर जवळच्या 'नाल' या ठिकाणी पाठवले. इथे पहिल्याच मिशनमध्ये विंग कमांडर कोयलो यांचे विमान पडले आणि ते 'प्रिझन ऑफ वॉर' (prisoner of war) झाले. वर्षभर ते पाकिस्तानच्या prison मध्ये होते. ते आमच्यात सर्वात श्रेष्ठ आणि अनुभवी असे होते. आणि म्हणूनच शरीराचा एखादा अवयव जायबंदी व्हावा तसे आम्हाला वाटत होते.

मला आजही तो दिवस आठवतोय! माझे शेवटचे टू एअरक्राफ्ट बॉम्बिंग मिशन होते. मी त्याचा प्रमुख होतो आणि जवळपास त्याचवेळी इकडे ईस्टमध्ये लेफ्टनंट जनरल ए एके नायझी (पाकिस्तान), भारतीय आणि मुक्तिबाहिनी फोर्सेसना शरण आले आणि अखेर भारताच्या इतिहासात सर्व भारतीयांना अभिमान वाटेल अशी घटना घडली. तेरा दिवसात युद्ध थांबले. ९३००० पाकिस्तानी सैनिक युद्धकैदी झाले. भारताचा विजय झाला! एक नवीन देश जन्माला आला- बांगलादेश! केवळ तिन्ही दलासाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी ते अभिमानाचे क्षण होते. भूतकाळात जेव्हा डोकावतो तेव्हा लक्षात येते की ह्यातून अनेक सकारात्मक धडे शिकता आले. महत्त्वाचा धडा म्हणजे तिन्ही दले, सरकार राजकारणी नेते - या सर्वांमध्ये असलेली एकवाक्यता!

खरं म्हटलं तर देशाच्या दृष्टीने ही आनंदाची बातमी होती, पण आमच्या दृष्टीने नव्हती कारण वेस्ट पाकिस्तानला पण धडा शिकवायचा होता. त्यावेळचे सर्वच वातावरण वेगळे होते. देशाबद्दल उफाळून आलेले प्रेम, आपले मारले गेलेले सहकारी, त्यामुळे आलेला राग ह्या सर्वांमुळे शत्रूवर हल्ला करायचाच असतो, त्यासाठी रक्त सळसळत असते, मनामध्ये एक इर्षा असते, सर्व सैनिक 'मारेंगे या मरेंगे' या एकाच भावनेने प्रेरित झालेले असतात.

मी नेहमी म्हणतो की लढाई ही नेहमी लढण्यासाठी नसते तर ती जिंकण्यासाठी असते. सारखी नुसती लढाईच करत राहिलात तर देशाची प्रगती होणार नाही, जसे आज इराक अफगाणिस्तानमध्ये होत आहे. आर्म्ड फोर्सचे महत्त्व हे की त्यांच्याकडे सर्व प्रकारची तयारी असली पाहिजे. अनुभव पाहिजे आणि दुसरा आपल्यावर हल्ला करणार नाही ही क्षमता पाहिजे आणि जर समजा हल्ला झालाच तर तिथे धावपटू नाही तर विजेताच असला पाहिजे.

एवढ्या कालांतरानेसुद्धा गोखले साहेबांच्या डोळ्यांत तेच देशप्रेम तोच जोश, तीच इर्षा दिसत होती. ते पाहून मनात विचार आला सीमेवर लढून, प्रसंगी बलिदान करून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना आम्ही मात्र कालांतराने विसरून जातो, त्यांचा त्याग विसरतो, त्यांचे बलिदान विसरतो! माझ्या मनात विचारांचे काहूर माजले होते, पण ते मात्र तेवढ्याच तल्लीनतेने आठवणी सांगत होते.

माझ्या करिअरमध्ये नंतर देशात आणि देशाबाहेर सेवा करायची संधी मिळाली. भारतामध्ये सेवा करताना आपल्या देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये राहणाऱ्या लोकांशी संबंध आला. त्यांचे आचारविचार, राहणीमान जाणून घेता आले आणि खऱ्या अर्थाने 'विविधतेतील एकता' या वाक्याचा अर्थ समजला देशाबाहेर इराक, इजिप्त, रशिया इत्यादी ठिकाणी काम करायचा योग आला आणि तेव्हा देशाबाहेर सुद्धा भारतीय लोक उत्तम पद्धतीने काम करतात हे लक्षात आले. एअर मार्शल भूषण गोखले यांच्या प्रत्येक शब्दातून त्यांचे देशप्रेम, अनेकातून एकत्व प्रगट होणाऱ्या भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आणि भारतीयांबद्दलचा अभिमान प्रतीत होत होता.

मी त्यांना विचारले, ''तुमच्या करिअरमधील सर्वात अविस्मरणीय, थरारक असे कोणते मिशन होते?''

तेव्हा सर्वात धाडसी, रोमांचक अशा सियाचेन ऑपरेशनबद्दल सांगताना ते म्हणाले, मी एमआयजी २३ फायटर स्क्वॉड्रन (MIG 23 fighter squadron) चा कमांडिंग ऑफिसर (Commanding Officer) होतो. हे एक ग्राउंड अ‍ॅटक व्हर्जन (ground attack version) होते. हा अतिशय थरारक असा वेगळाच अनुभव होता. पाकिस्तानच्या हद्दीत जाऊन फोटोग्राफी करायची होती. माझ्या बरोबर आणखी एक सहकारी होता. शत्रूच्या हद्दीत जाऊन लपून फोटोग्राफी करणे म्हणजे मोठे आव्हान होते. त्यात काहीही होऊ शकले असते. पकडले जाऊन कैदी झालो असतो तर ते गोळीमुळे झालेल्या मृत्यूपेक्षा भयंकर ठरले असते. त्यासाठी आवश्यक होते धैर्य आणि बलिदानाची तयारी!

सियाचेन एक ओसाड, बर्फाच्छादित प्रदेश आहे, पण भारताच्या दृष्टीने त्याचे स्ट्रॅटेजिक महत्त्व (strategic importance) खूप आहे. हलवारा, जिथे आमचे स्क्वॉड्रन होते, तिथून सियाचेनला जाऊन परत यायला अडीच तास लागत होते. तो खूप लांबचा प्रवास होता. हे सिक्रेट मिशन होते. घरात सुद्धा कोणालाही सांगायचे नव्हते. दुसऱ्या दिवशी आमच्या धाकट्या मुलाचा वाढदिवस होता, पण थांबणे शक्यच नव्हते. सैनिकाचे पहिले प्रेम असते देश आणि नंतर कुटुंब! पहाटे मी तयार झालो फक्त त्यादिवशी मी कलर्ड ओव्हरऑल (coloured overall) घातला होता. बर्फातून तुम्ही जर बाहेर आलात तर ओळखता यावे म्हणून कलर्ड ओव्हरऑल घालतात. आणि ते पाहून माझी पत्नी मेघना थोडी आश्चर्यचकित झाली, पण ती बोलली काहीच नाही आणि त्यानंतर मी तिच्याकडे थोडे पैसे मागितले. इंडियन आणि पाकिस्तानी करन्सीमध्ये. जर पळून यायची वेळ आली तर थोडे पैसे जवळ असावेत म्हणून! मी तिला फक्त एवढेच म्हटले, ''सिक्रेट मिशन आहे.'' मेघनाच्या मनात नक्कीच अनेक पश्नांचे वादळ निर्माण झाले होते. शंकेची पाल मनात चुकचुकत होती. ते क्षणच असे होते की भीतीचे सावट निर्माण झाले असणार! दोघेही आपापली कामे करत होतो पण निःस्तब्ध होतो.

एरव्ही आवडणारी शांतता त्या क्षणी खूप भयाण वाटली. त्या गंभीर शांततेला छेद देत निरोप देताना मेघना एवढेच म्हणाली, 'ऑल दि बेस्ट!' मी मान हलवून तिला निरोप दिला. कित्येक वेळा शब्दांचे काम आपले नेत्र करतात. जणू माझ्या डोळ्यांनी तिला आश्वासन दिले की, 'घाबरू नकोस, मी परत येतोय!'

घराबाहेर पाऊल टाकले आणि कुटुंब, माया, प्रेम, मुलाचा वाढदिवस हे सर्व मी विसरलो. दिसत होते फक्त लक्ष्य! अर्जुनाचे लक्ष्य जसे पक्ष्याचा डोळा होते, तसे माझे लक्ष्य होते सियाचेन! अडीच तासांचे ते अंतर हजारो युगांचे अंतर वाटले मेघनाला! काम यशस्वी करून आम्ही दोघे पायलट परत आलो. अर्थातच दोन वेगवेगळी विमाने आली. विमानाची पहिली घरघर ऐकली तेव्हा माझ्या पत्नीच्या मनात साहजिकच प्रश्न निर्माण झाला, ''कोण बरे परत आले?'' नक्कीच दोघेही परत यायला पाहिजे होते पण तरीही मनामध्ये कुठेतरी... उघडपणे कोणालाही विचारता येत नव्हते. माझ्या सहकाऱ्याच्या पत्नीला माहीतही नव्हते की आपला नवरा कोणत्या मिशनवर गेला आहे. तेव्हा माझ्या पत्नीच्या मनात नक्कीच विचार आला असला पाहिजे की, 'खरंच अज्ञानात सुख आहे म्हणतात, त्याचा अर्थ आत्ता कळतो आहे.' तिच्या मनात अनामिक हुरहूर निर्माण झाली होती. हात काम करत होते, पण कान मात्र होते कुठे विमानाचा आवाज ऐकू येत आहे का ह्याकडे!

अखेर दुसरे विमानही परत आले आणि जीव भांड्यात पडला! जेव्हा माझ्याशी लग्नासाठी होकार दिला तेव्हाच तिला ह्या सर्व गोष्टींची कल्पना होती असे प्रसंग हे सैनिक आणि त्याच्या पत्नीच्या आयुष्याचा हिस्सा असतात. 'युद्धस्य कथा रम्या' असे जे म्हणतात ते खरं आहे अगदी, पण ते क्षण, ती वेळ जिवघेणी असते!

सियाचेनला तिबेटी भाषेत 'व्हॅली ऑफ रोझेस' (valley of roses) म्हणतात. माझी पत्नी भाग्यवान म्हटली पाहिजे की ती हेलिकॉप्टरने सियाचेनला जाऊ शकली व तिने तिथे एक गुलाबाचे झाड लावले. तिथे ट्रूप्स (troops) असतात पण त्यांचे कुटुंब मात्र तिथे राहू शकत नाही. त्यावेळी माझ्या पत्नीने तिथे जाऊन दिवाळीच्या वेळेस सर्वांना लाडू चिवडा दिला, त्यांच्याबरोबर संवाद साधला. फोटो काढले पत्रे वाचली. जेणे करून या सर्वांना कुटुंबापासून दूर रहात असताना, एक मानसिक आधार मिळाला, कोणीतरी आपली आपुलकीने चौकशी करतो, कुणाला तरी आपली आठवण आहे, ही जी भावना निर्माण होते ती भावना बराच काळ कुटुंबापासून दूर राहणाऱ्या जवानांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असते.

पाकिस्तानचे १८ सोल्जर्स एका सायक्लॉनमध्ये मारले गेले होते. तेव्हा लागलीच पाकिस्तानचे सुरू झाले, की आपण सियाचिनला न्यूट्रल करावे म्हणून! आपण आपल्या घराची एक इंच जागासुद्धा शेजाऱ्याला द्यायला तयार नसतो. मला असे वाटते, की सियाचेन हे अतिशय महत्त्वाचे असे ठिकाण आहे. मोठ्या कष्टाने आपण त्यावर वर्चस्व मिळविले आहे. तिथे आपल्या पुढच्या पिढीला ऊर्जा मिळेल. तिथे सूर्याची ऊर्जा आहे, वाऱ्याची ऊर्जा आहे आणि त्या जमिनीत खनिजाचा खूप मोठा साठा आहे. कारण काराकोरमची ही हद्द अफगाणिस्तानमधल्या हिंदुकुश पर्वतापर्यंत जाते. आज अफगाणिस्तानमध्ये खूप खनिज संपत्ती मिळते आहे, त्यामुळे पुढे सियाचेनमधे सुद्धा खनिजे मिळू शकतील. त्यामुळे आता कागदावर सही करून आणि आपला हक्क सोडून, पाकिस्तानला हा प्रदेश देऊ नये. त्यांच्यावर विश्वास ठेवण्यात काही अर्थ नाही. असे आपले स्पष्ट मत गोखले यांनी मांडले.

अनुभवांच्या मुशीतून तावून-सुलाखून व्यक्त झालेले अभ्यासपूर्ण आणि दूरदृष्टीने विचार करून व्यक्त झालेले एअर मार्शल भूषण गोखले यांचे हे मत भारताच्या पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरावे!

ते म्हणतात, मी नेहमी सर्वांना सांगत असतो की, 'आम्हाला आर्म्ड फोर्सेस म्हणा, डिफेन्स फोसेर्स म्हणू नका. सशस्त्र सेना म्हणा, संरक्षण सेना म्हणू नका.' सशस्त्र आणि संरक्षण यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणतात, ''संरक्षण म्हटले की बॅक फूटवर आल्यासारखे वाटते. कोणीतरी हल्ला केला की मग आम्ही संरक्षण करतो! पण आता इंडिया तशी राहिलेली नाही. आता चायनाची कुरबुर चालू आहे, पण चीनने हे लक्षात ठेवले पाहिजे की १९६२चा भारत आणि २०१७चा भारत वेगळे आहेत. त्यांच्यात जमीन आस्मानाचे अंतर आहे. आज भारतीय भारतात तसेच भारताबाहेरही अतिशय उत्तम प्रकारे स्वतःचा उद्योगधंदा-नोकरी करत आहेत. त्यामुळे मानसिक दृष्ट्या अशा प्रकारचा कमकुवतपणा योग्य नाही. याचा अर्थ असा नाही की आम्ही कोणावर जाऊन आक्रमण करणार आहोत, पण असे होता कामा नये की संरक्षणासाठी आम्ही सदैव दुसऱ्यांना पहिली संधी देणार!

'सर्जिकल स्ट्राइक' (surgical strike) मध्ये हे सर्व मुद्दे येतात. पाकिस्तान जेव्हा न्युक्लिअर वेपन्स (nuclear weapons) बद्दल बोलायला लागला, तेव्हा आम्ही फार विचार करत बसलो. मान्य आहे की बुद्धिबळात पुढची चाल खेळताना खूप विचार करून खेळावे लागते, पण न्युक्लिअर वेपन वापरणे सोपे नाही हे पण लक्षात घेतले पाहिजे. पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, 'आमच्याकडे 'टॅक्टिकल न्युक्लिअर वेपन्स' आहेत आणि मग घाबरून आम्ही सांगणार या आणि आम्हाला थप्पड मारा असे होता कामा नये.' शेवटी सर्जिकल स्ट्राइकमध्ये हेच सिद्ध झाले की पाकिस्तानच्या सीमेच्या आत घुसून त्यांच्या ठाण्यावर हल्ला करून, सुखरूप परत येऊन, आपण सक्षम आहोत हे आम्ही सिद्ध केले. मात्र आपण खोटेच सांगत असल्याचा आरोप पाकिस्तानने आणि आपल्या काही राजकीय पक्षांनी पण केला! पण आजचा भारत हा बदललेला भारत आहे. फक्त आम्ही सैनिकच नव्हे तर सर्व जनताही आक्रमक झाली आहे.'

एअर मार्शल भूषण गोखले यांनी २०१७ मधील भारताच्या सर्वांगीण परिस्थितीचे केलेले विश्लेषण त्यांच्या वैचारिक बुद्धिमत्तेची आणि सखोल अनुभवांची साक्ष देते. त्यांच्या डोळ्यांत दिसत होता भारतीयांच्या कर्तृत्वावरचा विश्वास! फक्त मानसिक कमकुवतपणा

काढून टाकून आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी ते भारतीयांना प्रेरित करत होते. ते म्हणतात की जसजसा अनुभव वाढत गेला, तसतशा माझ्या करिअरमध्ये मी निरनिराळ्या जबाबदाऱ्या स्वीकारत गेलो आणि हे करताना मला विविध प्रकारचे अनुभव मिळाले. मी वेगवेगळी विमाने पाठवली. त्यात MIG 23 squadron ची जबाबदारी हा माझ्या करिअरमधील सर्वोच्च बिंदू होता.

निरनिराळ्या ऑपरेशनचे प्लॅनिंग केले, स्ट्रॅटिजिक पॉलिसीज् बनवल्या. कारगिलच्या वेळी गोरखपूरमधील ऑपरेशनचे प्लॅनिंग केले. तिथे ३/४ स्क्वॉड्रन होती. त्यांचे नेतृत्त्व करण्याचे आणि त्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य मी केले. जेव्हा आपल्या संसदेवर हल्ला झाला तेव्हा आपण 'आयबॉल टु आयबॉल' असे होतो पण युद्ध झाले नाही. तेव्हा झालेल्या ऑपरेशन 'पराक्रम'चे संपूर्ण प्लॅनिंग करण्याची संधी मला मिळाली. त्यावेळी अटलजी पंतप्रधान होते. त्यानंतर नेपाळच्या राजघराण्यात जेव्हा वादळे निर्माण झाली किंवा श्रीलंकेच्या प्रश्नाच्या वेळी मनमोहन सिंग पंतप्रधान होते. त्यांना पण ब्रिफिंग करणे हा खूप मोठा वेगळा अनुभव मला मिळाला. ब्रिफिंग करताना तुमच्यावर एक नैतिक जबाबदारी असते. अजिबात खोटे बोलता कामा नये. चुकीचा अर्थ निघून तुमच्या माहितीमुळे चुकीचा रस्ता दाखवला जाऊ नये. जेव्हा जम्मूच्या मंदिरावर हल्ला झाला तेव्हा मी लाँग ब्रिफिंग दिले होते. आम्ही फ्लाईंग केले नाही पण संपूर्ण तयारी होती. त्या ऑपरेशनचे पूर्ण प्लॅनिंग माझे होते. असे विविध अनुभव घेत घेत नॅशनल सिक्युरिटी लेव्हल पर्यंत पोहोचता आले. बजेटच्या गोष्टी कळल्या. अशाप्रकारे देशाच्या सर्वच छोट्या-मोठ्या गोष्टीत सहभाग घेता आला आणि आता आयुष्याच्या या टप्प्यावर समाधान वाटते की प्रामाणिकपणे मी माझा सहयोग देशासाठी देऊ शकलो.

या माझ्या देशसेवेच्या सहयोगात माझ्या पत्नीचे योगदान फार मोठे आहे कारण तिची जर मनापासून साथ नसती तर माझ्या मिशनवर मी निर्धास्तपणे कधी जाऊच शकलो नसतो. आमचे लग्न १९७४ मध्ये झाले. माझी पत्नी मेघना ही माहेरची आपटे. तिचे आजी-आजोबा स्वातंत्र्यसैनिक होते. आज मी जो काही आहे त्यात माझ्या पत्नीचा सहभाग फार मोठा आहे. समाजाच्या इतर थरांमध्येही पुरुषांच्या यशात बायकोचा सहभाग असतो, पण आमच्या सैनिकी जीवनात तो थोडा वेगळा असतो कारण एकतर स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी बायकोवरच असते. कोणत्याही चिंता-काळज्या ह्या नवऱ्यापर्यंत पोहोचू द्यायच्या नसतात. थोडे जरी तुमचे चित्त विचलित झाले तरी देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे ती नैतिक जबाबदारी असते. तसेच आम्ही घरापासून लांब रहातो. हळूहळू आमचा कॅम्प हेच आमचे कुटुंब बनते. सणवार सुखदुःखं इथेच वाटली जातात. जसजसे तुम्ही 'सिनियर' होत जाता, तसतसे तुम्ही त्या कॅम्पचे 'गार्डिअन' बनता. त्यावेळी कुटुंबप्रमुख ह्या नात्याने त्यांची सुखदुःखं जाणून घ्यावी लागतात. अशावेळी माझ्या पत्नीने आईच्या नात्याने ह्या कुटुंबाचीही जी काळजी घेतली ती अनमोल होती. कोणाचा नवरा धारातीर्थी पडला, कोणाचा युद्धावर लढत आहे, कोणाच्या घराकडे वृद्ध आईवडिलांच्या चिंता असतात, कधी स्पेशल चिल्ड्रेन असतात त्यांची काळजी घ्यायची, अपघात झालेल्या, अपंग झालेल्या सैनिकांना, त्यांच्या बायकांना सर्वांना मानसिक आधार देऊन, त्यांच्या सुखदुःखात सहभागी झाल्याने जी आपुलकीची भावना निर्माण झाली, प्रेमाचा अनामिक धागा निर्माण झाला तो आज निवृत्तीनंतरही तसाच आहे, किंबहुना तो अधिक दृढ झाला आहे!

या सर्वांचे श्रेय माझ्या पत्नीला आहे. ज्यावेळी युद्ध चालू असते तेव्हा स्वतःच्या नवऱ्याच्या काळजीत गुरफटून न राहाता, टीव्हीपुढे सतत युद्धाच्या बातम्या बघून काळजी करणाऱ्या सैनिकांच्या बायकांचे लक्ष दुसऱ्या गोष्टीत गुंतवणे ही फार कठीण गोष्ट होती कारण त्यावेळी सर्वत्र वातावरणच तसे असते. उसने हास्य, निःशब्द, अनामिक भीती आणि खोलवर दडलेली हुरहूर! ह्या सर्व वातावरणाला आपल्या स्मितहास्याने आपुलकीच्या चार शब्दांनी, खांद्यावर थोपटलेल्या मायेच्या स्पर्शाने बोलके करायची माझी पत्नी मेघना! तिच्या स्वभावातील हा मोठा गुण होता आणि आज मला अभिमानाने सांगावेसे वाटते की त्यामुळेच मी तिच्यावर माझ्या दोन्ही कुटुंबांचा भार टाकून निश्चिंत मनाने यशाची पायरी चढत गेलो! 'Happy home is flight safety' हे आमचे ब्रीदवाक्य आहे आणि आमच्या ह्या ब्रीदवाक्याचा अर्थ आमच्या सहकाऱ्यांना समजला मेघनाच्या, आश्वासक नेत्रातूनआणि मायेच्या स्पर्शातून! मी इजिप्तमध्ये होतो तेव्हा 'मदर तेरेसा सोशल फाउंडेशन' (Mother Teresa Social Foundation) मध्ये तिचे काम चालू राही. 'एअरफोर्स वाईव्स वेल्फेअर असोसिएशन' (Airforce Wives Welfare Association) मध्येही तिचे योगदान फार मोठे आहे.

आपल्या पत्नीने आयुष्यभर जी अनमोल साथ दिली त्याबद्दल सांगताना एअर मार्शल भूषण गोखले यांचे मन भरून आले होते. ते पाहून माझे मन विचार करू लागले, देशाच्या रक्षणासाठी जिवाची पर्वा न करता सीमेवर आणि सीमेपाठी लढणाऱ्या तिन्ही दलातील जवानांचे आपण ऋणी आहोतच, पण त्यांच्या पत्नी कुटुंब यांचे पण ऋणी आहोत, मग ती एका सैनिकांची पत्नी असो किंवा अधिकाऱ्याची! पती सीमेवर लढत असताना, डोक्यावर सदैव मृत्यूची टांगती तलवार घेऊन, कुटुंबाची काळजी घेणे किंवा पतीबरोबर कॅम्पवर राहून त्या कुटुंबाची काळजी घेणे यासाठी लागते, धैर्य, कणखरपणा आणि त्यागी वृत्ती लागते. ह्यापेक्षा आणखी वेगळी समाज सेवा तरी कोणती? एका आईच्या भूमिकेतून निःस्वार्थीपणे आपल्या कॅम्पची, घराची काळजी घेणाऱ्या ह्या सर्व स्त्रियांना मानाचा मुजरा! त्यांची जर साथ नसेल तर आपले जवान योगदान देऊ शकणार नाहीत.

साडेतीन हजार तास विविध प्रकारची एअरक्राफ्ट चालवणारे एअर मार्शल भूषण गोखले विविध पुरस्कारांचे मानकरी ठरले. राष्ट्रपती पुरस्कार, परम विशिष्ट सेवा मेडल, अति विशिष्ट सेवा मेडल, वायू सेना मेडल पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. निवृत्तीनंतर, ११ मे २०१३ या 'राष्ट्रीय तंत्रज्ञान दिना'च्या प्रसंगी

अतिशय मानाच्या अशा अग्नी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. एअर मार्शल भूषण गोखले यांनी गगनात गरुड भरारी घेण्याच्या अनोख्या वेडाने १९६८ मध्ये आकाशाशी नाते जोडले आणि आता ३१ डिसेंबर २००७ रोजी निवृत्त झाल्यानंतर, सायंकाळी घरट्याकडे परतणाऱ्या पक्ष्याप्रमाणे, घराच्या सावलीत चार घटका विसावा घेतला, तो नवीन ईर्षेने पुन्हा 'टेक ऑफ' घेण्यासाठीच!

हवाई दलाचा उपप्रमुख म्हणून सन्मानाने निवृत्त झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी भारत सरकारने एअर मार्शल भूषण गोखले यांची राष्ट्रीय संरक्षण समिती आणि डीआरडीओ (Defence Research and Development Organisation) या दोन राष्ट्रीय संस्थांमध्ये सुरक्षा सल्लागार म्हणून नियुक्ती केली.

एअर मार्शल गोखले हे 'युनियन पब्लिक कमिशन'चे अभ्यागत सदस्य (Visiting Member) आहेत.

डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, पुणे या तसेच सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिजच्या संस्थांच्या कार्यकारिणीचे ते सदस्य आहेत. ज्यात १५८ लोकांना प्राण गमवावे लागले अशा एअर इंडिया एक्सप्रेस (मंगलोर) येथील अपघाताच्या संदर्भातील चौकशीबाबत विशेष न्यायालयीन अधिकार देऊन त्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. (मे २०१०)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात कार्यरत असलेल्या 'सेंटर फॉर ॲडव्हान्स स्ट्रॅटिजिक स्टडीज' या संस्थेचे ते संचालक आहेत. या संस्थेचे विशेष म्हणजे फक्त मुलींसाठी असे 'राणी लक्ष्मीबाई सैनिकी स्कूल' असून त्या संस्थेत सध्या ६५० विद्यार्थिनी सैनिकी शिक्षण घेत आहेत. त्यातील १४ मुलीना प्रत्यक्ष सैन्यात प्रवेश मिळाला आहे. या केंद्रातर्फे 'नॅशनल सिक्युरिटीज, नॅशनल डेव्हलपमेंट' हे नियतकालिक प्रकाशित होते. भूषण गोखले हे या नियतकालिकाचे संपादक आहेत. आजपर्यंत या नियतकालिकाचे चौदा अंक प्रसिद्ध झाले असून त्यात 'सायबर स्पेस', 'नेव्हल पॉवर', 'माउंटन वॉरफेअर' असे विविध विषय हाताळले जातात.

गोखले यांचे शालेय शिक्षण ज्या शाळेत झाले त्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे ते अध्यक्ष असून शाळेच्या, पर्यायाने विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ते कार्यरत आहेत. अशा प्रकारे निवृत्ती नंतरही अनेक प्रकारच्या सुरक्षाविषयक संस्था आणि शैक्षणिक संस्थांशी त्यांचे नाते जुळले आहे. दुसऱ्या महायुद्धापासून काश्मीरच्या धगधगत्या प्रश्नावर भाष्य करावयाचे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून देशाचे रक्षण करणाऱ्या सैन्यदलातील अधिकाऱ्यांना संरक्षणविषयक दिशा दाखवायची याकरिता प्रथम स्वतः वाचन करून त्या विषयाचे सखोल ज्ञान मिळवले पाहिजे ही त्यांची धारणा! त्यामुळे विविध विषयांवरील पुस्तकांचे त्यांचे वाचन सतत चालू असते. वाचन आपल्या विचारांचे क्षितिज रुंदावते आणि प्रगल्भ करते म्हणूनच भाषासंपत्ती आणि वाचनसमृद्धी वाढवण्यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात.

१९७७ मध्ये इराकपासून भारताबाहेरचा यांचा प्रवास सुरू झाला. विविध देशांची नाणी आणि नोटा अर्थातच चलन गोळा करण्याचा त्यांना छंद जडला. त्यातूनच नोटांच्या संग्रहाचे सहा खंड जमले. आशिया दक्षिण-उत्तर अमेरिका, आफ्रिका, युरोप, ओशियाना या सहा खंडात पन्नासहून अधिक देशात त्यांनी भ्रमंती केली.

हवाईदलाचा उपप्रमुख म्हणून सन्मानाने निवृत्त झालेल्या, एअर मार्शल भूषण गोखले यांचे निवृत्तीनंतरचे कार्य पहिले तर म्हणावेसे वाटते, 'He is neither tired nor retired ! यशाच्या अत्युच्च शिखरावर असतानाही, करिअरच्या सुरवातीलाच मिळालेल्या गुरुमंत्राचा, त्यांना विसर पडला नाही. आयुष्य हवेत गेले, पण पाय मात्र जमिनीवरच घट्ट रोवलेले आहेत आणि म्हणूनच त्यांना वाटते, ज्या समाजाने आपल्याला भरभरून दिले त्याला परत देण्याची वेळ आता आली आहे. आयुष्यभराच्या अनुभवांचा अनमोल खजिना मुक्त हस्ते सर्वांना वाटायचा आणि सर्व लोकांशी संवाद साधत त्यांच्याकडूनही शिकायचे ही त्यांची विचारधारा आहे.

'An optimist designed an aircraft and pesimist a parachute.' या मार्क ट्वेन (Mark Twain) ह्यांच्या वचनातील गर्भितार्थ लक्षात घेऊन, आयुष्यभर आशावादाच्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या भारताचे भूषण एअर मार्शल भूषण निळकंठ गोखले ह्यांना दीर्घायुरारोग्य लाभो आणि नवनवीन प्रकल्पांकडे त्यांची गरुडझेप उंचावत राहो अशा लक्ष-लक्ष शुभकामना!

**– मेघना अशोक वर्तक**

meghana.sahitya@gmail. com

ग्रंथाली




# कविता मनातल्या

**श्रीकांत पेटकर**

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**

'कविता मनातल्या'ची ऊर्जा मनाचा ठाव तर घेतेच तशीच ती मनातल्या मनात प्रतिक्रिया देण्यास भाग पाडते. सद्यस्थिती वर भाष्य असो किंवा मनातल्या भावनांबद्दल उद्गार असो कवी विचार करायला भाग पाडतो. हा कवितासंग्रह आपलं बोट धरून कवितांच्या प्रांतात घेऊन जातो.

सारस्वत बँक | 100 Years Young
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
शब्दांना सामर्थ्य अर्थाचे

# सारस्वत बँकेचा शतकोत्सव

**प्रतिनिधी**

''**भा**रतातील सध्याच्या विकासाच्या संधी पाहता, ज्या आर्थिक संस्था मजबूत, विश्वासार्ह व गतिशील आहेत अशा संस्थाच या संधीचा फायदा घेऊन देशाच्या विकासाला हातभार लावू शकतात आणि मी अत्यंत अभिमानाने येथे नमूद करू इच्छितो, की 'सारस्वत बँक' ही अशाच आर्थिक संस्थांपैकी एक आहे.'' हे कौतुकोद्गार आहेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे. 'सारस्वत बँके'च्या शतकमहोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त आयोजित केलेल्या सोहळ्यात ते बोलत होते. १४ सप्टेंबर २०१७ रोजी सारस्वत बँकेने शंभराव्या वर्षांत पदार्पण केले. यानिमित्त एक भव्य सोहळा 'षण्मुखानंद सभागृह', माटुंगा (पूर्व) येथे आयोजित केला होता. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, 'सारस्वत बँके'चे माजी अध्यक्ष सुरेश प्रभू, रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक सुदर्शन सेन आणि ज्येष्ठ समाजसेवक श्री. प्रकाश आमटे उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत करताना त्यांच्याविषयी गौरवोद्गार काढून बँकेचे अध्यक्ष श्री. गौतम ठाकूर आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, ''नुसते आकडे व आकार कधीच महत्त्वाचे नसतात. आज शंभराव्या वर्षांत पदार्पण करताना मागे वळून जेव्हा आम्ही विचार करतो की आपण खरं काय कमावलं तर ग्राहकांचा विश्वास आणि प्रेम. हीच तर आमची खरी पुंजी!

हल्ली एक नवीन चर्चा ऐकायला मिळते, की कुठल्या क्षेत्रातील बँका चांगल्या, पब्लिक सेक्टर, प्रायव्हेट सेक्टर की को-ऑपरेटिव्ह सेक्टर? माझ्या मते या चर्चेला काही अर्थ नाही. प्रत्येक सेक्टरमध्ये चांगल्या बँका आहेत आणि खरे तर आपण चांगले की वाईट ह्यापेक्षा आपल्या ग्राहकांचा दृष्टिकोन काय आहे हे जास्त महत्त्वाचे असते. सेक्टर ही केवळ एक व्यवस्था आहे आणि व्यवस्था कधीच चुकीची नसते, फक्त त्या व्यवस्थेचा वापर कसा करावा हे आपल्यावर अवलंबून असते. कारण शेवटी वित्तीय संस्थांची एक इको सिस्टिम आहे. कुठल्याही इको सिस्टिममध्ये there is everything from an Amoeba to an Elephant and everybody has enough space to co-exits.

सारस्वत बँकेने आतापर्यंत सात बुडीत किंवा अडचणीत असलेल्या बँकांचे विलीनीकरण करून त्यांच्या दहा लाखांपेक्षा जास्त ठेवीदारांना दिलासा दिला. आतासुद्धा कधी कुठली बँक अडचणीत आली की आम्हाला विचारण्यात येते की तुम्ही ती घेणार का? पण विलीनीकरण हे काही उत्तर नाही.

खरा प्रश्न विचारला पाहिजे की, बँका का बुडतात? त्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे चुकीची दिलेली कर्जे. मध्यंतरी आम्ही सिंधुदुर्ग जिल्ह्यात एक प्रयोग केला. बावीस पतसंस्थांच्या अधिकाऱ्यांना क्रेडिट प्रोसेसिंगबद्दल प्रशिक्षण दिले. एवढेच नव्हे तर तिकडल्या लहान-मोठ्या उद्योजकांना कर्ज घेताना काय तारतम्य पाळावीत ह्याचेही प्रशिक्षण दिले आणि त्याचा प्रतिसाद आम्हाला इतका उत्तम आला की तेथील पतसंस्था आणि उद्योजक हे कर्जप्रक्रियेबद्दल जागरूक झाले.

वित्तीय सर्वसमावेशकता (Financial Inclusion) ही जितकी महत्त्वाची आहे तेवढीच आर्थिक साक्षरता (Financial Literacy) महत्त्वाची. भारतात एक लाखांहून अधिक पतसंस्था आणि सुमारे दीड हजार सहकारी बँका आहेत. मग सहकारक्षेत्रातील सर्वात मोठी बँक म्हणून आम्ही शंभराव्या वर्षांत पदार्पण करताना सहकारक्षेत्रासाठी असे काय करू शकतो याचा जेव्हा संचालक मंडळाने विचार केला तेव्हा एक नवीन कल्पना समोर आली. ज्या सहकारक्षेत्राने आम्हाला मोठे केले, त्या क्षेत्राच्या सक्षमतेसाठी आणि भरभराटीसाठी आपण ना नफा ना तोटा तत्त्वावर एक प्रशिक्षण संस्था उभारावी, जेणेकरून संपूर्ण क्षेत्रातील क्रेडिट प्रोसेसिंग स्किल्स सुधारतील व बँका बुडण्याचे प्रमाण कमी होईल. या कामाची सुरुवात आम्ही ह्या शतकमहोत्सवी वर्षात करण्याचा संकल्प केला आहे, ज्याचा सहकार क्षेत्राला कायमस्वरूपी फायदा होईल. बहुतांश लहान उद्योजकांना पहिला आधार सहकारक्षेत्र देते आणि त्या बळावरच ते मोठे होतात. म्हणून सहकारक्षेत्र सक्षम आणि भक्कम व्हावे हे 'सारस्वत बँके'चे व्हिजन आहे. सहकार हा आमचा डीएनए आहे.''

यानंतर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बँकेच्या क्रेडिट कार्ड, प्रिपेड कार्ड व रूपे प्लॅटिनम कार्डचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत

करण्यात आले.

ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश आमटे यांनी बँकेशी असलेले नाते उलगडताना सांगितले, ''सारस्वत बँकेशी असलेले ऋणानुबंध आणि स्वर्गीय एकनाथ ठाकूरांशी असलेला बाबांचा स्नेह यामुळे आज मी या मंचावर उपस्थित आहे. ज्या क्षेत्रात आम्ही काम करतो त्या ठिकाणी आम्ही जायच्या आधी पैशांचा संबंधच आला नव्हता. वस्तुविनिमयपद्धतच अस्तित्वात होती. बाबांना सहकार चळवळ नेहमीच जवळची वाटली आहे. आपल्यापैकी बऱ्याच जणांना हे ठाऊक नसेल की धनंजय गाडगीळांबरोबर ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर होते. त्यावेळी त्या बँकेची चंद्रपूर जिल्ह्यातील पहिली शाखा बाबांनी हेमलकशात सुरू केली व तेथील रहिवाशांना बँकिंगशी, पर्यायाने पैशांशी, परिचय करून दिला.

स्वर्गीय एकनाथ ठाकूर व बाबा यांचा स्नेह अतिशय जवळचा होता. त्यांनी 'आनंदवन'ला दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी त्या काळी एक कोटी रुपयांची मदत केली होती.''

श्री सुदर्शन सेन, कार्यकारी संचालक, रिझर्व्ह बँक, आपल्या भाषणात म्हणाले, ''सारस्वत बँके'बरोबरचं माझं नातं तसं जुनंच आहे. जुलै २००५ मध्ये मी 'सारस्वत बँके'चं लेखा परीक्षण केलं होतं. जुलै २००५ची ती रात्र मुंबईतील कोणीही कधीही विसरू शकणार नाही.

एकंदर बँकिंग क्षेत्राची व्याप्ती पाहता सहकारी बँकांकडे केवळ ३.५ टक्के ठेवी व ३ टक्के कर्जे आहेत. गेल्या काही वर्षांत हा हिस्सा काहीसा रोडवला आहे. परंतु 'सारस्वत बँक' याला सन्माननीय अपवाद आहे. ज्यावेळी २००५ मध्ये 'सारस्वत बँके'चं लेखा परीक्षण केलं होतं त्यावेळी बँकेचा व्यवहार होता पंधरा हजार कोटी आणि आज तो पंचावन्न हजार कोटींवर पोचला आहे. बँकेची ही झेप खरोखरच कौतुकास्पद आहे.

माझ्या मते कोणत्याही सहकारी बँकेच्या अधोगतीस दोन गोष्टी कारणीभूत असतात– कॉर्पोरेट गव्हर्नन्समधील कमतरता व अंतर्गत नियमनातील त्रुटी. संचालक मंडळाकडे बँकिंगचा व त्यासंदर्भातील गोष्टींचा अनुभव असणे फार महत्त्वाचे आहे. आजही अनेक बँकांमध्ये व्यावसायिकतेचा अभाव आढळतो. अर्थातच सारस्वत बँक याला सन्माननीय अपवाद आहे.

बँकिंग क्षेत्रामध्ये विविध सेवा पुरवण्यासाठी तंत्रज्ञानाचा सुरेख वापर सध्या होतो आहे. नागरी सहकारी बँकांनीही काळाबरोबर चालण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील धोके लक्षात घेऊन त्याप्रमाणे पावले उचलण्याची गरज आहे. सारस्वत बँकेने या आधीच या संदर्भातील अंमलबजावणी केली आहे, हे बघून आनंद होतो.''

सुरेश प्रभू, केंद्रीय व्यापार व उद्योग मंत्री व बँकेचे माजी अध्यक्ष यावेळी बोलताना म्हणाले, ''मी आज जरा माझ्या भावनाविश्वात गेलोय. जवळपास ३५-३६ वर्षांपूर्वी मी सारस्वत बँकेचा संचालक झालो. आज सारस्वत बँकेकडे पाहता सारस्वत बँक खरोखरच मोठी झाल्याचं जाणवतंय. अशा या शंभर वर्षांकडे वाटचाल करणाऱ्या संस्थेला शुभेच्छा देण्यासाठी आपण जमलेलो आहोत. आज खरोखरच आनंद होतो, की लोकांच्या सहकार्यामुळे व प्रेमामुळे बँक अतिशय अल्पकाळात मोठी झाली आणि म्हणून सर्व समाजाच्या वतीने बँकेला, संचालकांना, सभासदांना व कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद देतो.

बँकेच्या व्यवस्थापनाचे कर्मचाऱ्यांशी संबंध नेहमीच सौहार्दाचे राहिले आहेत. कोणत्याही कर्मचाऱ्याला आलेली समस्या आपली मानून बँकेने त्याला मदत केली आहे. आणि म्हणूनच मगाशी गौतमचं भाषण ऐकताना माझी खात्री पटली, की, सारस्वत बँकेचं नेतृत्व एका जबाबदार व्यक्तीच्या हाती आहे. सहकारी बँका या बँकिंग क्षेत्राचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि थोड्या वेळापूर्वी सेन यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य तो वापर करून कालानुरूप बदललं पाहिजे.

सारस्वत बँक आणि तंत्रज्ञानाचा विषय निघतो त्यावेळी आपण अभिमानाने सांगू शकतो की असा निर्णय घेणारी सारस्वत बँक ही केवळ पहिली सहकारी बँकच नव्हे तर पहिली वित्तीय संस्था होती. नवनवीन गोष्टी अमलात आणण्याबाबत सारस्वत बँक




**केंद्रीय सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आपले विचार मांडताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक सुदर्शन सेन, नितीन गडकरी, केंद्रीय व्यापार मंत्री आणि उद्योगमंत्री व सारस्वत बँकेचे माजी अध्यक्ष सुरेश प्रभू, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे, उपाध्यक्ष शशिकांत साखळकर, कार्यकारी संचालिका सौ. स्मिता संघाने.**



**बँकेने प्रथमच सुरू केलेल्या क्रेडिट कार्ड, रूपे प्लॅटिनम डेबिट कार्ड, गिफ्ट कार्डचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रिझर्व्ह बँक कार्यकारी संचालक सुदर्शन सेन व डावीकडे, बँकेचे उपाध्यक्ष शशिकांत साखळकर, डॉ. प्रकाश आमटे, संचालिका स्मिता संघाने आणि बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर**

नेहमीच अग्रेसर राहिली आहे. मला आठवतंय, आपण आयोजित केलेल्या एका बँक परिषदेत स्टेट बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बसु यांनी मला विचारलं होतं, 'सध्या लोक विचारताहेत - सारस्वत बँक मोठी की स्टेट बँक मोठी.' हे घडलं कारण आपण नेहमीच नाविन्याची कास धरली. आपल्याला रिझर्व्ह बँकेने क्रेडिट इश्यू करायला नकार दिला तर आपण कॅनरा बँकेशी टाय-अप करून 'कॅनकार्ड' त्यावेळी बाजारात आणले होते. पहिला फॉरेक्स विभाग सारस्वत बँकेने सुरू केला होता. हे मी सांगण्याचं कारण म्हणजे मला हे सिद्ध करायचंय की सहकारी बँकासुद्धा इतर व्यावसायिक बँकांशी स्पर्धा करू शकतात. सारस्वत बँक हे याचं उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने सारस्वत बँकेसारख्या मोठ्या व उत्तम बँकेसाठी वेगळे धोरण आखण्याची आज गरज आहे. या बँकेची अन्य सहकारी बँकांबरोबर तुलना करणे गैर आहे.

कोणतीही संस्था यशस्वी होण्यासाठी, त्या संस्थेचं समाजातील व लोकांच्या मनातील स्थान अतिशय महत्त्वाचं असतं. सारस्वत बँकेने गेल्या शंभर वर्षांत समाजाच्या मनात जे स्थान मिळवलं आहे त्याच्या बळावर भविष्यातील येणाऱ्या कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यास सारस्वत बँक सक्षम आहे, याची मला पूर्ण खात्री आहे.''

नितीन गडकरी आपल्या भाषणात म्हणाले, ''सामान्य माणसाच्या भागभांडवलापासून सुरुवात करून आज सारस्वत बँक रु. ५५,००० कोटींच्या व्यवसायासह शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्याबद्दल मी अध्यक्षांचं, संचालकांचं, कर्मचाऱ्यांचं व भागधारकांचं मनापासून अभिनंदन करतो. सहकाराबद्दल महाराष्ट्रातील लोकांना बरीच माहिती आहे. सहकार चळवळ महाराष्ट्रात विकसित झाली आहे आणि सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण आणि कृषिक्षेत्रात मोठं परिवर्तनही घडलेलं आहे. परंतु देशाच्या अन्य भागात ही चळवळ काही यशस्वी होऊ शकली नाही. ही चळवळ केवळ महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, काही प्रमाणात छत्तीसगड व मध्यप्रदेश एवढ्या प्रदेशांतच मर्यादित राहिली. त्यामुळे दिल्लीत बसणारे अधिकारी व रिझर्व्ह बँकेचे अधिकारी यांना सहकार चळवळ एवढी यशस्वी होऊ शकते यावर अजूनही विश्वास नाही. गुजरातमधील एका सहकारी बँकेच्या घोटाळ्यामुळे सर्वांच्याच मनात सहकारी बँकांच्या विश्वसनीयतेबद्दल संशय निर्माण झाला होता, पण आपण एक लक्षात ठेवलं पाहिजे, प्रत्येक क्षेत्रात चांगली आणि वाईट माणसं असतात. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचं असेल तर संसाधनं व तंत्रज्ञान यांच्यापेक्षाही महत्त्वाची म्हणजे विश्वासार्हता. विश्वसार्हता हेच एकविसाव्या शतकातील भांडवल आहे. हीच विश्वासार्हता मला सारस्वत बँकेत पाहायला मिळतेय. संचालकांनी ती विश्वासार्हता जपली व बँकेला पुढे आणलं. त्यातच बँकेचं यश आहे. ही विश्वासार्हता जोपर्यंत आहे, तोपर्यंत सारस्वत बँक पुढेच जाणार आहे याची मला खात्री आहे. या विश्वसनीयतेबद्दल सारस्वत बँकेच्या संचालक मंडळाचं मी मनापासून अभिनंदन करतो.

आज मला रिझर्व्ह बँकेला एवढंच सांगायचं, की प्रत्येक अनुत्पादित कर्ज हे हेतुपुरस्सर केलेला घोटाळा नसतो. आपल्याला त्याच्या मागची खरी कारणं शोधली पाहिजेत. त्याचप्रमाणे एकदोन सहकारी बँका बुडाल्यावर सर्वच सहकारी बँकांचे संचालक त्याच प्रवृत्तीचे आहेत अशी विचारसरणी जर आपण बाळगत असू तर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर त्याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही आणि म्हणूनच ज्याप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये संम्मीलीकरणाची परवानगी आहे त्याचप्रमाणे सहकारी क्षेत्रातही त्याची परवानगी दिली पाहिजे आणि ही निर्णयप्रक्रिया त्वरित व पारदर्शक असायला हवी. सर्व अनुत्पादित कर्जे हेतुपुरस्सर केलेली नसतात. काही वेळा बाजारातील परिस्थितीमुळे अडचणी येऊ शकतात. या अडचणींच्या वेळी आपण कर्जदारांना मदत केली पाहिजे.

माझा आज तळागाळाच्या समाजापर्यंत संपर्क असल्याने सहकारी बँकांनी अशा लहान उद्योजकांना केलेली मदत मला ठाऊक आहे. आज महाराष्ट्रातील सहकारी बँकांमध्ये जवळपास अडीच

लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. सहकार चळवळ केवळ महाराष्ट्र व गुजरात राज्यातच यशस्वी झालेली दिसून येते. ही सहकाराची यथोगाथा सरकारी विभागांनी व रिझर्व्ह बँकेने समजावून घेतली पाहिजे. मी नेहमीच या चळवळीत सहकारी बँकांशी संवाद साधत असतो. माझी तुम्हाला विनंती आहे की, या बँकांचे खाजगीकरण न करता या चळवळीचा अधिक अभ्यास आपण करावा. या चळवळीत पारदर्शकता आणायची आणि काही उणीवा असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. या बँकांमध्ये गुणात्मक (Quantitative) सुधारणा होणे आवश्यक आहे. सारस्वत बँकेची यथोगाथा डोळ्यांसमोर ठेवून या बाकी सहकारी बँकांना आपण मार्गदर्शन केले पाहिजे.

मी इतर सहकारी बँकांना आवाहन करतो की, त्यांनी सारस्वत बँकेचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी. सहकारातूनच ग्रामीण व कृषिअर्थव्यवस्थेला बळकटी येणार आहे. मी नेहमीच पंतप्रधानांना व अर्थमंत्र्यांना याबद्दल माहिती देत असतो. सहकारामुळेच सामाजिक व आर्थिक वाढीला हातभार लागणार आहे.''

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ''आज सारस्वत बँक शतकमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे, त्याबद्दल मी सारस्वत बँक परिवाराचं मनापासून अभिनंदन करतो. पंचवीस वर्षांपूर्वी ज्यावेळी सहकारी बँकांना क्रेडिट कार्ड देण्याची परवानगी नसताना कॅनरा बँकेच्या सहकार्याने प्रभू साहेबांच्या नेतृत्वाखाली कॅनकार्ड सुरू केलं होतं आणि आज सारस्वत बँकेने स्वत:च्या क्रेडिट कार्डसह प्रिपेड कार्डही लाँच केलं आहे. पंचवीस वर्षांतील ही प्रगती खरोखरच कौतुकास्पद व आनंददायी आहे. सारस्वत बँकेने सुरुवातीपासूनच तंत्रज्ञानाला महत्त्व दिले आहे. बँकिंग क्षेत्रात जेवढे नवीन बदल घडले असतील त्याची सुरुवात सारस्वत बँकेत झाली. इंग्रजीमध्ये बँकेला आपण पायोनिअर म्हणू शकतो. एका छोट्या समूहासाठी सुरू झालेल्या या बँकेचा कक्षा रुंदावत गेल्या व एका राष्ट्रीय बँकेत तिचे रूपांतर झाले. देशाच्या अनेक राज्यांत सारस्वत बँक आपल्या ग्राहकांना सेवा पुरवीत आहे आणि जर रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली तर आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील आपली बँक घेऊन जा अशी माझी बँकेला विनंती आहे.

सहकाराच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे योगदान राज्याच्या व पर्यायाने देशाच्या विकासात अतुलनीय आहे. ग्राहकांबरोबर असलेले कौटुंबिक नाते हेच सहकारी बँकांचे भांडवल. एखाद्या नवउद्योजकाला एखाद्या खाजगी बँकेत असताना जे दडपण वाटते ते या बँकेत येताना वाटत नाही. यातूनच अनेक उद्योजक उभे राहिलेले आपण बघितले आहेत. त्यांच्या पाठीशी बँकही तेवढ्याच ताकदीने उभी राहिली आहे. आपण जर आपल्या देशाच्या विकासाच्या आर्थिक प्रक्रियेचा अभ्यास केला तर, आपल्याला असे लक्षात येईल की देशाच्या ज्या भागात आर्थिक संस्था उभ्या राहिल्या, तो तो भाग समृद्ध होत गेला.

मगाशी गौतमजींनी सांगितलं की, ते कर्जवितरण व कर्जासंबंधी मार्गदर्शनासाठी काही उपक्रम राबविणार आहेत. आर्थिक साक्षरता हा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा त्यांनी येथे मांडला आहे. याच माध्यमातून आपण आपली अर्थव्यवस्था मोठी करू शकतो. नितीनजींनी मगाशी सांगितल्याप्रमाणे आज आपल्या देशाचीच ताकद एवढी आहे, की आपण स्वत:च्या बळावर मोठे प्रकल्प पूर्ण करू शकतो. त्यासाठी या प्रकल्पास आम्हाला पारदर्शकता व गतिशिलता आणावी लागेल. याचबरोबर आपल्या रिझर्व्ह बँकेलादेखील व्याजदरांबाबत विचार करावा लागेल. जगाच्या पाठीवर हळूहळू व्याजदर कमी होत आहेत. त्यामुळे आपण आपल्या व्याजदरांबाबत फेरविचार केला नाही, तर अनेक समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागू शकते. रिझर्व्ह बँकेला काही धाडसी निर्णय घ्यावे लागतील.

आज इतक्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. आज जर या संधींचा वापर आपण योग्य रीतीने केला तर आपली अर्थव्यवस्था रुंदावण्यास, विकसित होण्यास मदत होणार आहे. इतर देशांच्या तुलनेत आपली लोकसंख्या तरुण आहे. सरासरी पंचवीस वर्षे वयोगटाची असलेली लोकसंख्या असलेल्या भारताने विकासाकडे वाटचाल केलीच पाहिजे. याबाबत जर आपण हे करू शकलो नाही तर यापुढे कधीच करता येणार नाही. या विकासाच्या प्रक्रियेत बँका व आर्थिक संस्था यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. या अभूतपूर्व संधीचा फायदा घ्यायचा असेल तर ज्या आर्थिक संस्था मजबूत, विश्वासार्ह व गतिशील आहेत अशा बँकाच या संधीचा फायदा घेऊन देशाच्या विकासाला हातभार लावू शकतात. आणि मी अत्यंत अभिमानाने व आनंदाने नमूद करू इच्छितो की सारस्वत बँक ही अशाच आर्थिक संस्थांपैकी आहे. गेल्या शंभर वर्षांत ज्या ज्या लोकांनी सारस्वत बँकेला पुढे आणण्यासाठी मेहनत केली अशा सर्व ज्ञात-अज्ञातांचं स्मरण केलं पाहिजे. नितीनजींनी सांगितल्याप्रमाणे एक लाख कोटी रुपयांचा टप्पा आपण लवकरात लवकर गाठावा आणि मलाही त्या सोहळ्यात आमंत्रित करावे अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.''

या सोहळ्यात अर्थ, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी उपस्थित राहून बँकेचे भरभरून कौतुक केले. बँकेचे मान्यवर ग्राहकही बँकेवरील प्रेमाखातर आवूर्जन उपस्थित राहिले. कार्यक्रमाचा आरंभ नव्या-जुन्या गाण्यांच्या कार्यक्रमाने झाला. त्याचे सूत्रसंचालन अंबरिष मिश्र यांनी केले.

●

# ॥ग्रंथाली॥*॥

## पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या - स्मिता भागवत



महाराष्ट्र स्वजनांवर कोरडे ओढणारा! म्हणून शतकांसाठी आदरणीय ठरण्याजोगे पावन प्रेम वर्तमानाच्या टाचक्या नजरेत भरले नाही. हा निष्पाप संबंध महाराष्ट्राने सबंग लफडे ठरवण्याचा कोतेपणा केला, हे केळकरकाकांच्या भेटीत नि नंतर अभ्यासात जाणवले. बाजीराव-काशीबाई-मस्तानी या त्रिदलाच्या सद्‌भावनेस दाद देणारे वास्तववादी लेखनकेल्याविना हे 'झाड' लेखिकेला सोडणार नाही, हे जाणवले, म्हणून हा लेखनप्रपंच!

मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.



## राखुळी - चांगदेव काळे

सुष्ट-दुष्टसंघर्ष सनातन आहे. मानवी विश्वात मर्यादेची लक्ष्मणरेषा आजही पाळली जात नाही. दुर्बल हतबल राहून अत्याचार सहन करत राहील तोवर तो अन्यायपीडित राहील. या सार्वकालिक सत्याला आपल्या ओघवत्या शैलीत, वेगळ्या कॅनव्हासवर चांगदेव काळे यांनी कादंबरीत चितारले आहे. यातील पात्रे, प्रसंग, त्यांचे हितसंबंध, नात्याची वीण, जगण्यातील मानसिक आंदोलने यांचे निखळ सुंदर वर्णन केले आहे. वाचकाला एक उत्तम कादंबरी वाचल्याचे समाधान 'राखुळी'मध्ये मिळते.

मूल्य ३०० रु. सवलतीत २०० रु.

## श्रेय ज्याचे त्यास द्यावे... - माधुरी अरुण शेवते



माधुरी अरुण शेवते यांचे हे पहिलेच पुस्तक आगळेवेगळे आहे. गुलजारसाहेब, यशवंतराव गडाख, टी.एन. धुबाळी, सासूबाई, मुलगी शर्वरी, पती अरुण, घराजवळ असलेले गुलमोहोराचे झाड, चंदाराणी या सगळ्यांची त्यांना जाणवलेली व्यक्तिमत्त्वे पारदर्शीपणे आणि उत्कटतेने उमटल्याचा अनुभव आपल्या देतात. ललित लेखनाचे हेच वैशिष्ट्य असते. माणसे अनुभवातून उलगडत जातात. वाचकांनाही त्यांचा सहवास घडतो.

मूल्य १२० रु. सवलतीत ८० रु.



## या फुलपाखराचं काय करायचं? - राधिका कुंटे

कधी 'माणूसपणाची गोष्ट' सांगितली जाते. कधी 'चांगुलपणा' किंवा 'सेल्फीचा शोध' घेतला जातो. कधी 'उन्हाळ्याला देखणेपणा'चं लेबल लावलं जातं. तर कधी पाऊस स्वतःच म्हणतो 'मी परतलोय'. कधी आठवणींच्या राज्यात जीव रंगतो आणि दंगतो. कधी 'निसर्ग मित्र' म्हणून अवतरतो. या सगळ्याला लिखाणाला वाचन आणि शब्दांवरच्या प्रेमाची, पर्यावरणस्नेहाची, 'स्व'च्या शोधाची हलकीशी किनार असते. आणि तरीही सारखं वाटत राहातं की, या फुलपाखराचं काय करायचं?

मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.

## भग्न आस्थेचे तुकडे - चंद्रशेखर सानेकर



गेल्या तीन दशकांपासून एकूणच कवितेच्या पुलाखालून रोजच नवनवीन पाणी वाहून जातंय. अशा परिस्थितीत कविता किंवा आपल्या कवितेविषयी काही ठोस विधान करणं म्हणजे हवेत कुंचला चालवून चित्र काढण्यासारखं आहे, असं चंद्रशेखर सानेकर यांना वाटतं. तथापि काही वर्षांपूर्वीच्या या कविता रसिकांशी शेअर कराव्यात असं आजही सानेकर यांना तीव्रपणे वाटतंय. म्हणून हा संग्रह.

मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.




## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१७ - सुधीर थत्ते/नंदिनी थत्ते

आजच्या मूलभूत शोधाच्या बीजात उद्याच्या तंत्रज्ञानाचा महावृक्ष लपलेला असतो. या तंत्रज्ञानरूपी महावृक्षाच्या दर्शनातून बौद्धिक आनंद तर मिळतोच. त्याचबरोबर तो पाहताना आपल्यासमोर उद्याचा भविष्यकाळ आणि त्यातल्या संधीही सामोऱ्या येतात. त्या संधींचा पट मूलभूत संशोधनापासून तर तंत्रज्ञानविकासापर्यंत पसरलेला आहे. त्या कर्तृत्व गाजवण्याची स्फूर्ती तुम्हाला मिळावी, यासाठीच ही 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने' सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते यांनी सादर केली आहे.

मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.


स्वप्नपूर्तीचे
नवीन वर्ष!
२०१८
बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे
नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!
महाबँकेचे सहज, सोपे आणि सुरक्षित कॅशलेस व्यवहाराचे पर्याय
महा-यूपीआय ॲप
महा-मोबाईल ॲप
इंटरनेट बँकिंग
एम-पॉस् मशिन
क्रेडिट/डेबिट कार्डस्
*नियम व अटी लागू
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
टोल फ्री नं.: 1800-233-4526 | वेबसाईट : www.bankofmaharashtra.in | नेट बँकिंग: https://www.mahaconnect.in
फोन किंवा ई-मेलच्या माध्यमाद्वारे आपल्या इंटरनेट बँकिंगची माहिती, जसे की युजर आयडी/पासवर्ड किंवा आपल्या क्रेडिट/डेबिट कार्डचा नंबर/सीव्हीव्ही/ओटीपी कोणालाही सांगू नये.

# ग्रंथाली वाचकदिन : क्षणचित्रे

॥ग्रंथाली॥
वाचकदिन
सोहळा
२४, २५ डिसें.२०१७




दर्दी
आणि
गर्दी...







# ब्लॉग... ब्लॉग... ब्लॉग...















'या फुलपाखराचं काय करायचं?' प्रकाशन आणि रंगलेली ब्लॉगचर्चा...
निळू दामले, राम जगताप, मुकेश माचकर, सचिन परब आणि डॉ. पी.एस. रामाणी यांनी केलेले कौतुक.

# ग्रंथाली वाचकदिन : क्षणचित्रे



अरविंद जगताप



सयाजी शिंदे



रमेश भाटकर



डॉ. निलेश साबळे



संजय जाधव



आम्ही सारे वाचतोच शिवाय आमची वाचनपसंती असते 'ग्रंथाली'ला...

नवी पुस्तके

१. पत्रास कारण की...
२. श्रेय ज्याचे त्यास द्यावे
३. राखुळी
४. या फुलपाखराचं काय करायचं?
४. पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या
५. मोराची बायको
६. प्लॅटफॉर्म नंबर ९
७. भग्न आस्थेचे तुकडे
८. नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१७
९. मराठी समकालीन कविता २०१७
१०. कविता मनातल्या








'पल्याडवासी'च्या दिग्दर्शिका
प्रगती कोळगे

# ग्रंथाली वाचकदिन : क्षणचित्रे



अस्मिता पांडे



हेमलता अंतरकर



सुदेश हिंगलासपूरकर



चांगदेव काळे



चंद्रशेखर सानेकर



सुधीर थत्ते



किरण येले





मनस्वी माणसे
मनमोकळी मनोगते
आणि
मान्यवर कवींचे
**सुरम्य**
**संस्मरण...**







# वाचक स्पर्धा






॥ वाचकांना वाचनाच्या प्रेमात पडणारी वाचकस्पर्धा ॥





॥ वाचनाला वयाची अडचण नाही... ॥











॥ अखेर वाचकच जिंकतो! ॥

# ग्रंथपाल कार्यशाळा




॥ आम्ही वाचायलाही शिकवतो... ॥




॥ ग्रंथ, ग्रंथपाल आणि ग्रंथालये वाचकासाठीच असतात ॥

## मराठी अभ्यास केंद्र आणि डी.एस्. हायस्कूल आयोजित मराठीप्रेमी पालक महासंमेलन

'आपली भाषा, आपल्या शाळा, आपली मुलं' या पुस्तकाचे संमेलनाच्या उद्घाटन सत्रात प्रकाशन





प्रयोगशील शाळांची दालने - एक अनुभव



ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मॅक्सिन बर्न्सन यांच्या उपस्थितीत संमेलनाचा समारोप



आम्ही अजून कमी केले गृह कर्जावरील व्याजदर
आता तुम्हाला घेता येईल अधिक मोठे घर
8.30% प्रतिवर्ष या
किमान व्याजदराचा
लाभ घ्या
यूनियन होम
5 दिवसात मंजुरी
परतफेडीची मुदत 30 वर्षापर्यंत
प्रोसेसिंग शुल्क नाही
अटी लागू
कर्जासाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा । दैनिक घटत्या शिलकीवर व्याजआकारणी
गौरवशाली भागीदार
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
भारतीय बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य
हेल्पलाईन नं.: 1800 208 2244 / 1800 22 2244 (टोल फ्री नं.) । 080 2530 0175 (सशुल्क) । +91 80 2530 2510 (एनआरआयसाठी)
www.unionbankofindia.co.in | @UnionBankOfficial @UnionBankTweets UnionBankInsta UnionBankofIndiaUtube unionbankofindia

# रामायणातील अनुल्लेखित कथा

**धनंजय गांगल**

**म**ध्यंतरी कुठल्या चर्चेत कोणीतरी रामायणात लक्ष्मणाने उर्मिलेवर केलेल्या अन्यायाचा उल्लेख केला. लक्ष्मण चौदा वर्षे वनवासात आपली पत्नी उर्मिला हिच्यापासून दूर राहिला. असो. उर्मिला लक्ष्मणाबरोबर वनवासात का गेली नाही ह्याचं कुतूहल वाटून थोडा शोध घेतला. रामायणाच्या वेगवेगळ्या रचना आणि विविध कथा प्रचलित आहेत. काही कथांचा तर एकमेकांशी पूर्ण विरोधाभास आहे.

अशाच काही रामायणात यासंबंधी एक रंजक गोष्ट सापडली. राम-सीतेसोबत उर्मिला व लक्ष्मणही वनवासात जाणार होते. लक्ष्मणाला पुढील चौदा वर्षे चोवीस तास राम-सीतेचे रक्षण करायची जबाबदारी होती. म्हणून त्याने वनवासात निघण्यापूर्वी निद्रादेवीची आराधना केली - यज्ञ केला. निद्रादेवी प्रसन्न झाली. लक्ष्मणाने निद्रादेवीकडे पुढील चौदा वर्ष संपूर्ण निद्रानाशाची मागणी केली. निद्रादेवी म्हणाली हे घडेल पण एका अटीवर. तुझ्याऐवजी कोणीतरी ही निद्रा स्वत:वर घेतली पाहिजे. ती व्यक्ती पुढची चौदा वर्षे पूर्ण निद्रेत असेल - एकप्रकारे तिच्या आयुष्याची चौदा वर्षे ती पाहणार नाही. सगळेच या चमत्कारिक अटीमुळे विचारात पडले आणि एकमेकांकडे पाहू लागले. तेवढ्यात उर्मिला पुढे झाली आणि तिने ती अट स्वीकारली. यथावकाश राम-लक्ष्मण, सीता वनवासात निघाले आणि उर्मिला चौदा वर्षांसाठी निद्रेच्या आहारी गेली. रावणाचा पुत्र इंद्रजित ऊर्फ मेघनाथ याच्या मृत्यूशीही लक्ष्मणाच्या या निद्रानाशाचा संबंध आहे. मेघनाथाला असा वर मिळालेला असतो की, गुडकेश म्हणजे निद्रेवर विजय मिळवलेला योद्धाच फक्त मेघनाथावर विजय मिळवू शकेल. गुडक म्हणजे निद्रा किंवा डुलकी आणि गुडकेश म्हणजे त्यावर विजय मिळवलेला. गुडकेशचा दुसरा अर्थ अज्ञानावर विजय मिळवलेला म्हणून महाभारतात अर्जुनाचाही उल्लेख आहे. काही ठिकाणी गुडकेश म्हणजे चक्क कुरळे केस असलेला असाही उल्लेख आहे - लक्ष्मणाचे आणि अर्जुनाचे केस कुरळे होते! असो. युद्धात लक्ष्मणच मेघनाथला ठार मारतो. शेवटी चौदा वर्षांनी राम-लक्ष्मण, सीता रावणावर विजय मिळवून अयोध्येत परत आले. रामाच्या राज्याभिषेकाची तयारी जवळ जवळ पूर्ण होत आली. आणि उर्मिलेला चौदा वर्षांच्या निद्रेनंतर जाग येऊ लागली. दुसरीकडे लक्ष्मणावर निद्रादेवीच्या अंमल चढू लागला. या योगायोगाचे त्याला हसू आले आणि तो म्हणाला काय हा दैवदुर्विलास! ज्यासाठी मी हा सगळा अट्टाहास केला तो रामाचा राज्याभिषेक मी बघू शकणार नाही आणि उर्मिला जी गेल्या चौदा वर्षांतील घडामोडींबद्दल पूर्ण अनभिज्ञ आहे तिला मात्र निद्रेतून जाग येताच हे भाग्य प्राप्त होतंय. लक्ष्मणाला नंतर कधी जाग आली त्याबद्दल काही उल्लेख नाहीत, पण तो रामाच्या राज्याभिषेकावेळी मात्र निद्रिस्त होता!! लक्ष्मण आणि उर्मिलेच्या या त्यागाची आठवण म्हणून अनेक समाजांत - रामाच्या राज्याभिषेकासदृश्य - मोठ्या सण-समारंभात घरातल्या एका मुख्य व्यक्तीनं काही काळ गैरहजर राहण्याची प्रथा आहे.

या निद्रादेवीची अजून एक कथा आहे. रावण, बिभीषण आणि कुंभकर्ण हे तिघे भाऊ. कुंभकर्णाला एकदा इंद्रासनाची इच्छा होते. तो प्रजापती ब्रह्माची कठोर आराधना करू लागतो. इथे इंद्राचं सिंहासन हलायला लागल्यानं इंद्र घाबरून निद्रादेवीला साकडं घालतो. ती काहीएक विचार करून सरस्वतीकडे शब्द टाकते. दुसरीकडे प्रजापती ब्रह्मदेव कुंभकर्णाला प्रसन्न होतो. त्याच्याकडे वर मागताना वाणीची देवी सरस्वती त्याची जीभ तोतरी करते. आणि कुंभकर्ण कायमच्या इंद्रसनाऐवजी निद्रासन उच्चारतो. प्रजापती तथास्तू म्हणतो आणि कुंभकर्ण कायमचा झोपी जातो! पुढे रावण आणि बिभीषण शिवाची आराधना करून ब्रह्मदेवाकडे दयेची याचना करतात. मग ब्रह्मदेव वर थोडा मागे घेऊन - वर्षात अर्धा काळ झोप आणि अर्धा काळ जागं राहण्याचा उ:शाप देतो.

रामाच्या आधी दशरथ आणि कौसल्येला शांता नावाची मुलगी होती. अंगदेशाचा राजा रोमपाद हा दशरथाचा गुरूबंधू. त्याची पत्नी वर्षिनी ही कौशल्येची मोठी बहीण. त्यांना मुलंबाळ नसतं. एकदा थट्टेत काही पुढेमागे बोललं जातं. थट्टेतही - रघुकुल दिलेल्या शब्दाला जागतात म्हणून शांता ही रोमपाद आणि वर्षिनीला दत्तक दिली जाते! एकदा राजा रोमपाद आणि मुलगी शांता बोलण्यात मग्न असतात. तेवढ्यात इंद्रदेवाच्या एका शिष्य ऋषींचं आगमन होतं. रोमपाद व मुलगी शांता बोलण्यात एवढे मग्न असतात की या ऋषींकडे त्यांचं नकळत दुर्लक्ष होतं. हे इंद्रदेवाला कळतं तेव्हा

तो त्याला त्याचा अपमान वाटतो. इंद्रदेव ही पर्जन्याची देवता! तो अंगदेशात दुष्काळ पाडतो. आता इंद्रदेवाला परत प्रसन्न करण्यासाठी राजा रोमपाद रिष्यश्रींग ऋषींना विनंती करतो. आता या रिष्यश्रींग ऋषींचीही मोठी कहाणी आहे, पण ती कधीतरी नंतर. हे ऋषी यज्ञ यशस्वी करून राज्यात पर्जन्यवृष्टी परत आणतात. त्यामुळे आनंदीत होऊन दशरथ आणि रोमपाद राजा-राणी आपली मुलगी शांता हिचं लग्न रिष्यश्रींग ऋषींशी लावून देतात!! या टप्प्यावर अजून दशरथालाही मूल नसतं म्हणून तो याच ऋषींकडून पुढे पुत्रकामेष्टी यज्ञ करतो. ज्यात अग्निदेव प्रसन्न होऊन दशरथाच्या तीन राण्यांना प्रसाद देतो. ज्यातून राम, भरत आणि लक्ष्मण-शत्रुघ्न या जुळ्यांचा जन्म होतो. उल्लेख आढळतो, की या प्रसादातील काही भाग एक गरुड पळवतो. उडता उडता तो त्याच्या चोचीतून सांडतो. जो वरुणदेव अंजेयाच्या पदरात टाकतो. त्यातून हनुमानाचा जन्म होतो! महाभारतातील धृतराष्ट्राच्या रथाचा सारथी आधिरथ. आधिरथाची पत्नी राधा. या दोघांनी कर्णाला वाढवले. आधिरथ हा राजा रोमपादाच्या वंशातला !!!

रावण एकदा शिवभेटीला जात असताना नंदीची थट्टा उडवतो. त्यावरून नंदी त्याला शाप देतो की एका वानराकडून त्याची लंका उद्ध्वस्त होईल. रावणाचा मुलगा इंद्रजित ऊर्फ मेघनाद यालाही असाच शाप असतो की शेषनागाचा अवतार त्याच्या मृत्यूस कारणीभूत होईल. लक्ष्मण हा शेषनागाचा अवतार असल्याचा मेघनादाला अंदाज असतो. म्हणून तो शेषनागाची कन्या सुलोचना हिच्याशी विवाह करतो. हेतू हा की शेषनाग आपल्या जावयाचा जीव घेणार नाही. पण लक्ष्मण मेघनादाला मारतोच. त्याबद्दल कुठे काही कथा किंवा विवेचन नाही.

सत्ययुगात हिरण्यकश्यपू आणि हिरण्याक्ष हे भाऊ. त्यांचा मृत्यू नरसिंह आणि वराह यांच्या हातून होतो. त्रेतायुगात ते भाऊ रावण आणि कुंभकर्ण म्हणून जन्म घेतात. बिभीषणाचा इथे उल्लेख नाही. या दोघांचा मृत्यू रामाच्या हातून होतो. द्वापारयुगात हे दोघे दंतवक्र आणि शिशुपाल म्हणून जन्म घेतात. इथे यांचा मृत्यू कृष्णाच्या हातून होतो. हे दोघे मूळचे जय-विजय असे विष्णूचे द्वारपाल. ब्रह्मदेवाचे कुमार विष्णूभेटीसाठी येतात तेव्हा अपमान होतो म्हणून ते दोघांना भूतलावर माणूस म्हणून जाण्याचा शाप देतात. पुढे विष्णू त्यातून मार्ग काढतात. जय-विजय यांना दोन पर्याय दिले जातात. एक म्हणजे सात वेळा मनुष्य जन्म. किंवा तीन वेळा तीन युगांत राक्षस जन्म आणि विष्णूअवताराकडून मृत्यू. ते आनंदाने दुसरा पर्याय स्वीकारतात.

रामायणातील सर्वात लोकप्रिय लक्ष्मणरेखेचा उल्लेख - मूळ वाल्मीकी रामायण किंवा तुलसीदास रामचरितमानास या दोन्ही ग्रंथात नाही!

अशा ह्या रामायणातील गमतीदार कथा.

**- धनंजय गांगल**
**भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०**
dhananjay.gangal@gmail.com




**ग्रंथाली**

**मुद्रणातील मानदंड**
**श्री. आनंद लिमये**
(इंडिया प्रिंटिंग वर्क्स)
**यांना प्रिंटिंगसाठी मिळालेल्या**
**रौप्य पुरस्काराबद्दल**
**त्यांचे मन:पूर्वक**
**अभिनंदन**



# उत्तम साहित्याचा आस्वाद घडवणारी 'ग्रंथाली'ची अभिवाचन स्पर्धा

**राजीव जोशी**

**आ**जवर 'ग्रंथाली' ह्या वाचक चळवळीने अनेक वाचक-लक्ष्यी उपक्रम केले, त्यापैकी अलीकडचा उपक्रम म्हणजे अभिवाचन स्पर्धा. एकांकिका किंवा नाटकातील तयार संवाद न घेता, साहित्य-कृती म्हणजेच कथा, कादंबऱ्या, ललित-लेख तसेच चरित्र-आत्मचरित्र अशा साहित्यातील विविध दालनातील लिखाणाचा वापर अभिवाचन' करण्यासाठी केला जावा की ज्यायोगे पुस्तकातील साहित्य अनेक वाचकांपर्यंत सहजपणे पोहोचू शकेल, अशी संकल्पना असलेल्या या स्पर्धेला रंगकर्मी आणि वाचकांचा छान प्रतिसाद मिळाला तर आश्चर्य नव्हे! याही वर्षी अनेक स्पर्धक ह्यात हिरिरीने सहभागी झाले.



यंदाच्या अभिवाचन स्पर्धेची वैशिष्ट्ये - स्पर्धकांनी आपले उतारे निवडताना जे वैविध्य दाखवले, त्यावरून त्यांची वाचनाची अभिरुची दिसून आली. उदाहरणार्थ - ना. सं. इनामदार, विद्याधर पुंडलिक, सुनिताबाई देशपांडे, गंगाधर गाडगीळ, विजय तेंडुलकर, मिलिंद बोकील अशा अनेक नामवंतांच्या उत्तम लिखाणातील उतारे कल्पकतेने निवडलेले होते. त्याचप्रमाणे संपदा जोगळेकरांसारख्या आजच्या लेखिक व रंगकर्मींच्या साहित्याचे वाचनही केले गेले. पूनम चांदोरकरसारख्या रंगकर्मीने आजच्या वास्तवाशी निगडित स्वलिखित उतारा सादर केला. कथा, कादंबरी ह्यांच्याबरोबरीने ललित लेख, राजकीय व सामाजिक संदर्भ असलेले लेखदेखील वाचले गेले. इतकेच नव्हे तर अंबरनाथसारख्या दूरवरील उपनगरातील ग्रंथालयातील महिला कर्मचाऱ्यांनी स्त्री-लेखिकांची आत्मचरित्रे एकत्र जोडून त्यातील समान धागा वाचक-वर्गाकडे नेण्याचा प्रयत्न केला. ठाणे येथे कार्यरत असलेल्या एका संस्थेतील काही महिलांनी इनामदारांच्या ऐतिहासिक कादंबरीतील 'चमेली' आणि 'अमृत' ह्या व्यक्तिरेखा आणि नाट्यपूर्ण प्रसंग खूप छान पद्धतीने सादर केले. 'बेबी-डॉल'सारख्या सादरीकरणातून छोट्या मुलीचे भावविश्व अतिशय नाजूकपणे सादर केले गेले.

रंगभूमी आणि साहित्यविषयक काम करणाऱ्या दीपा ठाणेकर, धनश्री करमरकर, छाया पिंगे आणि चित्रा वाघ ह्या रवींद्र पिंगे ह्यांच्या स्नुषा आणि कन्या, नाटकात काम करणारी तरुण कलावती पूजा रायबागी तसेच शर्वरी कुलकर्णी ही ललित-कला केंद्रात अभिनय प्रशिक्षण घेणारी संपदा जोगळेकर-कुलकर्णी ह्यांची कन्या या आवर्जून सहभागी झाल्या होत्या. लक्ष्मण लोंढे ह्यांच्या पत्नी स्वाती लोंढे देखील स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. विवेक पिंपुटकर, प्रसाद पवार, स्वप्नील फडके, शिवाली परब, संजीव भारत तांडेल अशा तरुण रंगकर्मींचा सहभाग उत्साहवर्धक होता.

प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा स्वरुपात ही अनोखी स्पर्धा घेण्यात आली आणि त्यातून तीन सर्वोत्तम संघ निवडले गेले, अन्य संघाना प्रमाणपत्र देण्यात आले आणि विजेत्यांना रोख पारितोषिके, शिवाय सर्व सहभागी व्यक्तींना 'ग्रंथाली'तर्फे पुस्तके भेट देण्यात आली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मेधा अलकारी, अस्मिता पांडे, प्रमोद लिमये, राजीव जोशी आणि प्रदीप राणे या रंगभूमी आणि साहित्याशी संबंधित मान्यवरांना निमंत्रित केले होते. आणि संपूर्ण अभिवाचन स्पर्धेची धुरा सातत्याने अभिवाचन चळवळीचा ध्यास घेतलेले ज्येष्ठ रंगकर्मी चंद्रकांत मेहेंदळे आणि लेखक-दिग्दर्शक व आवाजविषयक कार्यशाळा घेणारे श्रीनिवास नार्वेकर ह्यांनी सांभाळली होती. अशी ही साहित्य आणि रंगमंच ह्यांचा समन्वय साधून थेट वाचक-संवाद साधणारी स्पर्धा नजीकच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर जाईल आणि नव-नवे वाचक वाढत राहतील अशी खात्री वाटते आहे.

विजेत्यांची नावे : प्रथम-धनश्री करमरकर आणि संघ, द्वितीय-वृंदा दाभोळकर आणि संघ, तृतीय-पूजा रायबागी आणि संघ.

# आजचा वाचक काय वाचतोय? ...हे जाणून घेणारी वाचक स्पर्धा

**प्रा. दीपा ठाणेकर**

**वा**चकदिन सोहळ्यातील स्पर्धेची समन्वयक म्हणून जबाबदारी माझ्याकडे सुपूर्त करण्यात आली होती. ही जबाबदारी स्वीकारताना आनंद झाला कारण आजचा वाचक वर्ग काय वाचतोय हे प्रत्यक्ष जाणण्याची संधी यामुळे प्राप्त होणार होती.

साधारण एक महिना अगोदर ह्या वाचक स्पर्धेविषयी सोशल मीडिया वर पोस्ट पाठविल्या गेल्या होत्या. महिन्याभरात साधारण ५५ जणांनी ह्या स्पर्धेसाठी स्पर्धक म्हणून नाव नोंदवण्याची इच्छा दर्शविली. रविवारी, २४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता ही स्पर्धा सुरु होणार होती पण स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला यामुळे स्पर्धेची वेळ दुपारी २ च्या ऐवजी सकाळी ११ ची करण्यात आली.

वाचक स्पर्धेत कोणत्याही 'स्वरचित' व कोणत्याही लेखकाच्या साहित्यकृतींचे वाचन अभिप्रेत होते आणि वाचनासहित त्या साहित्यकृतीचे रसग्रहणही करणे अगत्याचे होते. त्यामुळे ही केवळ वाचक स्पर्धा नव्हती तर आपल्याला आवडलेल्या साहित्यकृतीवर आस्वादात्मक, सौंदर्यात्मक मतही व्यक्त करायचे होते. त्यामुळे ही स्पर्धा तशी अटीतटीची होती.

वाचनासाठी स्पर्धकांना ७ मिनिटे वाचन आणि आपण वाचलेल्या साहित्यकृतीवर किमान ३ मिनिटे रसग्रहण असे सादरीकरण करावयाचे होते. उपस्थितांमध्ये २२ युवा तर २४ ज्येष्ठ वाचकांनी सहभाग दर्शवला.

स्वलिखित लेख, कविता, कथा, अनुवादित साहित्य ते इंदिरा संत, व्यंकटेश माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर, वि. द. घाटे, सुनीता देशपांडे, द. मा. मिरासदार, विजया मेहता, श्याम मनोहर, प्रणव सखदेव, धनश्री लेले, पु.ल. देशपांडे, दत्तात्रेय सैतवडेकर, वसंत वसंत लिमये, पंढरीनाथ रेगे, माधवी कुंटे अशा अनेक नव्या-जुन्या साहित्यकारांच्या साहित्यकृतींचे वाचन आणि त्याचे रसग्रहण वाचकांनी केले. अर्थात रसग्रहण मांडण्याची हातोटी काहीच जणांना साध्य करता आली, पण प्रत्येक वाचकाचा प्रयत्न प्रामाणिक होता.

ह्या प्रार्थमिक फेरीसाठी चांगदेव काळे, सुधीर चित्ते आणि अस्मिता पांडे हे परीक्षक म्हणून उपस्थित होते.

या ४६ स्पर्धकांमधून अंजली गोडबोले, सचिन भुसारी, माधुरी लोणकर, माधवी शिंत्रे, उज्ज्वला धानजी, राजश्री घडीकर, शिवराम गावडे, श्लोक शुरुषे, धनश्री करमरकर, छाया पिंगे आणि



चित्रा वाघ, निलेश कोचळे, प्रणाली चंदनशिवे, लीना पुराणिक, या १३ जणांची २५ डिसेंबरच्या अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली, ह्या अंतिम फेरीसाठी परीक्षणासाठी केवळ वाचन आणि रसग्रहण ह्या दोन नियमांचा विचार केला गेला.

श्रीकांत पेटकर आणि सुधीर चित्ते यांनी परीक्षक म्हणून अंतिम फेरीची जबाबदारी पाडली. दोन्ही दिवशी अरविंद मुळे यांनी वेळेच्या नियोजनाची जबाबदारी पार पाडली.

या स्पर्धेसाठी कमलेश भिसे, संयुक्ता, सोनाली गाडेकर, कुणाल पाटील, शिल्पा आवले, प्रणाली चंदनशिवे या स्वयंसेवकांनी मदत केली.

१३ स्पर्धकांमधून प्रथम क्रमांक सचिन भुसारी, द्वितीय क्रमांक अंजली गोडबोले, तृतीय क्रमांक शिवराम गावडे, चतुर्थ क्रमांक निलेश कोचळे यांना देण्यात आला, तसेच उज्ज्वला धानजी, राजश्री घडीकर, श्लोक सुरूशे, लीना पुराणिक, धनश्री करमरकर, छाया पिंगे आणि चित्रा वाघ यांची उत्तेजनार्थ म्हणून निवड केली गेली.


प्रथम क्रमांकास रोख रक्कम १५०० आणि पुस्तके, व्दितीय क्रमांकास रोख रक्कम १००० आणि पुस्तके, तिसऱ्या क्रमांकास रोख रक्कम ६०० आणि पुस्तके, चौथ्या क्रमांकास रोख रक्कम ४०० आणि पुस्तके, आणि उत्तेजनार्थ ठरलेल्या वाचकांस २५० रोख रक्कम आणि पुस्तके असे पारितोषिकांचे स्वरूप होते.

वाचकांना एकत्र आणण्यासाठी 'ग्रंथाली'तर्फे करण्यात आलेला हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य होता, त्याचा एक भाग म्हणून काम करताना आनंद वाटला.


**- दीपा ठाणेकर**
भ्रमणध्वनी : ९८२०१६३१२७
deepathanekar73@gmail.com

# वाचकदिनाला लाभले अभिनव परिमाण!








**वा**चकदिनी पहिल्या दिवशी प्रगती कोळगे दिग्दर्शित 'पल्याडवासी' हा चित्रपट आणि अक्षय इंडिकर दिग्दर्शित 'उदाहरणार्थ नेमाडे' हा नेमाड्यांवरील चित्रपट (डॉक्युफिक्शन) प्रदर्शित करण्यात आला.

पारधी समाज आणि त्याच्या भारतीय व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहाशी असणाऱ्या नात्यावर प्रखर प्रकाशझोत टाकणाऱ्या 'पल्याडवासी'ने प्रेक्षकांना चांगलेच अंतर्मुख केले. प्रगती कोळगे यांच्या चित्रपटनिर्मिती क्षेत्रातील क्षमतांचे दर्शन घडवणारा आणि त्यांच्या या क्षेत्रातील भावी प्रवासाचा पल्ला अधोरेखित करणारा हा चित्रपट ही मराठी चित्रपटसृष्टीतील एक महत्त्वाची घटना आहे.

'उदाहरणार्थ नेमाडे' या डॉक्युफिक्शननेही रसिकांना नेमाडेंच्या साहित्यकर्तृत्वाची आणि त्यांच्या चरित्राची चित्रमय सफर घडवून आणली. अक्षय इंडिकर या तरुण प्रतिभाशाली दिग्दर्शकाची ही कलाकृती प्रदीर्घ काळ स्मरणात रहावी अशी झाली आहे. ●

# ब्लॉग... ब्लॉग... ब्लॉग

## परिसंवाद

## माध्यमाचे मर्म जाणा...

''नवे माध्यम आपण स्वीकारतो, पण त्या माध्यमाचे मर्म आपण पाहतो का? माध्यमांचे म्हणणे आपण किती लक्षात घेतो? माध्यमे तुम्हाला जो वेग देतात त्या वेगाशी तुमचा जगण्याचा वेग तुम्हाला मॅच करता येतो आहे का?'' असा खडा सवाल ज्येष्ठ पत्रकार निळू दामले यांनी केला. 'ग्रंथाली'च्या त्रेचाळिसाव्या वाचकदिनानिमित्त कीर्ती महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'ब्लॉग... ब्लॉग... ब्लॉग' या परिसंवादात ते बोलत होते. राधिका कुंटे यांच्या 'शब्दफुलांची ओंजळ' या ब्लॉगवरील निवडक लेखांच्या 'या फुलपाखराचं काय करायचं?' या संपादित पुस्तकाचे प्रकाशन या वेळी झाले.

दामले म्हणाले की, ''इलेक्ट्रॉनिक मिडिया आल्यावर पुस्तकांची चिंता वाटू लागली, पण पुस्तके राहणार नाहीत, हा गैरसमज आहे. उलट परदेशात लोक पुस्तके अधिक प्रमाणात वाचू लागली आहेत. इंटरनेटवर एखादं पुस्तक आवडले की लोक आवर्जून ते विकत घेतात. मुराकामीसारख्या लेखकाची पुस्तके लोक आजही रांगा लावून विकत घेतात. खरेतर नवे सॉफ्टवेअर आले की जुने बाद होते. फाईल्स ड्राफ्ट होतात, पण पुस्तके टिकतात. गेली अनेक वर्षे माध्यमांमध्ये होत जाणाऱ्या बदलांचा सूक्ष्मपणे मी अभ्यास करतो आहे. नवनवीन माध्यमातून मी लिहितो आहे. भारतात अभ्यासकाला, संशोधकाला सपोर्ट स्ट्रक्चर नाही. प्राध्यापकाने अभ्यास करू नये याची काळजी आपली विद्यापीठे घेतात अशी परिस्थिती आहे. जगात आज अशी सिच्युएशन निर्माण होऊ लागली आहे की पद-प्रतिष्ठा या गोष्टी मूल्यांशी संबंधित नाहीत, म्हणून लिहिणाऱ्या माणसाने आज सजगतेने याकडे पाहायला हवं. आज अटेन्शन स्पॅन कमी होऊ लागला आहे. ब्लॉग हे माध्यमांचे एक बदलते स्वरुप आहे. ब्लॉगवर लिहिणे हेही एक व्यक्त होणेच आहे. परदेशात स्वतंत्र विषयांवर ब्लॉग लिहिले जातात.''

दामले यांनी सांगितले की, ''आज कोणत्याही सर्जनशील माणसाला ब्लॉग हे साधन उपलब्ध झाले आहे. नवी मुलं, नवी पिढी परंपरागत चौकटीपेक्षा वेगळे लिहीत आहेत. जर्म व्यक्त करायला फेसबुक हे माध्यम उत्तम, पण अनेकदा मोठ्या लेखकाचा पट या जर्ममधूनच वाया जाऊ शकतो. अरुण साधू असे म्हणायचे की,



बातम्या आणि फिचर्स लिहिण्यात डोक्यातले कथा-कादंबरीचे विषय निघून जातात. तंत्रज्ञानामुळे नवनवीन माध्यमांचा परिचय होत गेला. विविध माध्यमांच्या मर्यादेत लिहिता-सांगता यायला हवे. व्यक्त होण्याच्या माणसात काहीएक गांभार्य असायला हवे. लिहिताना माझी किती पूर्वतयारी आहे, याचा विचार करणे महत्त्वाचे. पुस्तकांसह सर्वच माध्यमे राहायला हवीत, त्यामुळेच राधिकाच्या ब्लॉगचे पुस्तक होणे ही मला अतिशय सकारात्मक गोष्ट वाटते.''

'बिगुल'कर्ते आणि ज्येष्ठ पत्रकार मुकेश माचकर यांनी ''प्रस्थापित प्रसारमाध्यमांच्या मर्यादांमध्ये ज्यांना व्यक्त व्हायचे नाही, अशा लोकांना ब्लॉगमुळे लेखन अवकाश मिळाला. सांगण्यासारखे ज्यांच्याकडे खूप काही आहे अशी माणसे लिहू लागली आणि हे लेखन रसरशीत आहे. ब्लॉगचे पुस्तक होणे हे पुढल्या काळात होणार नाही कारण या संदर्भात ब्लॉग हे बायप्रॉडक्ट असेल,'' असे प्रतिपादन केले.

'माझं आभाळ'कर्ते आणि ज्येष्ठ पत्रकार सचिन परब म्हणाले की, 'माझं आभाळ' हा ब्लॉग गेली सात-आठ वर्षे मी लिहितो आहे. तोही पुस्तकरूपाने प्रकाशित झाला आहे. ''आज लोक दोन-अडीच हजार शब्दांचे मोठमोठे लेखही व्हॉटसअॅपवर वाचतात. पुस्तके वाचनालयात पडून राहातात, पण ब्लॉगच्या माध्यमातून नवे लोक लिहायला लागले. 'फेसबुक'ने अक्षरसंख्येची मर्यादा

ओलांडली. आज आपण मराठीच्या सुवर्णकाळात आहोत. कोल्हापूर, बारामती, औरंगाबाद, सातारा अशी ठिकठिकाणची मुले व्यवस्थेला ताकदीने भिडत आहेत. ती इतके बेधडक लिहीत आहेत की, काही मुलांवर मुख्यमंत्र्यांना नोटिस बजावावी लागली. 'ग्रंथाली'सारख्या संस्थेने लिखाणाची ताकद असणाऱ्या नव्या मुलांच्या मागे उभे राहण्याची गरज आहे.''

'अक्षरनामा'कर्ते आणि पत्रकार राम जगताप म्हणाले की, ''नवी माध्यमे वर्तमानपत्रांच्या अटींमध्ये न अडकता मुक्तपणे लिहिण्याला वाव देतात. प्रस्थापित व्यवस्थेत सेलिब्रेटी झाल्याशिवाय तुम्हाला लिहिता येत नाही. तरुण मुलाचे नाव कुणाला माहीत आहे का, असा निकष लावून त्यांना डावलले जाते. अशा लोकांनी ब्लॉगवर मुक्तपणे लिहावे. ब्लॉग विश्वात ललित लेखन खूप आहे पण हार्डकोअर, सामाजिक प्रश्नांवरचे लेखन कमी आहे. हिंदीत आज उदयप्रकाश, मंगेश डबरालसारखे लेखक ब्लॉगवर लिहितात. मग तिथे उदयप्रकाशांसारखे लेखक ब्लॉगकडे वळले म्हणून अन्य लेखक ब्लॉगकडे वळू लागले. दर्जेदार लेखन ब्लॉगविश्वात व्हायला हवे. हौसेखातर नव्हे तर जबाबदारीने ते लिहायला हवे. खेरीज ब्लॉग लेखनातून आज चांगली कमाई होऊ शकते. एखादा लेखक संशोधनपर लेखनाला जशी मेहनत घेतो, तशी मेहनत ब्लॉगलेखकाने घेणे गरजेचे आहे.''

'ब्लॉग... ब्लॉग... ब्लॉग...' हा वाचकदिनी आयोजित झालेला परिसंवाद चांगलाच रंगला. विविध क्षेत्रांतील जाणकारांची आणि माध्यमकर्मींची उपस्थिती या परिसंवादाला लाभली. मुख्य म्हणजे 'तंत्रज्ञान समजून घेऊन ते वापरायला हवे आणि माध्यमांचे म्हणणे आपण लक्षात घेऊन व्यक्त व्हायला हवे' ही सखोल जाणीव या परिसंवादाने दिली. ●


ग्रंथाली





## '...परी जीनरूपे उरावे!'

**डॉ. विश्राम मेहता**

मानवाची उत्क्रांती जीवसृष्टीच्या चौकटीत झाली. जीवसृष्टीच्या विकास-विस्ताराचा इतिहास चार अब्ज वर्षांचा आहे. म ानवजातीचा स्वत:चा इतिहास दोन-अडीच लाख वर्षांचा आहे. या सगळ्यामधून मानवाचा जन्म, बाल्य, पुनरुत्पत्ती, शरीराची जडणघडण, इंद्रियांचे चलनवलन, वार्धक्य, व्याधी व मृत्यू या साऱ्यांचा अर्थ समजतो. विश्राम मेहता यांनी या सगळ्याचे विवेचन मोठ्या सामर्थ्याने उद्‌बोधकरीत्या केले आहे. त्यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे.

**– माधव गाडगीळ**

**मूल्य ४०० रुपये ● सवलतीत २५० रुपये**




## बिमल रॉय यांची मधुमती

**मूळ लेखिका : रिंकी रॉय-भट्टाचार्य**
**अनुवाद : सरोज बावडेकर**

बिमल रॉय यांची कन्या रिंकी रॉय-भट्टाचार्य हिनं हे पुस्तक लिहिताना अपरिमित कष्ट केले. मुख्य जमेची बाजू म्हणजे तिनं हा चित्रपट यशस्वी करणाऱ्या पडद्यामागील तंत्रज्ञाच्या घेतलेल्या मुलाखती. साठ वर्षांपूर्वी काढलेल्या चित्रपटांचे तंत्रज्ञ शोधून काढणं ही सोपी गोष्ट नव्हती. ह्या पुस्तकात सगळ्यात महत्त्वाच्या तीन लोकांच्या मुलाखती आहेत. त्या म्हणजे दिलीपकुमार, वैजयंतीमाला आणि प्राण. यात चित्रपटाच्या नेमक्या चित्रीकरणांच्या जागांचे फोटो वगैरे अनेक आकर्षक गोष्टी आहेत.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# पुस्तकप्रकाशनांची समृद्ध परंपरा!

'ग्रंथाली'च्या यंदाच्या ४३व्या वर्धापनदिनी एकूण बारा पुस्तकांचे प्रकाशन वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये झाले. डॉ. निलेश साबळे, सयाजी शिंदे, संजय जाधव, रमेश भाटकर, हेमलता अंतरकर आणि मान्यवरांच्या हस्ते 'ग्रंथाली'च्या नऊ पुस्तकांचे प्रकाशन झाले.

चांगदेव काळे यांची कादंबरी 'राखुळी', स्मिता भागवत यांची 'पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या' ही कादंबरी, किरण येले यांचा 'मोराची बायको' हा कथासंग्रह आणि 'प्लॅटफॉर्म नंबर ९' हे नाटक, सुधीर व नंदिनी थत्ते यांचे 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१७', चंद्रशेखर सानेकर यांचा 'भग्न आस्थेचे तुकडे' हा कवितासंग्रह व 'नभाशी बोलण्यासाठीच' या गझलसंग्रहाची दुसरी आवृत्ती, माधुरी शेवते यांचा 'श्रेय ज्याचे त्यास द्यावे' हे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक आणि अरविंद जगताप यांच्या 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातील गाजलेल्या पत्रांचा संग्रह 'पत्रास कारण की' या पुस्तकांचा समावेश होता. यावेळी 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर आणि वाचकदिनाचे कार्यक्रम संयोजक किरण येले व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी लेखकांनी आपली मनोगते उपस्थित केली तर मान्यवरांनी त्यांच्या भाषणांमधून वाचनाचे व त्यांचे नातेही उत्स्फूर्तपणे उलगडले.

अरविंद जगताप यांनी ''पत्रलेखन ही खाजगी गोष्ट 'चला हवा येऊ द्या'च्या माध्यमातून सर्वांची झाली आणि आता ग्रंथालीमुळे ती पुस्तकरूपाने आली'' याबद्दल आनंद व्यक्त केला.

''चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातून विनोदाबरोबर विचार पोहचवण्याचे कामही व्हायला पाहिजे या उद्देशाने पत्रांचा समावेश केला व ती पत्रे सर्वांना भावली, ही लेखकाची ताकद आहे.'' या शब्दांत निलेश साबळे यांनी अरविंद जगताप यांच्या लेखनशैलीचे कौतुक केले.

ग्रंथालयीन चळवळीतील लेखक चांगदेव काळे 'राखुळी' या कादंबरीबद्दल बोलताना म्हणाले की, ''खरे तर बकरीला शिंगे असतात आणि लांडगे-कोल्हे यांना ती नसतात पण आपण बकरीला शिंगं वापरणं शिकवलेलं नाही, स्वत्वरक्षणासाठी सिद्ध झाल्यावरच समाजातील सामान्यातला सामान्य माणूस क्रूर लांडग्यांना रोखू शकतो हा या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे.''

विविध स्तरांवरील माणसांच्या कथा सांगणारा 'मोराची बायको' व अनेक स्पर्धांमधून गाजलेले 'प्लॅटफॉर्म नंबर ९' हे नाटक ही किरण येले यांची पुस्तके म्हणजे स्ववैशिष्ट्ये घेऊन येणाऱ्या लेखकाची पुस्तके आहेत, असे समाधान याप्रसंगी उपस्थित वाचकांनी व्यक्त केले.

'ग्रंथाली'ने सातत्याने कवितासंग्रह प्रकाशित करून नवी कविता वाचकांसमोर आणल्याचे कवी-गझलकार चंद्रशेखर सानेकर यांनी त्यांच्या मनोगतात नमूद केले.

'ब्लॉग'वरील परिसंवादात 'राधिका कुंटे' ब्लॉग लेखन 'या फुलपाखराचं काय करायचं?' या पुस्तकाच्या रूपात ज्येष्ठ पत्रकार निळू दामले यांच्या हस्ते प्रकाशित झाले.

पुस्तक प्रकाशनप्रसंगी 'आम्ही काय वाचतो?' या विषयीही मान्यवरांनी त्यांच्या त्यांच्या वाचनाचे अनेक संदर्भ मोकळेपणाने







मांडले. रमेश भाटकर यांनी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांच्या कवितांच्या सादरीकरणासह नाथमाधवांच्या कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या, चिं.वि. जोशींचे विनोदी लेखन, आत्मकथने, खानोलकरांचे लेखन ते जयंत नारळीकर यांचे विज्ञानपर लेखन असे अनेक पैलू आपल्या भाषणातून उलगडले.

हेमलता अंतरकर यांनी जी.ए. कुलकर्णींचे लेखन, इंद्रायणी सावकार यांची राजकीय कादंबरी, सचिन कुंडलकर यांची 'कोबाल्ट ब्लू' ही कादंबरी अशा नव्या-जुन्या लेखकांच्या लेखनाबाबत मोकळी चर्चा केली.

सयाजी शिंदे यांनी विद्रोही कविता, रा. रं. बोराडे, शंकर पाटील यांसाख्या लेखकांच्या ग्रामीण कादंबऱ्या, रंगनाथ पठारे यांचे लेखन, ना.धों. महानोर, प्रकाश होळकर यांची कविता, जयंत पवारांच्या कथा अशा विविध प्रकारच्या साहित्याच्या वाचनाविषयी संदर्भ देत आपले विचार मांडले.

वाचकदिनी रंगलेल्या 'श्रेय ज्याचे त्यास द्यावे' या शब्दस्वरमय मैफिलीतही ग्रंथालीच्या अन्य दोन पुस्तकांचे प्रकाशन कौशल इनामदार यांच्या हस्ते झाले. यांत श्रीकांत पेटकर यांच्या 'कविता मनातल्या' या संग्रहाचा समावेश होता तर दुसरे पुस्तक मराठीतील समकालीन काव्यविश्वाचा विस्तृत पट ओलांडणारे पुस्तक होते. किरण येले यांनी संपादित केलेल्या 'मराठी समकालीन कविता' या पुस्तकात एकूण ९९ कवींच्या कवितांचा समावेश आहे.

एकाच साहित्यप्रकाराच्या चौकटीत न अडकता वैविध्यपूर्ण लेखनाचे नवनवीन बाज प्रकाशात आणणे हे ग्रंथालीचे वैशिष्ट्य याही वाचकदिनी अधोरेखित झाले.

एकूण वाचकदिनाचा हा प्रकाशनसमारंभ वाचकांच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने आनंदसोहळा ठरला.

यंदाच्या २४ व २५ डिसेंबर वाचकदिनाला वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा वाचकदिन कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या वाचकदिनास सारस्वत बँक, युनियन बँक, सेंट्रल बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, एनकेजीएसबी बँक यांचे आर्थिक सहाय्य लाभले. झी एंटरटेनमेंट, एबीपी माझा, न्यूज १८ लोकमत, दूरदर्शन या वाहिन्यांचे व महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, दिशा २४ तास, सकाळ या वृत्तपत्रांचे प्रसिद्धीसाठी सहकार्य लाभले.

'ग्रंथाली'चा वाचकदिन यशस्वी करण्यात सहभागी 'ग्रंथाली टीम' उपक्रम संयोजक : किरण येले, चंद्रकांत मेहेंदळे, श्रीनिवास नार्वेकर, दीपा ठाणेकर, श्रीधर पाटील, दिनेश म्हसकर, अस्मिता पांडे, रमेश करमरकर, सुधीर चित्ते, सायली राणे, सायली जाधव, वृषाली विनायक, अर्जुन डोमाडे, किशोर खराटे,

शब्द रुची : कार्यकारी संपादक : डॉ. वीणा सानेकर, संपादक मंडळ : अरुण जोशी, प्रल्हाद जाधव, चांगदेव काळे, डॉ. लतिका भानुशाली, साधना गोरे, प्रसिद्धी/जनसंपर्क/कार्यक्रम, ग्रंथाली : धनश्री धारप.

सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल, पद्मभूषण देशपांडे, नीरजा, उषा मेहता, प्रभाकर भिडे, दीपक घारे, शिरीष वीरकर, अनिल शिदोरे (विश्वस्त) आणि योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे, हरिप्रसाद जयस्वाल.

●



**कीर्ती महाविद्यालयाच्या पटांगणावर रंगलेला ४३ वा वाचकदिन!**

# अभिजात कवितेचा 'अमृताचा वसा'

**२५** डिसेंबर – ग्रंथालीच्या वाचकदिनाची सांगता 'श्रेय ज्याचे त्यास द्यावे' या कार्यक्रमाने झाली. विंदा करंदीकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने कवितांवर आधारित कार्यक्रम करावा, अशी सुदेश हिंगलासपूरकरांची सूचना होती. विंदांप्रमाणेच अनेक कवींच्या कवितांनी आपलं जगणं समृद्ध केलं आहे. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करणं, ही या कार्यक्रमाची संकल्पना होती. म्हणूनच विंदांच्या कवितेची ओळ या कार्यक्रमाचं शीर्षक म्हणून निवडली गेली – 'श्रेय ज्याचे त्यास द्यावे'. संगीतकार कौशल इनामदार यांनी मराठी अभिजात कविता आपल्या संगीताच्या माध्यमातून सर्वदूर पोहचवली आहे. अभिजात कवितेचा हा 'अमृताचा वसा' पुन्हा एकदा काही निवडक कवींच्या कवितांमधून कौशलने जाणकार श्रोत्यांपर्यंत पोहचवला. कवी ग्रेसांची 'क्षितिज जसे दिसते', बालकवींची 'या शुभ्र विरल अभ्रांचे', पाडगावकरांची 'पान जरा हलले', सुरेश भटांची 'दिवस हे जाती असे' अशा ज्येष्ठ कवींच्या रचनांना उत्तम प्रतिसाद मिळाला. गझलकार चंद्रशेखर सानेकरांनी लिहिलेल्या 'तुझ्या डोळ्यांमधे गहिऱ्या' या गझलची रसिकांची फर्माईशही कौशलने पूर्ण केली.

निवेदन, कवितांचं अभिवाचन अस्मिता पांडे आणि गिटारची संगत संजय महाडिक यांची होती. नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभिजात आधुनिक मराठी कविता नव्या पिढीपर्यंत पोहचण्यासाठी कौशल 'अमृताचा वसा – मराठीचे विश्वरूप दर्शन' हा नवा प्रकल्प कौशलने हाती घेतला आहे. त्याविषयी सांगून कौशलने कार्यक्रमाची सांगता पर्वतांनो, दूर व्हा रे  सागरांनो दूर व्हा रे

उघडिले मी दार माझे मानवांनो आत या रे'

– या विंदा करंदीकरांच्या कवितेने केली.

●








# ग्रंथालयांसमोरील आव्हानांचा वेध ग्रंथपाल कार्यशाळा - परिसंवाद

**चांगदेव काळे**

**२५** डिसेंबर २०१७, सोमवार, ग्रंथाली आयोजित वाचकदिनाचा दुसरा दिवस. या दिवशी 'ग्रंथपाल कार्यशाळा' हा विशेष उपक्रम आयोजित केला होता. या उपक्रमात दोन परिसंवादांचा समावेश करण्यात आला होता. ग्रंथालय चळवळ आणि वाचक, ग्रंथालयांमोर उभी ठाकलेली आव्हाने, प्रसिद्धीमाध्यमे, इंग्रजीचा वाढता प्रभाव आणि वाचनापासून दूर चाललेला वाचक, या पार्श्वभूमीवर एक कार्यशाळा आयोजित करण्याची संकल्पना सुदेश हिंगलासपूरकर यांची!

डॉ. रा.शं. बालेकर, माधव शिरवळकर, नरेंद्र लांजेवार, अरविंद पाटकर, संजीव लाटकर या तज्ज्ञ मंडळींना कार्यशाळेत व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि धनंजय गांगल यांच्या शुभहस्ते ग्रंथभेट देऊन या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

''ग्रंथालयांपासून वाचक दूर चाललेला आहे, ही वाचकांची अनास्था आहे की ग्रंथालयांची? सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्वत:च्या समस्या आहेत. सेवकांच्या अल्प वेतनाचा प्रश्न मोठा आहे. शासन अनुदान अपुरे आहे, हे जरी वास्तव असले तरी सार्वजनिक ग्रंथालयांच्या पुढे असलेले हे आर्थिक आव्हान एकमेव आहे का? आज ग्रंथालये केवळ ग्रंथांची कोठारे झाली आहेत. ती या कोठारांच्या मानसिकतेतून बाहेर पडण्याची गरज आहे आणि तेच मोठे आव्हान ग्रंथालयांसमोरचे आहे. ग्रंथालयांनी त्यांच्या स्वत:त बदल करून वाचक आपल्याकडे आकर्षित कसा होईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. एकेकाळी वाचक ग्रंथालयांकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्नांची गरज नव्हती. वाचक आपोआप आकर्षित होत असत. आजची परिस्थिती तशी राहिलेली नाही. आज ग्रंथालयांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न केले नाहीत तर मोठी अनावस्था ग्रंथालयासमोर उभी राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही; त्यासाठी कुणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. ही कोंडी कशी फोडता येईल यासाठी ही कार्यशाळा आयोजित केली आहे.'' स्वागतपर प्रास्ताविक करताना सुदेश हिंगलासपूरकर यांनी वरीलप्रमाणे मनोगत व्यक्त केले.

ग्रंथालये उत्तमपणे चालण्यासाठी उत्तम वाचक घडवण्याची



गरज असते. शासन स्तरावरून ती घडण्याची अपेक्षा ठेवणे चूक आहे; तो आपणच घडवला पाहिजे आणि त्यासाठी चिकाटीने नियोजन पद्धतीने कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. असे मत व्यक्त करून आपण हा कार्यक्रम कशा पद्धतीने राबवतो याविषयी बुलढाण्याहून आलेले लेखक **नरेंद्र लांजेवार** यांनी पुढे सांगितले की, गावात असलेल्या सर्व वाचनालयांचे सभासद फॉर्म मी माझ्या संग्रही ठेवतो. विद्यार्थी ज्या भागात राहतो, तेथील वाचनालयाचा त्याने सभासद व्हावे म्हणून त्या वाचनालयाचा फॉर्म स्वत: भरून देतो. त्याची फी भरतो आणि त्या वाचनालयास आवाहन करतो, ''हा मी पाठवलेला विद्यार्थी आहे, त्याच्याकडून पुढील वर्गणी पूर्ण न घेता निम्मी घ्या.'' स्वत: वर्गणी भरून ५५ मासिके मागवतो. 'पुस्तकमैत्री' नावाचे वाचनालय मी सुरू केले आहे. पुस्तकांची पेटी ठेवून तिची देवघेव करण्यासाठी विद्यार्थ्यांनीच पुढाकार घेण्याचे नियोजन केले आहे. त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून बालसाहित्य संमेलन घेतो. साहित्यिकांना पत्र पाठवण्याची कल्पना विद्यार्थ्यांत रुजवली आहे. पोस्टकार्ड स्वत: आणून देतो. आवडलेल्या पुस्तकाविषयी ते लेखकांना पोस्टकार्डद्वारे कळवतात. लेखकाचे आलेले उत्तर त्यांना आनंद तर देतेच, पण वाचनासाठी प्रेरणाही देते. मुलांनी लिहिलेल्या कथा, कविता, चित्र एकत्र करून मासिकांना पाठवतो. ज्यांची छापून येतात, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही देऊन जातो. नवीन माध्यम आले व्हाटस ॲप. त्यावर वाचकांचा ग्रुप केला आहे. नवीन पुस्तके कोणती आली आहेत त्यांची माहिती त्यावर पाठवतो. 'आपण ग्रंथालयाचे सभासद आहात का?' 'ग्रंथालयाचा सभासद असणे हा माझा अभिमान आहे' अशी स्टिकर्स गावातल्या घरांच्या दरवाजावर लावतो असे विविध प्रयोग करतो. त्यामुळे वाचकांची कमतरता भासत नाही. यावरून एक लक्षात येईल, ग्रंथालय सेवा राहिलेली नाही. वाचक हा ग्राहक झाला आहे. आपण या ग्राहकाकडे गेले पाहिजे. आपल्याला ग्रंथालय म्हणून स्वत:च्या पायावर उभे राहावे लागेल. कुणाची मदत मिळेल ही अपेक्षा भ्रामक आहे. स्वत: प्रयत्न करा. पुस्तकांवर प्रेम करा.

संगणकप्रणाली आणि वाचनसाहित्य यांचा समन्वय साधणारे **माधव शिरवळकर** यांनी आपल्या व्याख्यानात ग्रंथालयीन आव्हानांचा आढावा घेतला. सेवक, पदाधिकारी, शासन आणि वाचक हे सार्वजनिक ग्रंथालयांचे ४ खांब आहेत. ग्रंथालयांचे भवितव्य या खांबावर अवलंबून आहे. प्रत्यक्ष पुस्तकासाठी ज्यांचा संबंध येतो ते आहेत वाचक आणि सेवक. परंतु हा सेवक स्वत:च आर्थिक विवंचनेत असेल तर तो आव्हाने कसा पेलणार? बरं राज्यातील ग्रंथालय सेवकांची संख्या २३०००च्या आसपास. ती शासनावर दबाव टाकण्याइतकी पुरेशी आहे का? मुळातच लक्षात घ्यायला हवं की, ग्रंथालय सेवाही इतर सेवांप्रमाणे अत्यावश्यक सेवा नाही. मग अशा सेवेतील सेवकांचा दबाव कितपत प्रभावी ठरू शकेल? आपल्यासमोर आता खरे आव्हान आहे ते अस्तित्व टिकवण्याचे. आज आपण कागदी पुस्तकावर उभे आहोत. आपल्या सेवेचा खरा गाभा आहे ते पुस्तक. यालाच बाजूला काढले तर? आजची आपली पुस्तकसेवा कालबाह्य होण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे. संगणकाचे प्रमाण चढत्या भाजणीत वाढते आहे. इंटरनेट आज हिरो ठरतो आहे आणि आपल्यासाठी खलनायक परंतु आता वेळ आहे ती समन्वयाची. पुस्तक देवघेव आणि इंटरनेट यांना एकमेकांना पूरक ठरवण्याची.

संगणक, डिजिटायझेशन यांच्याविषयी शिरवळकरांनी स्पष्ट केले की, अलीकडे पुस्तके डिजिटायझेशनची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. परंतु केवळ पुस्तकाचे स्कॅनिंग करणे म्हणजे डिजिटायझेशन नव्हे, तर ज्या साहित्याचे प्रत्यक्ष टंकलेखन करून संगणकावर जतन केले जाते, ते खरे डिजिटायझेशन. त्यातल्या कुठल्याही एका शब्दावरून आपल्याला हवा तो आवश्यक मजकूर सहजपणे उपलब्ध होऊ शकतो. आम्ही केतकरांच्या ज्ञानकोशाचे स्कॅनिंग केलेले नाही, त्यांचे प्रत्यक्ष टंकलेखन केले. हे २३ खंड त्यामुळे खऱ्या अर्थाने डिजिटाइज झाले आहेत.

'सार्वजनिक ग्रंथालयासंमोरील आव्हाने' या विषयावर मत व्यक्त करताना **डॉ. रा. शं. बालेकर** यांनी सभोवताली वाढत चाललेल्या माध्यमांच्या प्रभावांकडे लक्ष वेधले. नवनवीन सहज उपलब्ध होत असलेली माध्यमे आणि हवी ती माहिती वाचकांच्या हाती असेल तर आपले छापील पुस्तक वाचणार कोण? ग्रंथालयात ग्रंथपाल किंवा ग्रंथालय सेवक हा महत्त्वाचा घटक समजला जातो. पूर्वी ग्रंथपालाच्या नावावरून ग्रंथालयाचे नाव ओळखले जात असे. आता तशी परिस्थिती आहे का? ग्रंथालयात काम करणारा सेवक हा केवळ काम करायचे म्हणून करतो. आर्थिक विवंचना आहे हे कबूल. म्हणून कामाविषयी अनास्था; हे त्याचे उत्तर होऊ शकत नाही. मुळात हा सेवक प्रशिक्षित असायला हवा. परंतु गेली अनेक वर्षे ग्रंथपालन वर्गाच्या अभ्यासक्रमात बदल केलेला नाही. काळानुरूप यात बदल होणे अपेक्षित आहे. संगणकाचा वापर ही गोष्ट अत्यावश्यक समजली जात आहे. त्यासाठी MSCIT या कोर्सची गरज आहे. हा कोर्स करण्यासाठी शिष्यवृत्ती असायला हवी, तीच नाही. आजची परिस्थिती पाहता आपण अनास्था दाखवून अनास्थेचे संकट ओढवून घेत आहोत, असे दिसते. एकत्रितपणे काम करण्याची, वाचकाला आपल्याकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे.

प्रसिद्धिमाध्यमे, प्रकाशक, लेखक यांचा सार्वजनिक ग्रंथालयाबाबतचा दृष्टिकोन या विषयावरील परिसंवादात मनोविकास प्रकाशनाचे **अरविंद पाटकर** यांनी महाराष्ट्रात असलेल्या पुस्तकविक्री केंद्रांचा आढावा घेताना सांगितले की, महाराष्ट्रात ललित पुस्तकाची विक्री करणाऱ्या दुकानांची संख्या ५३ इतकी आहे. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांपैकी ११ जिल्ह्यात एकही दुकान नाही. मग सर्व ग्रंथालयापर्यंत पुस्तके पोहोचणार कशी? चांगल्या दर्जाची पुस्तके रास्त किंमतीत दिली पाहिजेत ही अपेक्षा रास्त आहे परंतु ग्रंथालयांना सवलत अधिक हवी असते. त्यातून पदाधिकाऱ्यांची/ग्रंथपालांची टक्केवारी वेगळी. मग पुस्तकांच्या किंमती वाढवण्याला पर्याय राहत

नाही. आज ग्रंथालये कितीही ओरड करोत, वाचन चळवळीला मोडीत काढण्याचे काम या संस्थांच्या संस्थाचालकांनी केलेले आहे, हा माझा अनुभव आहे. यात तुमची मुंबईतील ग्रंथालये अपवाद नाहीत. या ग्रंथालयांना चांगली पुस्तके हवीत, वाचक यायला हवा असे मनापासून वाटत नाही. त्यांना टक्केवारीशी मतलब आहे. प्रकाशकाला पुस्तकविक्री करायची असते. त्याने गुंतवलेली रक्कम वसूल करायची असते यासाठी तो जाहिरात करतो, प्रदर्शन भरवतो, वेगवेगळे उपक्रम करतो. वृत्तपत्रे, प्रसिद्धीमाध्यमे या प्रकाशकांसाठी किती जागा देतात? ग्रंथालये किती प्रयत्न करतात? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले. ते पुढे म्हणाले,

''आपण सर्वत्र ऐकतो आहोत की, वाचकांची संख्या कमी झाली आहे याचा अर्थ वाचनाची आवड कमी झाली असे म्हणायचे का? बरं झालेला परिणाम फक्त ग्रंथालयांवर झाला असे आहे का? तो वर्तमानपत्रे, पुस्तके यांच्यावरही झालेला दिसतो, याची कारणे काय? कुठलीही समस्या उद्‌भवते तेव्हा आपल्याला तिच्या कारणांकडे, मुळाकडे जायला लागते. वाचक ग्रंथालयांकडे येत नाहीत, त्यांची कारणे काय? माणसाकडे वेळ नाही, प्रवासाची दगदग, टीव्ही, व्हॉटसअॅप, फेसबुक, वगैरे वगैरे. खरा प्रश्न आहे, आपल्याला वाचायला काय आवडते? आपल्या आवडीची पुस्तके मिळतात का? दुसरा प्रश्न आहे प्रवृत्तीचा. मी हे अमुकअमुक करीन पण त्या बदल्यात मला काय मिळेल? ही प्रवृत्ती. हिला इंग्रजीत टॅंजिबल इन्सेन्टिव्ह म्हणतात. या प्रवृत्तीमुळे आपली आवड मागे पडत चालली आहे. 'छबिलदास नाटक चळवळ' एकेकाळी जोमात होती, आता बंद पडली. नाटकांचा प्रेक्षक कमी झाला. मराठी शाळा बंद पडत चालल्या. मग पुस्तक वाचणार कोण? माणूस टॅंजिबल इन्सेन्टीव्हच्या मागे लागला आहे. त्याला तो जिथे मिळतो तिथे तो जातो आहे. माणसं आत्महत्या करायला लागलीत, का? त्यांच्यात झालेल्या हार्मोन्सच्या बदलामुळे. खेळणारा माणूस आत्महत्या करीत नाही.

ग्रंथालये ही ज्ञानकेंद्रे आहेत. विचारांचे संवर्धन, वर्धन करण्याचे काय ग्रंथालये करतात. ती जतन झाली पाहिजेत. त्यासाठी आवश्यक आहे लोकसहभाग. त्यासाठी लोकांकडे जाण्याची गरज आहे. जे व्यवसायावर प्रेम करतात, त्यांना अपयश येत नाही. लोकांना काय आवडतं त्याचा शोध घ्या. त्यांच्यापर्यंत कसे जाता येईल त्याचा प्रयत्न करा. पोस्टर, प्रदर्शन जे चांगलं, ते समोर मांडा. फेसबुक, व्हॉटसअॅप, ई-बुक या आधुनिक माध्यमांचा द्वेष करू नका! त्यांची कास धरा, कौशल्याने वापर करा.''

दोन्ही परिसंवादानंतर उपस्थितांसाठी प्रश्नोत्तरांसाठी खास वेळ देण्यात आला. व्याख्याने आणि श्रोते यांच्यात उत्तम संवाद निर्माण झाला. राजेंद्र वैती, अध्यक्ष कोकण विभाग ग्रंथालय संघ, विनायक गोखले, अध्यक्ष, ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ, सुप्रसिद्ध साहित्यिक अनंत भावे आणि ठाणे-पालघर जिल्ह्यातील ग्रंथालयांतील पदाधिकारी व सेवक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. अस्मिता पांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ●


ग्रंथाली






ग्रंथालय विशेषांक

शब्द रुची

वार्षिक वर्गणी २५० रुपये

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
२४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com / www.granthali.com

# मराठी अभ्यासकेंद्र आणि डी.एस्. हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठीप्रेमी पालक महासंमेलन'

**गे**ली १० वर्ष सातत्याने मराठी भाषेसंदर्भातील विविध मुद्यांवर काम करणारे, आणि मराठी शाळांच्या संवर्धनासाठी प्रयत्नशील असणारे 'मराठी अभ्यास केंद्र' आणि ८० वर्षांचा इतिहास असलेली, महाराष्ट्रातील एक नावाजलेली मराठी शाळा 'डी. एस. हायस्कूल' यांच्या संयुक्त विद्यमाने २३ आणि २४ डिसेंबर २०१७ रोजी मुंबईत सायन येथील डी. एस. हायस्कूलच्या संकुलात पालकांचं एक ऐतिहासिक एकीकरण झालं. 'मराठीप्रेमी पालक महासंमेलन' या नावाने संपन्न झालेला हा सोहळा महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात झालेला असा पहिलाच सोहळा होता. या संमेलनाच्या पूर्वतयारी बैठका गेले चार महिने विविध शाळांमधे घेण्यात येत होत्या. दि शिक्षण मंडळ (गोरेगाव), नूतन विद्यामंदिर, वंदे मातरम शिक्षण संस्था, मी मराठी चळवळ, पंचतत्त्व सेवा संस्था (पालघर), प्रबोधक यूथ फेडरेशन राष्ट्रज्योत (कल्याण), चित्रपतंग, मराठी शाळा आपण टिकवल्या पाहिजेत हा फेसबुक समूह या संस्थांनीही आयोजनात सहभाग घेतला.



प्रारंभी विक्रोळी येथील संदेश विद्यालयातील विद्यार्थ्यांनी समूहगीते सादर केली. त्यानंतर डॉ. दीपक पवार, मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष, संमेलनामागची भूमिका मांडताना असे म्हणाले की पालकांनी मुलांना मराठी शाळेत घालण्याचा आपला निर्णय चुकीचा नाही हे मनात पक्कं करावं. राज्यात गुणवत्तापूर्ण आणि मातृभाषेतलं दर्जेदार शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा आहेत, पण त्यांची बेटं झाली असून ती जोडण्याचं काम आपल्या सर्वांना मिळून करायचं आहे. शिक्षणव्यवस्थेत पालक ही एक सक्रिय शक्ती म्हणून समोर आली पाहिजे.

डी. एस्. हायस्कूलचे विश्वस्त राजेंद्र प्रधान यानंतर त्यांच्या मनोगतात म्हणाले की इतर मराठी शाळांप्रमाणेच डी. एस. हायस्कूलवरही चार वर्षांपूर्वी कठीण काळाचा सामना करायची वेळ आली होती. नवीन प्रवेश कमी होत होते. असं असताना शिक्षणपद्धतीत नवीन प्रयोग करून, नवे उपक्रम हाती घेऊन आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून हे चित्र बदलण्याचं काम झालं. आज सातत्याने प्रतिवर्षी चारशेहून अधिक नवीन प्रवेश मराठी माध्यमात होत असून इंग्रजी माध्यम पूर्णतः बंद करण्याचा निर्णय शाळेने घेतल्याचं अभिमानास्पद उदाहरण त्यांनी श्रोत्यांसमोर ठेवलं.



'आपली भाषा, आपल्या शाळा, आपली मुलं' या डॉ. वीणा सानेकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन संमेलनाचे उद्घाटक हर्ष विभांडिक व मान्यवरांच्या हस्ते झाले. महाराष्ट्रातील विविध शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ, प्रयोगशील शिक्षक यांचे जवळपास ४५ लेख या पुस्तकात समाविष्ट आहेत.

संमेलनाला उद्घाटक म्हणून हर्षल विभांडिक हे ३४ वर्षीय व्यक्तिमत्त्व लाभले. धुळे जिल्ह्यातील हजारांहून अधिक शाळा स्वखर्चातून आणि लोकसहभागातून डिजिटल करणारा हा 'अमेरिका रिटर्न तरुण' पालकांशी आणि उपस्थितांशी मनमोकळेपणाने बोलला. ''लोकसहभागातून शाळा डिजिटल झाल्या आणि गाव शाळेत आलं, अकाउंटेबिलिटीची भावना गावातल्या लोकांमधे, पालकांमधे बळावली'' असं ते म्हणाले. रंजकपणे गावातील शिक्षणाचं वातावरण आणि पालकांच्या मानसिकतेचं

वर्णन सांगतानाच पालकांचं एकीकरण ही एक सकारात्मक सुरुवात आहे आणि यातून मोठा लढा उभा राहील, अशी प्रतिक्रिया त्यांनी पालक संमेलनाबद्दल दिली.




उद्घाटनाच्या या सत्रानंतर 'मातृभाषेतून शिक्षण आणि पालकांशी संवाद' या सत्रात नामदेव माळी आणि मिलिंद चिंदरकर यांनी पालकांना संबोधित केले. विचार करायला लावणारे प्रश्न मुलांना विचारायचा हट्ट पालकांनी शाळांकडे केला पाहिजे आणि दैनंदिनी लिहिण्यासारखे उपक्रम मुलांकडून आवर्जून करून घेतले पाहिजेत असं नामदेव माळी म्हणाले. मिलिंद चिंदरकर यांनी धड्याखालचे प्रश्न हे निरुपयोगी असल्याचे म्हणताना मुलांची शोधक वृत्ती सक्षम करतील अशा गप्पा पालकांनी ठरवून मुलांशी मारल्या पाहिजेत असे सांगितले. तसेच 'घोका आणि ओका'पेक्षा प्रात्यक्षिकातून शिक्षणावर अधिक भर द्यायला हवा असे मत व्यक्त केलं. सत्राचे अध्यक्ष रविंद्र धनक यांनी असून 'पालक हा एक सक्रिय घटक व्हायला हवा असे प्रतिपादन केले.



त्यानंतर 'व्यक्तिमत्त्व विकासात पालक व शिक्षकांची भूमिका' सांगताना आय.पी.एच.चे डॉ. अरुण नाईक यांनी पालकांशी खुलेपणाने गप्पा मारल्या. भाषेबद्दलचे गैरसमज पालकांनी बाजूला सारले पाहिजेत असे ते म्हणाले. मातृभाषेतून शिक्षणाचा विचारप्रक्रियेवर कसा सकारात्मक परिणाम होतो हे समजवतानच मुलांना विकासासाठी मोकळेपणा द्यायला हवा व चुकीची भीती देणे टाळायला हवे हेही त्यांनी सांगितले.

त्यानंतरच्या 'गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांसाठी' या सत्रात रेणू दांडेकर यांनी त्यांच्या चिखलगाव, दापोली इथल्या शाळेत राबवले जाणारे विविध प्रयोग आणि उपक्रम सांगितले. भाषेमुळे शिक्षक आणि मुलांमधे निर्माण होणारा संवाद महत्वाचा असल्याचे त्या म्हणाल्या. कोल्हापूरच्या सृजन आनंद विद्यालयाच्या सुचिता पडळकर यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतींची अनेक उदाहरणं



उपस्थितांना सांगितली व इतर शाळांनाही ती राबवण्याचे आवाहन केले. पुण्यातील ग्राममंगल शाळेच्या आदिती नातू यांनी आदिवासी भागात मुलांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न तपशीलपूर्वक मांडले.

'मराठी माध्यमातील यशवंतांच्या यशोगाधा' हे त्या नंतरचं सत्र होतं. यात कबड्डीपटू मीनल जाधव, वृत्तनिवेदिका नम्रता वागळे, अभिनेता अंगद म्हसकर, एका जागतिक कंपनीत काम करणारा अभियंता तसेच तरुण नाट्यदिग्दर्शक वैभव पटवर्धन, नामांकित डॉक्टर सुमित शिंदे, राज्यशासनात सहाय्यक आयुक्त असलेल्या स्वाती थोरात, व प्रसिद्ध रेडिओ निवेदिका रश्मी वारंग हे मराठी माध्यमात शिकलेले यशवंत सहभागी झाले. ''मराठीमुळे आपलं कुठेच अडलं नाही उलट मराठी माध्यमाचा नेहमी फायदाच झाला'' असे सर्वांचेच मत होते. इंग्रजी भाषेबद्दलच्या अडचणी योग्य ते प्रयत्न केल्यास येत नाहीत किंवा त्यांच्यावर सहज मात करता येते असेही ते म्हणाले. मातृभाषेतून शिकल्याने व्यक्त होण्याची क्षमता टिकून राहते असे वैभव पटवर्धन म्हणाले तर मातृभाषेतून शिकल्याने वाढत जाणाऱ्या आत्मविश्वासाबद्दल डॉ. सुमित शिंदे यांनी आनंद व्यक्त केला. अंगद म्हसकर, रश्मी वारंग यांनी आपल्या मुलांसाठी मराठी शाळेचा पर्याय निवडून प्रत्यक्ष उदाहरण समोर दिलं, तसेच अंगद म्हसकर व नम्रता वागळे यांनी मराठीतून शिकल्याने प्राप्त होणाऱ्या शब्दसंपत्तीचाही दाखला दिला. स्वाती थोरात यांनी मातृभाषेतून शिकल्याने मराठी व इंग्रजी या दोनही भाषांवर उत्तम पकड साधता येते हे आग्रहाने नमूद केले तर कबड्डीपटू मीनल जाधव यांनी शाळा सोडल्यानंतरही शाळा, संस्कृती, यांच्याशी टिकून राहणारं नाते, हे मराठी माध्यमाचे एक महत्त्वाचे यश असल्याचं सांगितले.

दिवसाच्या शेवटच्या सत्रात डी. एस्. हायस्कूलमधल्या 'शंकर महादेवन अकॅडमी'च्या विद्यार्थ्यांनी सांगितिक कलाविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली.

पुढील दिवसाची सुरुवात महाराष्ट्र विद्यालय, गोरेगाव आणि मालवणी उत्कर्ष विद्यालय, मालाड यांच्या दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. मराठी शाळांच्या आजच्या वास्तवावर व शिक्षणव्यवस्थेवर प्रकाश टाकणाऱ्या महाराष्ट्र विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या बालनाट्याने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यानंतरच्या सत्रात 'शालेय जीवनातील भाषा, कला आणि क्रीडा समृद्धी' या



विषयावर सुप्रसिद्ध लेखिका माधुरी पुरंदरे आणि ज्येष्ठ मल्लखांब प्रशिक्षक उदय देशपांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सोनाली गुजर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. उदय देशपांडे यांनी खेळातून विकसित होणाऱ्या स्वभावगुणांविषयी मार्गदर्शन केले तर माधुरी पुरंदरे यांनी वाचन, संवाद आणि निरीक्षण या गुणांच्या होत असलेल्या ऱ्हासाविषयी चिंता व्यक्त केली.



'मातृभाषेतील शिक्षण आणि आई म्हणून माझी भूमिका' या सत्रात प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित, मीना कर्णिक, रेखा ठाकूर, शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे आणि शुभदा चौकर या सहभागी झाल्या. आई म्हणून आपल्या मुलांना मराठी शाळेत घालण्यामागची आपापली भूमिका त्यांनी प्रभावीपणे मांडली. मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व सांगतानाच जाणीवपूर्वक मराठी शाळा निवडाव्यात असे आवाहनही त्यांनी पालकांना केले.

'मराठी शाळांपुढील आव्हाने आणि नाविन्यपूर्ण उपाय' या त्यापुढील सत्रात हेमांगी जोशी यांनी शिक्षणहक्क कायद्यातील महत्वाच्या तरतुदी मांडल्या. तर मारुती म्हात्रे यांनी शासनाची मराठी शाळांविषयीची चुकीची शासकीय धोरणे अधोरेखित केली. भाऊसाहेब चासकर यांनी अतिशय तळमळीने शिक्षकांच्या दृष्टिकोनातून भाष्य केलं तर सुबोध केंभावी यांनी पालक नवनवीन तंत्रज्ञान वापरून मुलांच्या शिक्षणात कशी भूमिका बजावू शकतील हे सांगितले. या सत्राचे अध्यक्षपद राजेंद्र प्रधान यांनी भूषविले.

नंतर राजकीय पक्षांच्या आणि प्रसारमाध्यमांच्या निवडक प्रतिनिधींचा सहभाग असलेल्या सत्रात 'मराठी शाळांसाठी आम्ही काय करणार?' हा प्रश्न उपस्थितांना केला गेला. राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील, भाजपाच्या कांता नलावडे, शिवसेनेतर्फे मनिषा कायंदे



आणि पत्रकार प्रतिमा जोशी यांनी आपापली भूमिका सविस्तरपणे मांडली व या सर्वांनीच मराठी शाळांच्या संवर्धनासाठी, त्यांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार बनवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन समस्त पालकांना व आयोजकांना दिले. 'झी २४ तास'चे वृत्तनिवेदक अजित चव्हाण यांनी या सर्वांना बोलते केले.



'घुमा' या मराठी शाळाविषयाशी संबंधित चित्रपटाच्या गुणी चमूचा यानंतर सत्कार करण्यात आला. चित्रपटाचे दिग्दर्शक महेश काळे यांनी गावातील शिक्षणाची अवस्था मांडतानाच, आयोजकांना असे पालक संमेलन ग्रामीण भागातही घेण्याचे आवाहन केले आणि सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



समारोपाच्या सत्राचे प्रमुख पाहुणे अविनाश धर्माधिकारी यांनी अतिशय मनमोकळेपणाने उपस्थितांना मार्गदर्शन करताना मातृभाषेतून शिक्षण हेच श्रेष्ठ असल्याचा पुनरुच्चार केला. तसेच मराठी अभ्यास केंद्र व डी. एस्. हायस्कूल यांचे या संमेलनाबद्दल व भूमिकेबद्दल कौतुक केले. यावेळी शक्य ती मदत मराठी शाळा संवर्धनासाठी करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

मराठीप्रेमी पालक महासंमेलनाला दोन्ही दिवस उपस्थित असलेल्या, संमेलनाच्या समारोपाच्या अध्यक्षा मॅक्सिन बर्न्सन उर्फ मॅक्सिन मावशी यांनी त्यानंतर संमेलनाला संबोधित केले. मूळच्या अमेरिकन असलेल्या मॅक्सिन बर्न्सन यांनी फलटण येथील कमला निंबकर शाळेच्या जडणघडणीचे विविध अनुभव याप्रसंगी सांगितले. त्यांचा शिक्षण, संस्कृती, मराठी भाषा याबद्दलचा अभ्यास ऐकताना सगळे मंत्रमुग्ध झाले. जगातील विविध देशांची उदाहरणे देत इंग्रजी ही भाषा म्हणून महत्त्वाची असली तरी माध्यम म्हणून तिचा अट्टाहास करणे कसे चुकीचे आहे हेही त्यांनी सांगितले.

संमेलन समन्वयक आनंद भंडारे यांनी दोन दिवसाच्या संमेलनाचा वृत्तांत सादर केला. संमेलनातील 'पालक महासंघाची घोषणा' हे समारोपाचे वैशिष्ट्य होते. या महासंघाद्वारे राज्यभरातल्या पालकांचे एकीकरण होईल व विविध आघाड्यांवर मातृभाषा शिक्षण आणि मराठी शाळांसाठी काम केलं जाईल असं घोषित झालं.

संमेलनाला पालकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. प्रत्यक्ष उपस्थितीसोबतच इंटरनेटच्या माध्यमातून हे संमेलन हजारो लोकांपर्यंत पोचवले गेले ज्यामुळे हा उपक्रम खऱ्या अर्थाने व्यापक झाला. येत्या काळात सर्व आयोजक आणि सहयोगी संस्था, तसेच नवनिर्मित पालक महासंघ एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आणि दर्जेदार शाळा ही गोष्ट महाराष्ट्राची ओळख बनवण्याच्या दृष्टीने मोठं काम करतील असा निर्धार करत या संमेलनाची सांगता केली गेली.

**– अपूर्व ओक**
भ्रमणध्वनी : ९८६९३९९४५९

## मराठीप्रेमी पालक महासंमेलनातील ठराव

१. महाराष्ट्र शासनाने मराठी शाळांच्या स्थितीचा अहवाल मांडणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी.

२. महाराष्ट्रातली मराठी माध्यमाची एकही शाळा बंद पडणार नाही यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी. १३०० शाळा बंद करण्याचा निर्णय तात्काळ स्थगित करावा.

३. मराठी शाळांचा तडकाफडकी रद्द केलेला बृहद्‌आराखडा पुन्हा लागू करून ग्रामीण महाराष्ट्रातील आणि दुर्गम/सीमावर्ती भागातील अनुदानित मराठी शाळांच्या स्थापनेचा मार्ग मोकळा करावा.

४. स्वयंअर्थसहाय्यित शाळांना मान्यता देताना मागेल त्याला इंग्रजी शाळा हे धोरण तात्काळ थांबवावे. शाळांच्या बृहद्‌आराखड्याचा विचार करताना इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या संख्येवर निर्बंध आणावेत.

५. मराठी माध्यमाच्या शाळांचे वेतनेतर अनुदान सुरू करावे आणि ते वेळेवर द्यावे. वेतनेतर अनुदान किमान १५% असावे .राहिलेले अनुदान ३१ मार्च २०१८ च्या आत द्यावे.

६. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे गुणवत्ता मूल्यमापन करून इंग्रजी माध्यमाच्या शाळा म्हणजे चांगले शिक्षण, हा गैरसमज दूर करण्याच्या प्रक्रियेला हातभार लावला.

७. मराठी शाळा डिजिटल करत असताना केवळ संख्यावाढ हा निकष न ठेवता त्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे दिले जाईल याचा विचार करून त्यासाठीचा ठोस कार्यक्रम हाती घ्यावा.

८. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खाजगी अनुदानित मराठी शाळांमधील शिक्षकांवर बिगर शैक्षणिक कामाचा पडणारा बोजा कमी करावा.

९. शाळांचे कंपनीकरण करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करावा. कॉर्पोरेट कंपन्या गुंतवणूक करणार असतील तर ती मराठी माध्यमाच्या शाळांमध्येच करणे अनिवार्य करावे.

१०. सीबीएसई, आयसीएसई तसेच इंटरनॅशनल बोर्डाच्या शाळां-मध्ये मराठी ही पहिली भाषा म्हणून पहिली ते दहावीपर्यंत अनिवार्यपणे शिकवली जावी.त्यात कुचराई करणाऱ्या शाळांना जबर दंड ठोठावणे तसेच मान्यता रद्द करणे यांसारखी निर्णायक कारवाई करावी.

११. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये होणाऱ्या प्रयोगांच्या आदान-प्रदानासाठी शासनाने सहकार्य करावे. मात्र या पुढाकाराला इव्हेंटचे/सोहळ्याचे रुप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. मराठी शाळांमध्ये पालकांनी आपल्या मुलांना पाठवावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाचा शालेय शिक्षण विभाग यांनी पालक प्रबोधनाच्या कार्यशाळा आयोजित आयोजित करून त्यात शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रांना समुपदेशनासाठी बोलवावे. यासाठी लोकांशी संपर्काची जबाबदारी स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यावर सोपवावी.

१३. मराठी भाषेचं अस्तित्व मराठी शाळांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे हे लक्षात घेऊन मराठी भाषा विभागात मराठी शाळांसाठी काम करण्यासाठी स्वतंत्र उपविभाग असावा. त्यासाठी मराठी अभ्यास केंद्राने दिलेला प्रस्ताव विनाविलंब सुरू करावा.

१४. मुंबई महानगरपालिकेने मराठी शाळा बंद करण्याचा आणि इंटरनॅशनल बोर्डांच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय तात्काळ रद्द करावा.

१५. मराठी शाळांना लागू असलेले सर्व अटी, नियम अनिवार्यपणे इंग्रजी शाळांनाही लागू करावेत. ●

# असेही एक साहित्य संमेलन! दिवाळी अंकातील लेखकांचा गौरव!



दिवाळीच्या खुमासदार फराळासोबत वैचारिक खुराक देतात ते दिवाळी अंक. याच दिवाळी अंकांतील लेखक तसंच ज्यांची एक-दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत अशा साहित्यिकांचे साहित्य संमेलन आयोजित करण्याची भन्नाट आयडिया सुचली आणि साकारली ती नाट्यकर्मी अशोक मुळ्ये यांनी. सोमवारी दादर-माटुंगा कल्चरल सेंटरच्या हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाचं अध्यक्षस्थान भूषवलं ते 'ऋतुरंग'च्या अरुण शेवते यांनी. यावेळी शेवते यांनी दिवाळी अंकाच्या संपादनाच्या प्रवासामध्ये जी लाख मोलाची माणसं भेटली, त्यांनी दिलेल्या अनुभवातून जे शिकता आले याचा आवर्जून उल्लेख केला. एकेक विषय घेऊन त्यांच्या असंख्य कंगोऱ्यांना स्पर्श केला. 'हा विषय दमदारपणे उलगडून दाखवण्याचे काम 'ऋतुरंग' दिवाळी अंकाने सातत्याने पंचवीस वर्षे केले आहे. अशा वेळी पुनरावृत्ती होण्याचाही धोका असतो, पण लेखक व संपादकांचा नेमका संवाद असेल तर ही भीती गळून पडते. कुणाकडून काय लिहून घ्यावे यापेक्षा कुणाकडून काय लिहून घेऊ नये, हे ज्याला कळतं त्याला उत्तम साहित्य मिळते', अशा दिवाळी अंकाच्या संपादनाच्या प्रक्रियेतील कळीच्या गोष्टी आवर्जून सांगितल्या. नकारात्मक आठवणींवर भर देण्यापेक्षा ज्या माणसांनी छोट्या-छोट्या अनुभवांतून शिकवले त्यांच्याही आठवणींचा उल्लेख शेवते यांनी केला. कलावंताच्या अंगी ऋजुता हवी, तर त्याचा अहं गळून पडतो. अंगात सणकून ताप असताना कलेच्या आस्थेपोटी आयुष्याचा पट उलगडून दाखवणाऱ्या विठाबाई नारायणगावकर, व्यस्त दिनक्रमामुळे कार्यक्रम सुरू असतानाही मध्यंतरामध्ये मुलाखत देणाऱ्या सुरेखा पुणेकर, स्वस्तुतीमुळे अवघडून जाणारे कवी गुलज़ार अशा आयुष्यात काही मोलाचे शिकवणाऱ्या माणसांच्या आठवणीही शेवते यांनी यावेळी सांगितल्या. 'ऋतुरंग' दिवाळी अंकाला २५ वर्षं पूर्ण झाल्याबद्दल त्यांना मुळ्येकाकांच्या माझा पुरस्काराने गौरवण्यात आले.

रविप्रकाश कुलकर्णी हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते तर सन्माननीय अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक भारतकुमार राऊत उपस्थित होते. त्यांनी सडेतोड मत मांडले. 'वाचक-लेखक संवाद हरवत चालला आहे, वाचकांना नेमके काय हवे आहे हेच लेखकाला माहीत नसेल तर सकस साहित्य निर्मिती कशी होणार? नव्या पिढीची भाषा, त्यातील विचार, लय यांचा कानोसा घेतला जात नाही. नवी पिढी आता नेटवर वाचत असेल, तर प्रकाशकांनीही पुस्तकनिर्मितीचाच अट्टहास का धरायचा?' असाही प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला.

पहिल्याच वर्षी ७५ हजारांचा विक्रमी खप झालेल्या 'झी मराठी'च्या 'उत्सव नात्यांचा' या दिवाळी अंकासाठी निलेश मयेकर आणि त्यांच्या टीमलाही गौरवण्यात आले.





कॅन्सरला मात देताना 'कॅलिडोस्कोप' हा प्रेरणादायी कथासंग्रह लिहिणाऱ्या सृष्टी कुलकर्णी या युवा प्रतिभेला 'माझा' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सन्मान सोहळ्यानंतर झालेल्या संगीत मैफलीत निलिमा गोखले, सागर सावरकर, विद्या करलगीकर, शाल्मली सुखटणकर यांनी सुरेल गाणी सादर केली. अभिनेता सुनील बर्वे आणि संगीतकार राहुल रानडे यांनीही गाणी सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संगीत संयोजन प्रशांत लळीत यांनी केले. या संमेलनाची सांगता झाली ती मुळ्येकाकांनी सुचविलेल्या विषयाच्या परिसंवादाने. 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याची 'न्यूड' चर्चा' या विषयावर शरद पोंक्षे, हृषिकेश जोशी या अभिनेत्यांसह प्रा. दीपक पवार यांनीही रोखठोक मतं मांडली. परिसंवादाचे सूत्रसंचालन रविप्रकाश कुलकर्णी यांनी केले. या संपूर्ण साहित्य संमेलनाला सुमारे १५० साहित्यिक, पत्रकार, निवेदक आवर्जून उपस्थित होते. ●


**ग्रंथाली**



**मी स्त्री आहे म्हणून... - संपादन अरुण शेवते**

स्त्रीच्या वाट्याला जे सुखदुःख येते त्याचा प्रवास आयुष्याच्या अखेरपर्यंत संपत नाही. 'स्त्री'ला माणूस म्हणून समजून घेतले जात नाही. माहेर-सासर या वर्तुळात आणि समाजातही तिच्याकडे 'स्त्री' म्हणूनच पाहिले जाते. 'स्त्री'ला ती 'स्त्री' आहे म्हणून काय वाटते याचा शोध विजया राजाध्यक्ष, शिरीष पै, प्रतिभा रानडे, शारदा साठे, उर्मिला पवार, यशोधरा काटकर, सुरेखा सबनीस यांनी प्रांजळपणे आणि परखडपणे मांडला आहे. **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**



**मला उमगलेला पुरुष - संपादन अरुण शेवते**

'स्त्री'आणि पुरुष यांच्या नातेसंबंधाचा विचार करताना 'स्त्री'ला पुरुषाविषयी काय वाटते हे महत्त्वाचे आहे. वेगवेगळ्या नातेसंबंधात 'स्त्री' पुरुषाकडे कुठल्या दृष्टीने बघते? 'स्त्री'ला पुरुष कसा उमगतो? की उमगतच नाही. यांचा सर्वांगीण वेध मेघना पेठे, मल्लिका अमरशेख, ज्योत्स्ना कदम, डॉ. प्रतिमा इंगोले, रझिया पटेल, रश्मी करंदीकर, लीना मेहेंदळे, प्रतिभा रानडे, डॉ. वृषाली किन्हाळकर, नीला सत्यनारायण यांनी घेतला आहे. **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**



**आठवणींचे असेच असते - संपादन अरुण शेवते**

१९९३ साली पहिला अंक प्रसिद्ध झाला. २०१७ ला पंचविसावा अंक प्रकाशित झाला. या २५ वर्षांत ऋतुरंग दिवाळी अंकातल्या लेखनाची ४९ पुस्तके प्रकाशित झाली. ५० वे पुस्तक 'ग्रंथाली'ला प्रकाशित करताना आनंद वाटतो. ऋतुरंग दिवाळी अंकातील २५ वर्षांतील निवडक लेख वाचकांसमोर ठेवताना हाच दृष्टिकोन आहे. गुलजार, मृणाल गोरे, अरुण साधू, दया पवार, शिरीष पै, कुमार केतकर, उषा मेहता, अवधूत परळकर, बाळ देशपांडे, गंगूबाई हनगल, शंकर वैद्य, दिलीप चित्रे, राम देशपांडे, निळू फुले, सुशीलकुमार शिंदे, सतीश भावसार, नरेंद्र चपळगावकर, शंकर महादेवन, अमृता प्रीतम, डॉ. सदानंद मोरे, राजीव खांडेकर, गिरीश कुबेर, नाना पाटेकर, डॉ. उदय निरगुडकर, यशवंतराव गडाख, पी.डी. पाटील, प्रदीप म्हापसेकर, मुकेश माचकर या सर्व लेखकांनी आपल्या आठवणी येथे प्रांजळपणे मांडल्या आहेत. **मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.**

## विजय शं.माळी लिखित आणि ग्रंथाली प्रकाशित ‘आर्त माझ्या बहु पोटी’ या कादंबरीला २०१६ चा भि. ग. रोहमारे सर्वोत्कृष्ट ग्रामीण साहित्य पुरस्कार



सर्वोत्कृष्ट ग्रामीण साहित्यासाठी गेल्या २८ वर्षांपासून दिला जाणारा २०१६ चा, प्रतिष्ठेचा भि. ग. रोहमारे राज्यस्तरीय सर्वो त्कृष्ट ग्रामीण कादंबरी पुरस्कार विजय शं.माळी लिखित आणि ग्रंथाली, प्रकाशित ‘आर्त माझ्या बहु पोटी’ या कादंबरीला ज्येष्ठ विचारवंत व माजी न्यायमूर्ती उच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य श्री. बी.जी. कोळसे-पाटील यांच्या हस्ते, साकरबेन सोमैया सभागृह, के.जे. सोमैया महाविद्यालय कोपरगाव, येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

डॉ. सुधाकर शेलार, डॉ. शिरीष लांडगे, डॉ. गणेश देशमुख, प्राचार्य लक्ष्मण महाडिक यांच्या संयुक्त निवड समितीच्या वतीने आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. गणेश देशमुख म्हणाले, ‘‘एकाच लेखकाला पुन्हा पुरस्कार देण्याचा आमचा प्रघात नाही पण ही कादंबरी एवढी चांगली आहे की तिने आमचे नियम बाजूला ठेवायला आम्हाला भाग पाडले. हे खऱ्या अर्थाने या पुस्तकाचे यश आहे आणि आमच्या निर्णयाचा आम्हाला अभिमान वाटतो.

‘आर्त माझ्या बहु पोटी’ ही कादंबरी समकालीन कौटुंबिक, सामाजिक, ग्रामीण वास्तवाचा व प्रश्नांचा चिंतनगर्भ वेध घेणारी, ग्रामीण शिक्षित माणसाची जरासंधाप्रमाणे झालेली अवस्था प्रगट करणारी वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे.

याच कादंबरीला नुकतेच दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूरच्या देवदत्त पाटील उत्कृष्ट कादंबरी पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. •

## संदीप राऊत यांच्या ग्रंथाली द्वारा प्रकाशित ‘श्रमिकाख्यान’ पुस्तकाला डॉ. वि. म. गोगटे पुरस्कार




वसईतील संदीप राऊत यांच्या ‘श्रमिकाख्यान’ या तळागाळातील विविध श्रमिकांवर लिहिलेल्या पुस्तकाला सार्वजनिक वाचनालय, नाशिक ह्या १७७ वर्षे जुन्या ग्रंथालयाचा सन्मानाचा ‘डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार’ प्राप्त झाला.

ललितेतर विभागातील हा पुरस्कार दि. १० नोव्हेंबर २०१७ रोजी नाशिक येथे प्रसिद्ध विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते राऊत यांना प्रदान करण्यात आला. •

## अनुवादाच्या वाटेवरचा मार्गदर्शक आणि हृद्य संवाद

माणसं आत्मकथन का लिहितात, याची ढोबळ मानाने दोन कारणं सांगता येतील. एक म्हणजे आपला जीवनप्रवास, त्यातील संघर्ष लोकांसमोर आणायचा असतो आणि दुसरं म्हणजे विवक्षित क्षेत्रातील अनुभव इतरांना सांगायचे असतात. अर्थात या दोन्ही कारणांची सरमिसळही आत्मकथनात असते; पण प्राधान्य कोणत्या गोष्टीला द्यायचं, हे आत्मकथन लिहिणाऱ्यावर अवलंबून असतं (आणि प्रत्यक्ष आत्मकथन लिहायला बसल्यावर प्रत्यक्षात वैयक्तिक जीवन आणि व्यावसायिक जीवन असे जीवनाचे दोन कप्पे करता येतात का, हा प्रश्नच आहे.) यातील दुसऱ्या कारणासाठी, म्हणजे आपले अनुवाद करतानाचे (आणि केल्यानंतरचेही) अनुभव शब्दबद्ध करण्यासाठी उमा कुलकर्णी यांनी आत्मकथन लिहायचं ठरवलं आणि 'संवादु अनुवादु' हे आत्मकथन शब्दबद्ध केलं.







अनुवाद करतानाचे अनुभव वाचकांना सांगताना त्या आपल्या वैयक्तिक जीवनाबद्दलही निवेदन करतात. त्यांच्या बालपणापासून बहुभाषिक लोकांमध्ये राहण्याचा योग आला. बेळगावमधील ठळकवाडी या उपनगरात त्यांचं बालपण गेलं. बेळगावसारख्या सीमाभागात मराठी–कन्नडखेरीज अन्यही भाषा त्यांच्या कानावर पडत. त्यांचं बालपणचं घर, घरातील आणि आजूबाजूची माणसं, परिसर याबद्दल त्यांनी लिहिलं आहे.

त्यांचं शिक्षण, त्यांच्या मैत्रिणी, विरूपाक्ष कुलकर्णी यांच्याशी झालेला विवाह, विरूपाक्ष यांचं कुटुंब, त्यांचं आजोळ, उमाताईंचे स्वत:चे नातेवाईक यांच्याबद्दल उमाताई मोकळेपणानं लिहितात. त्यांचं पुण्यातील घर, त्या घरात राहत असताना त्यांना लाभलेले शेजारी, विरूपाक्ष यांची वरणगावला झालेली बदली, तिथले अनुभव, त्यांच्या भाड्याच्या घराबाबत कोर्टात उभी राहिलेली केस इ. तपशील निवेदनाच्या ओघात येत राहतात.

अनुवादाचा प्रवास कसा सुरू झाला आणि तो कसा समृद्ध होत गेला याविषयीचं उमाताईंचं निवेदन म्हणजे या पुस्तकाचा आत्मा आहे. अनुवादाच्या या प्रवासामुळे शिवराम कारंत, एस. एल. भैरप्पा यांच्यासारख्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कन्नड लेखकांचा, तसेच गिरीश कार्नाड, वैदेही यांचाही सहवास त्यांना लाभला. शिवराम कारंतांचा तर दीर्घ सहवास त्यांना लाभला. या लेखकांशी चर्चा करण्याचं भाग्य मिळालं. तसंच या अनुवादांदरम्यानचे उमाताईंचे अनुभव वाचकाला उच्च प्रतीचा आनंद देऊन जातात. उमाताईंची मूळ साहित्यकृतीशी झालेली समरसता आणि त्याच वेळी त्यातील एखाद्या उल्लेखाचा साक्षेपाने विचार करणं, या दोन्ही गोष्टी मनाला भावतात.

बी. ए. झाल्यानंतर अकरा वर्षांनी उमाताईंनी एम. ए. (चित्रकला) ला प्रवेश घेतला. एम. ए.च्या दुसऱ्या वर्षात त्यांची शकुंतला पुंडे यांच्याशी ओळख झाली. त्यांच्यामुळे डॉ. द. दि. पुंडे यांच्याशीही ओळख झाली आणि या ओळखीचं गाढ स्नेहात रूपांतर झालं. अनुवाद करताना पुंडे दांपत्याचं त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन लाभलं. त्याचबरोबर प्रभाकर पाध्ये, कमल पाध्ये, पु.ल. देशपांडे आणि सुनीताबाई देशपांडे या दांपत्यांशी त्यांचे स्नेहबंध दृढ झाले. त्याचबरोबर माधवी देसाई, शांता शेळके यांच्याशी त्यांचा परिचय झाला. सुधा मूर्ती यांच्याशीही त्यांची मैत्री झाली. त्याव्यतिरिक्त अनुवादाच्या निमित्ताने अनेक लोक त्यांच्या संपर्कात आले.

चित्रपट, श्रद्धा–अंधश्रद्धा इ. विषयांवर त्या निवेदनाच्या ओघात भाष्य करतात. पीएच.डी.च्या निमित्ताने त्यांनी विविध देवालयांना दिलेल्या भेटींचा, त्यांनी केलेल्या पर्यटनाचा उल्लेखही यात त्यांनी केला आहे. पु.लं.च्या पुस्तकाच्या कन्नडमध्ये केल्या गेलेल्या अनुवादाविषयी त्यांनी लिहिलं आहे. विरूपाक्ष यांनी वेळोवेळी केलेल्या मराठी–कन्नड अनुवादांविषयी त्यांनी सांगितलं आहे. कर्नाटकातील संस्कृती, परिसर, स्त्रीजीवन, पदार्थ या विषयी या पुस्तकातून माहिती मिळते. 'मराठी–कन्नड स्नेहवर्धन' ही संस्थाही त्यांनी स्थापन केली आहे.

तर एका अनुवादकाचा हा संपन्न प्रवास आहे. अनुवादक म्हणून उमाताई कशा घडत गेल्या आणि समृद्ध होत गेल्या, याचं मनोज्ञ दर्शन 'संवादु अनुवादु'मधून घडतंच; पण एक माणूस म्हणूनही उमाताईंचा साधेपणा वाचकांना भावतो. सासर–माहेरच्या मंडळींना, शेजारपाजाऱ्याना सामावून घेणाऱ्या, त्यांच्या सुख–दु:खाशी एकरूप होणाऱ्या आणि प्रसंगी त्यांच्या मदतीला धावणाऱ्या उमाताई वाचकांना जवळच्या वाटतात. त्यांचं आणि विरूपाक्ष यांच्या समृद्ध सहजीवनाचं प्रसन्न दर्शन या आत्मकथनातून घडतं. कोणत्याही भौतिक सुखाची अपेक्षा न करता साहित्य, कलास्वाद आणि माणसांमध्ये रमलेलं हे दांपत्य आहे.

अनुवाद करताना येणाऱ्या अडचणीं, त्यांचं निराकरण कसं करावं, अनुवाद कसा करावा इ. गोष्टींचं मार्गदर्शन या पुस्तकातून सोदाहरण घडतं. अनुवाद करणं म्हणजे केवळ एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत नेणं नव्हे, तर मूळ साहित्यकृतीतील गाभ्याला, आशयाला भिडणं, मूळ प्रांतातील संस्कृती समजून घेणं, मूळ साहित्यकृती ज्या काळात निर्माण झाली त्या काळाचे संदर्भ समजावून घेणं आणि मूळ भाषेबरोबरच आपल्या भाषेतील कंगोरे समजून घेणं आवश्यक आहे, हे उमाताईंच्या अनुभवांतून समजतं. म्हणून अनुवादाच्या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरावं आणि अनुवाद प्रक्रियेला दुय्यम समजणाऱ्यांनाही अनुवादाचं महत्त्व समजावं.

अनुवाद हा उमाताईंचा ध्यास आहे आणि 'संवादु अनुवादु'च्या निमित्ताने त्या 'ध्यासपर्वा'चा अनुभव त्यांनी वाचकांना देऊ केला आहे. तेव्हा सगळ्यांनी तो अनुभव अवश्य घ्यावा.

**– अंजली पटवर्धन**

संवादु अनुवादु
लेखक : उमा वि. कुलकर्णी
पृष्ठसंख्या : ४३२
किंमत : ४५०/–
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत ३५० रु.**

**'दायाद'च्या निमित्ताने...**

महेश एलकुंचवार लिखित 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी', 'युगान्त' या नाट्यत्रयीच्या निर्मितीची कहाणी प्रशांत दळवी यांनी 'दायाद' च्या रूपाने संपादित केली आहे. 'जिगीषा प्रकाशन'ने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. 'दायाद' म्हणजे वारसा. पैतृक संपत्तीतला वाटा तर आहे पण हा वारसा केवळ पैशाच्या स्वरुपात नाही तर मूल्यात्मकही आहे. त्यादृष्टीने हा नाट्यत्रयीचा 'दायाद' कसोटीला उतरतो.






१९९४ मध्ये पूर्वी सलग नऊ तासांच्या या नाट्यानुभवाला 'त्रिनाट्यधारा' असे नाव दिले होते. आता २३ वर्षांनंतर 'नाट्यत्रयी' म्हटले आहे. चंद्रकांत कुलकर्णीसारख्या एकाच दिग्दर्शकाला ही नाट्यत्रयी पुन्हा करावीशी वाटली यातच या तिन्ही नाटकांचे यश आहे. म्हणूनच चंद्रकांत कुलकर्णी 'वाडा उभारताना'च्या मनोगतात म्हणतात, ''वाड्यात माझं आतडं गुंतलंय!'' त्यांच्या मते, वाढत्या वयाबरोबर बदलत गेलेली दृष्टी आणि घट्ट झालेले नातेसंबंध आणि एलकुंचवारांचा 'वाडा' आणि स्वत:चा अनुभवलेला 'वाडा' हे सगळं एकमेकांत मिसळले गेलेले आहेत! पुढे ते म्हणतात, 'वाडा–मग्न–युगान्त' ही नाट्यत्रयी इतरांसाठी कदाचित फक्त एक रचना असेल, आकृतीबंध असेल... माझ्यासाठी मात्र तो आहे माझ्या जगण्याचा एक मोठ्ठा तुकडा... म्हणूनच वाड्यातली पात्रं माझ्यासाठी जिवंत माणसं आहेत... मला त्यांचा आवाज ऐकू येतो. प्रत्येकाच्या श्वासाची वेगळी लय जाणवते. त्यांचं बोलणं, बसणं, उठणं, हातवारे कधीच मुद्दाम नाट्यपूर्ण करावं लागलं नाही. खरं सांगायचं तर हे नाटक बसवताना मला सतत गंध येत राहिला–धुराचा, अन्नाचा, प्राजक्ताच्या फुलांचा, देवघरातल्या धुपारतीचा, गायीच्या शेणाचा, बाळाला न्हाऊमाखू घातल्यानंतरचा, वेगवेगळ्या माणसांच्या शरीराचा! यातूनच चंद्रकांत कुलकर्णी यांचं आतडं या नाटकांमध्ये आणि वाड्यामध्ये गुंतल्याचे जाणवते.

या पुस्तकाचे सहा विभाग केलेले आहेत. 'वाडा उभारताना'च्या विभागात लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, निर्माते यांचे लेख आहेत. ते लेख वाचनीय आहेत. अनुभवसमृद्ध आहेत. यापैकी प्रदीप मुळ्ये यांचा लेखही महत्त्वाचा आहे. अनुराधा कपूर यांनी महेश एलकुंचवार यांची घेतलेली मुलाखत (मराठी अनुवाद–मीनल परांजपे) अतिशय अभ्यासपूर्ण आणि पुढील पिढीला मार्गदर्शक ठरणारी आहे.

'वाडा जगताना' या दुसऱ्या विभागात नाटकातल्या कलावंतांची मनोगते आहेत. ही मनोगते वाचल्यावर त्या–त्या भूमिका जिवंतपणे साकारणाऱ्या कलाकारांचीही मने या 'वाड्यात' गुंतल्याचे जाणवत राहते. यामध्ये निवेदिता सराफ, वैभव मांगले, प्रसाद ओक, भारती पाटील, पौर्णिमा मनोहर, प्रतिमा जोशी, नेहा जोशी, विनिता शिंदे, दीपक कदम, अजिंक्य ननावरे, चिन्मय मांडलेकर, सिद्धार्थ चांदेकर, पूर्वा पवार, राम दौंड, राजश्री ठाकूर या सगळ्या कलाकारांच्या दृष्टीने ते 'वाडा जगले' आहेत. प्रत्येकाचे अनुभव मनाला भिडणारे आहेत. प्रामाणिकपणाने मांडले आहेत. या नाट्यत्रयीमध्ये काम करायला मिळणे याहून दुसरे भाग्य कोणते? अशीच समान भावना या सर्वच कलाकारांची आहे.

निवेदिता सराफांना 'वाडा'मध्ये काम करण्याबाबत संभ्रम पडला असताना त्यांची मोठी बहीण त्यांना म्हणाली, ''तुला कलाकार म्हणून मोठं व्हायचं असेल तर तू 'वाडा'सारखं नाटक केलं पाहिजेस. चंदूसारख्या दिग्दर्शकाच्या हाताखाली काम केलं पाहिजेस.'' असाच सल्ला अशोक सराफ यांनीही दिला होता. त्या दिशेने विचार करून निवेदिता सराफ यांनी 'वाडा'मध्ये काम करण्याचे ठरवले आणि मग त्यांची 'वहिनी' उभी राहिली असे त्या सांगतात. (पृ.८१)

प्रसाद ओक यांच्या मते, 'वाडा'चे शंभरेक प्रयोग झाल्यानंतर एका 'कर्टन कॉल'ला प्रेक्षकांकडूनच 'मग्न'ची विचारणा झाली. आणि 'मग्न'सुद्धा रंगमंचावर आलं. आणि आता 'युगान्त'सुद्धा! ''व्यावसायिक रंगभूमीवरचा हा असा पहिलाच प्रयत्न आहे. सलग आठ तासांच्या नाट्यत्रयीचा! या उपक्रमाचा आपण एक भाग आहोत ही कल्पनाच अत्यंत सुखावह आहे. अभिमानाची आहे!'' (पृ. १०३)

अशीच भावना इतरही कलाकारांच्या मनोगतामधून जाणवत राहते. म्हणूनच सिद्धार्थ चांदेकर म्हणतात, ''आमची 'युगान्त'ची नाटक बसवतानाची तालीम प्रोसेस कायम स्वप्नात येईल!'' (पृ.१४३)

या नाट्यत्रयीमधील भूमिका साकारणे म्हणजे प्रत्येकाला आव्हान वाटत होतं! सगळ्यांचे पाय वाड्यात रुतले आहेत असेच त्यांना वाटत राहते. नाट्यत्रयीसारख्या अभिजात कलाकृतीत काम करण्याने आपल्या जाणिवा समृद्ध झाल्याचे मत सर्वच कलाकारांनी व्यक्त केल्याचे दिसते. या कलाकारांच्या मनोगतातील शीर्षके अत्यंत बोलकी आहेत. उदाहरणार्थ– 'आणि मी वहिनी होत गेले' (निवेदिता सराफ), 'बडा विलंबित ख्याल' (वैभव मांगले), 'अभूतपूर्व प्रवास' (प्रसाद ओक), 'नात्यांकडे पाहण्याची वेगळी नजर मिळाली' (दीपक कदम), 'तळ्याकाठी' (चिन्मय मांडलेकर), 'आयुष्याचं सरप्राइज' (प्रतिमा जोशी) इत्यादी.

'अनुभवमग्न होताना' या तिसऱ्या विभागात 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' विषयीची प्रसिद्ध झालेली परीक्षणे आहेत. या संदर्भात राज काझी यांना 'मनावर कोरलं जाणारं नाट्यशिल्प म्हणजे 'वाडा चिरेबंदी' वाटते. ते म्हणतात, ''या नाटकातला क्षण न् क्षण आपल्याला बांधून ठेवतो. काळाच्या रगाड्यात ही नाती विस्कटत चालली आहेत. आणि पूर्वजांचा चिरेबंदी वाडाही खचत चालला आहे. रक्ताच्या नात्याचे बंध आणि बदलत जाणारी मूल्यसंस्था दुभंगत जाणारा प्रत्येक माणूस... आतडं सोडवून घेताना ते अधिक गुंतत जाण्यातली तगमग! या सगळ्यांशी आपलं थेट नातं जुळण्याला कारण यातल्या खऱ्या व्यक्तिरेखा आणि

अनलकृंत बोलीभाषा! भारतीय रंगभूमीवरच्या वास्तववादी नाटकाचा मापदंड ठरावा असं! (पृ. १६१–१६२)

जयंत पवार यांच्या मते, 'वाडा चिरेबंदी' जसं नाट्यांतले सूक्ष्म ताण विणत उंच होत जातं तसं 'मग्न तळ्याकाठी' माणसांच्या मनात खोल उतरत जातं! पहिल्या भागात 'वाडा' हे ढासळत्या व्यवस्थेचं प्रतीक आहे, तर इथे 'तळं' हे मनाचं रुपक बनून आलेलं आहे! (पृ. १६४)

विजय तापस यांच्या मते, 'युगान्त' ही नाट्यत्रयी आहे. 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' आणि 'युगान्त' अशा तीन नाटकांच्या परस्परावलंबी, परस्पराश्रयी आणि स्वविशिष्ट एकात्मतेतून ही नाट्यत्रयी साकारलेली आहे! (पृ. १८०)

प्रख्यात चित्रकार सुधीर पटवर्धन यांनी नाट्यत्रयी 'एक ह्यूमन स्केच!' या दृष्टिकोनातून आपली मते मांडली आहेत. ती समर्पक आहेत.

चौथा विभाग 'प्रतिसादाच्या चांदण्यात' आहे. यामध्ये 'नाट्यत्रयी'च्या संदर्भात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रतिक्रिया आहेत. त्यामध्ये भालचंद्र मुणगेकर, निळू दामले, सचिन–सुप्रिया पिळगांवकर, संदीप कुलकर्णी, सुनील बर्वे, क्षितिज पटवर्धन इत्यादींचा समावेश आहे.

पाचवा विभाग 'त्रिनाट्यधारा'–१९९४ (फ्लॅश बॅक) असा आहे. यामध्ये अरुण काकडे, सचिन खेडेकर, डॉ. वि.भा. देशपांडे यांचे लेख आहेत. नाटकामध्ये पूर्वी 'अभय'ची भूमिका सचिन खेडेकर यांनी साकारली होती. त्यावेळी शंभर दिवसांच्या तालमीनंतर हे नाटक उभं राहिलं! आज नवीन संचात हे नाटक पाहताना ते म्हणतात, ''हे नाटक प्रेक्षक म्हणून पाहतानाचा माझा अनुभव म्हणजे डोक्यात एक नाटक चालू आहे आणि समोर एक घडतंय असा होता!''

शेवटी परिशिष्टामध्ये त्रिनाट्यधारेचे प्रयोग कुठे झाले त्याच्या नोंदी आहेत. मिळालेल्या विविध पुरस्कारांची यादी आहे.

लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार या नाट्यत्रयीचा हा आविष्कार तितकाच महत्त्वपूर्ण, प्रभावी आहे. त्यामुळेच एलकुंचवारांचा हा ढासळणारा वाडा पुन्हा बांधण्याचं श्रेय या सर्वांबरोबरच तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या तंत्रज्ञांना आणि 'दायाद'चं संपादन करणाऱ्या प्रशांत दळवी यांनाही जातं!

'दायाद'चे मुखपृष्ठ अत्यंत लक्षणीय, अर्थपूर्ण आहे. हे देखणे पुस्तक आपल्यासमोर आल्याचे समाधान मिळते. एकूणच प्रशांत दळवी यांनी लेखक, दिग्दर्शक आणि नाट्यकलावंत यांनी दिलेला हा वारसा 'दायाद'च्या रुपाने संपादित करून या नाट्यत्रयींचा विविध अंगांचा एक पटच आपल्यासमोर ठेवला आहे. त्यादृष्टीने हा मौलिक ठेवा दस्तऐवजाच्या रुपाने जतन करून ठेवावा असाच आहे.

**– मधुरा कोरान्ने**



## ॥ग्रंथाली॥



### पत्रास कारण की... – अरविंद जगताप

पत्र खरंतर खाजगी गोष्ट असते. एकट्याने वाचण्याची. एकट्याने लिहिण्याची. पण तुमच्या प्रतिसादामुळे पत्रं जाहीरपणे वाचली गेली. ऐकली गेली. टीव्हीवर सहसा पुस्तकातल्या गोष्टी असतात. टीव्हीवरच्या गोष्टीचं पुस्तक होणं आपल्याकडे दुर्मिळ आहे. हा योग तुमच्या पत्रावरील प्रेमामुळे जुळून आलाय. वाचता वाचता अचानक पेन घेऊन तुमच्यातला कुणी आपल्या आवडीच्या माणसाला पत्र लिहायला बसेल. आपलं लिखाण नेमक्या पत्त्यावर पोचलंय याचं अरविंद जगताप यांना समाधान होईल. मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.



### मोराची बायको – किरण येले

किरण येले यांचा जो कथाप्रवास चालतो, त्याला उत्तम सामाजिक ग्रहणशक्तीचे अधिष्ठान लाभलेले आहे. कथेतील पात्रे सर्वसामान्य स्तराबरची, विशिष्ट परिस्थितीत कुंचबलेली, असहाय्य असली तरी ती काठाला लागण्यासाठी सकारात्मकतेने धडपडताना दिसतात. तसा विविध स्तरांवरील माणसांच्या, स्त्री–पुरुषांच्या कथा सांगणारा 'मोराची बायको' हा कथासंग्रह एक अनोखा 'टोपाझ' आहे.

**– आनंद अंतरकर**

मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.



### प्लॅटफॉर्म नंबर ९ – किरण येले

हे नाटक म्हणजे प्रातिनिधिक चित्रण आहे, घरातनं पळून आलेल्या आणि रेल्वेप्लॅटफॉर्मवर आयुष्य कंठणाऱ्या अनाथ मुलांचं. प्रतिकूल परिस्थितीतही, हसत–खेळत जगत, विघातक व्यवस्थेशी फलाटावरल्या मुलांचा चाललेला लढा या नाटकात येतो. बुटपॉलिश करणारी, बाटल्या वेचणारी, गजरे विकणारी अशी विविध कामं करणारी मुलं कोणत्या वास्तवातून जात असतात याचं दाहक चित्रण या नाटकात येतं.

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.



### लाखातली एक – चित्रा मेहेंदळे

लहानपणापासून लागलेल्या दुखण्यांची लांबलचक श्रेणी आणि कॅन्सरशी दिलेला दीर्घकालीन लढा, त्या दुःख–वेदनांमधूनही आत्मसात केलेल्या अनेक गोष्टींमधून मिळवलेला सृजनशील आनंद हा सारा प्रवास अतिशय प्रेरणादायी आहे. या दुखण्याच्या प्रवासाचे कथनही लेखिका चित्रा मेहेंदळे यांनी वेगळ्या आकृतिबंधात मांडल्याने निर्भेळ असा वाचनानंद वाचकाला मिळत राहतो.

**– माधवी कुंटे**

मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.



### माझा प्रवास... माझे अनुभव – रेखा राव

लेखिका रेखा राव यांना लहानपणापासून प्रवासाची खूप आवड. त्यांच्या पतीला नैरोबी, किसुमु व मोंबासा या तीन शहरांत मॅनेजर म्हणून काम करायची संधी मिळाली. आणि तिथे राहून चाळीस वर्षांपूर्वीचे तिथले जीवन पाहण्याची व अनुभवण्याची संधी मिळाली. गेली तीस वर्षे त्या विविध मासिके, दिवाळी अंक, वर्तमानपत्रांतून कथा–लेख–प्रवासवर्णनं लिहितात. १९८२ साली लेखिका रेखा राव यांनी 'श्री दीपलक्ष्मी' मासिकातून केनियाविषयी लेख लिहिले. तेच लेख त्यांनी पुस्तकरूपाने सादर केले आहेत. मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.



### मनतरंग – दीपक घैसास

दीपक घैसास– अत्यंत बुद्धिमान आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व! नानाविध विषयांवरचं लेखन तसंच भाषणं त्यांच्या बहुआयामी व प्रेरणादायी व्यक्तित्वाची साक्ष देतात. पुस्तकातील लेखांमधून अर्थशास्त्र, समाजशास्त्र, पुराण, इतिहास, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान अशा अनेक विषयांचा कल्पकतेने वेध घेतला आहे. भातुकलीपासून भौतिकशास्त्रापर्यंत कोणताही विषय मोजक्या शब्दांत प्रभावी मांडण्याचं कसब त्यांच्या लेखणीत आहे. लिखाणातील अस्सलपणा आपल्या विचारांना चालना देतो आणि ओघवती शैली मनाची पकड घेत.

**– इला भाटे**

मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**माझा प्रवास... माझा अनुभव**

**रेखा राव**




### अनुभवांचे मुक्त संचित

प्रवास म्हटला की एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, अशी साधी सरळ व्याख्या. जीवन प्रवासात कलाप्रवास, साहित्यप्रवास, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक प्रवास असेही प्रवास असतात. हे सगळे जोडलेले असतात ते अनुभवांशी. जीवनाशी, निसर्गाशी, देशोदेशीच्या वैविध्याशी. ज्यांना तो आपल्या शब्दात रसाळपणे मांडणे शक्य झाले, त्यांना आपण प्रवासवर्णन म्हणतो. हे प्रत्यक्षात असते जगणे, अनुभवणे. हा अनुभव समोरच्या वाचकाला आपल्या अनुभवांशी जोडून घेतो. ज्यांना जे पाहता, अनुभवता आले नाही, ते या वर्णनातून तो पाहू शकतो. त्या अर्थाने प्रवासवर्णन हे संजयाची भूमिका पार पाडते. 'माझा अनुभव... माझे अनुभव' हे रेखा राव यांचे प्रवासवर्णन तो अनुभव घेऊन आलेले आहे.

मनाशी एखादा निश्चय पक्का केला आणि त्याचा प्रयत्नपूर्वक पाठपुरावा केला, तर इप्सित साध्य होण्यास फारसा वेळ लागत नाही. ते साध्य होताना पाहताना अर्थातच होणारा आनंद मोठा असतो. परंतु जेव्हा काही गोष्टी सहजपणे घडून जातात, अपेक्षा केलेली नसताना त्यांचा उपभोग घेण्याची संधी मिळते, तेव्हाच्या आनंदाला मात्र पारावार उरत नाही. रेखा राव यांना मिळालेला आनंद दोन्ही प्रकारांचा आहे. त्यामुळे त्यांना स्वतःला भाग्यशाली समजण्याचे भाग्य लाभलेले आहे. आपण परदेशी जावे, तिकडे राहावे, असा ध्यास असलेल्या राव यांना त्याप्रमाणे प्रथम परदेश प्रवासाची संधी मिळाली ती नैरोबीची. बँकेत असलेल्या श्री. राव यांना तिकडे बदली मिळाली, आणि रेखा राव यांच्या स्वप्नांना पंख लाभले. नैरोबी हे आफ्रिकन शहर, त्याला 'सिटी इन द सन' असे म्हटले जाते. निसर्गसौंदर्याने नटलेले वातावरण. आर्बो रेटम, लिमरू, रिफ्टवॅली, थिका ब्ल्यूपेस्ट,थॉमसन फॉल्स अशा रमणीय स्थळांनी नटलेले. गेमपार्क, नॅशनल पार्क सारख्या स्थळांनी शहराच्या सौंदर्यात भर घातलेली, परंतु महत्वाचा प्रश्न आला तो भाषेचा. त्यांची भाषा स्वाहिली. तिच्याशी परिचय नाही. मग नोकर, दुकानदार, प्रवास, इथे संवाद कसा साधणार? पण ते तेवढेच. देहबोली ही भाषा इथे प्रभावी ठरली. दुसरी अडचण चोरीची. इथे त्यांचे प्रमाण अधिक. त्यामुळे सावधगिरीचे जगणे आले. परंतु हळूहळू सगळ्याच गोष्टींची सवय होते. अवघड वाटणारे जगणे सुसह्य होते. हे व्यक्तिगत अनुभव राव यांनी मोकळ्या मनाने आणि तितक्याच खिलाडू वृत्तीने मांडलेले आहेत. इथे, केनियात भारतीय आहेत. जे स्वातंत्र्यपूर्व काळात तिकडे गेलेले आहेत. त्यांच्या पुढील पिढ्यांनी भारत पाहिलेला नाही, तरी ते स्वतःला विदेशी भारतीय म्हणवून घेतात. सण, परंपरा, रीतिरिवाज, यात भारतीयपण अजूनही पाळले जाते. यांना स्वाहिली भाषेत 'मुयीडी' म्हणतात. परंतु भारतातून नव्याने नोकरीधंद्यांच्या निमित्ताने आलेल्यांकडे पाहण्याची आपुलकी त्यांच्यात अभावाने दिसली, हे निरीक्षण चटका लावून जाणारे आहे. नैरोबी, किसुमु, केनिया, मोंबासा असे वेगवेगळ्या ठिकाणी दहा वर्षांचे वास्तव्य मिळाले. या वास्तव्यात स्थानिकांचे जगणे, जाती, चालीरीती, विवाह संस्था, शिक्षण, कष्टाळूपणा, शासन, शिस्त, लबाडी, यांचा अभ्यास करता आला. त्यांची संस्कृती, आपली संस्कृती यातले अंतर मोजता आले. निसर्ग, माणूस यांच्या सहवासात भरभरून आनंद मिळवता आला. या काळातले कौटुंबिक आयुष्य, आप्तांच्या विरहातील ताणतणाव आणि घरी असलेले नोकर यांचे वर्णनही यात आले आहे.

राव यांनी अमेरिका, मस्कत, श्रीलंका, केरळ असा बराच प्रवास केलेला आहे. मस्कतचे वेगळेपण, अमेरिकेची विविधता, रावणाची लंका, केरळची देवभूमी, अशी प्रत्येकाची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत, ती त्यांनी सौंदर्यदृष्टीने टिपली आहेत. इतिहास, भूगोल, समजून घेतलेला आहे. त्याच्याशी समरस होऊन त्यातला आनंद मनसोक्त घेतला आहे. वय, शरीर यांची तक्रार वा लोक काय म्हणतील याची पर्वा न करता तरूण होत सारे भरभरून अनुभवले आहे. त्यामुळेच सांगण्यासारखे संचित त्यांच्याकडे साचू शकलेले दिसून येते. सँडी वादळाची भीषणता आपण नुसते ऐकून आहोत, वा टीव्हीवरच्या दृश्यांवर विसंबून विश्वास ठेवला आहे. परंतु अमेरिकेतील हे वादळ त्यांनी झेलले आहे. केवढा मोठा अनुभव!

राव यांचा निसर्गाकडे ओढा किती आहे, याचे अनुमान त्यांनी केलेल्या वर्णनांतून दिसून येते. नायगारा धबधबा पाहताना त्या वर्णन करतात, 'हळूहळू सूर्य जसा वर आला तशी कोवळी किरणं त्यावर पडून पाण्यात असंख्य रुपेरी चांदण्या चमकू लागल्या.' हिवाळ्यात पडलेला बर्फ रस्ते खुले करण्यासाठी बाजूला केला जातो, त्यांच्याकडे पाहून त्या लिहितात, 'अनेक आठवडे हे डोंगर भुतासारखे रस्त्याच्या दोन्ही कडेला उभे असलेले दिसतात. जेव्हा सूर्यनारायणाची कृपा होते तेव्हा या बर्फावर त्याचे किरण पडून हा हिम मोत्यासारखा चमकू लागतो.' अशी अनेक उदाहरणे यात आलेली आहेत.

एका गृहिणीने विविध ठिकाणी केलेला प्रवास आणि त्यानिमित्ताने घेतलेले अनुभव या पुस्तकातून शब्दबद्ध केले आहेत. या लेखांत मांडलेले अनुभव प्रामाणिक आहेत. 'मिशन बॉस्टन' या लेखाच्या शीर्षकाखाली 'लेकीच्या बाळंतपणासाठी मुंबईहून अमेरिकेत' असे टिपण दिलेले आहे. लेकीच्या बाळंतपणासाठी भारतातून नेलेले मेथी–डिंकाचे लाडू अमेरिकेतल्या डॉक्टरी सूचनांमुळे मागे पडले तेव्हा त्या लिहितात, 'मग आम्ही दोघांनी आमची कंबर घट्ट होण्यासाठी हे लाडू संपवले. 'मनाचा मोकळेपणा म्हणतात तो हा. नजरेला जे दिसले, भावले, ज्यामुळे मन मोहरून गेले, वा मनस्ताप झाला, त्यांच्या वर्णनात कुठे डावेउजवे केलेले नाही. सहज सोप्या पद्धतीने समोर बसून अनुभव कथन करावेत, इतक्या सहजपणे हे लेखन लेखन केलेले आहे. त्यामुळे त्यातला प्रवाहीपणा काय राहिला आहे. उगाच कौतुकाचे, परदेशाचे म्हणजे सगळे चांगलेच असते हो, असा गोड गैरसमज कुठे येऊ दिलेला नाही. अनुभव हे अनुभवाच्या पातळीवरून जसे जगता येतात, तसे ते कथनही करता येतात, हे या लेखांमधून दिसून येते. सतीश भावसारांनी प्रवासात टिपलेल्या फोटोंचा एकत्रित संगम करून सुंदर आकार मखपृष्ठाला दिला आहे.

**मूल्य १६० रु. सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**लाखातली एक**

**चित्रा मेहेंदळे**




## आठवणीचा सकारात्मक गोफ

''मला कधी कधी वाटतं की आपण रोजच्या जीवनात उगाचच साध्या साध्या गोष्टीत टेन्शन घेत असतो. 'टु बी ऑर नॉट टु बी' असे काही जीवनमरणाचे प्रश्न प्रत्येकवेळी नसतात. पण आपण उगीच गोंधळतो, पटकन निर्णय घेत नाही आणि मग आपलेच टेन्शन वाढवतो.'' हे सत्य सांगण्यासाठी कुठल्या मानसशास्त्रज्ञाची आवश्यकता नाही. अगदी साधे व्यवहारीकपणे जगण्याकडे पाहणे आहे. हे पाहणे थोडसे मोकळ्या मनाने असावे. तटस्थपणे स्वतःच स्वतःकडे आत डोकावून पाहिलेले असावे. बस्स! पहा, जगण्यातला फरक किती जाणवू शकतो. जगणे आणि मरणे यातली ही सीमारेषा आहे. सर्कशीतला कसरतपटू प्रत्येक खेळागणिक जीवनमरणाच्या सीमारेषेवरून येतो, असे कुसुमाग्रजांनी म्हटलेले आहे.तो परत येतो हे महत्त्वाचे. त्याचे निर्णय, पाहण्याचा दृष्टिकोन हे निश्चित असतात, हे त्याचे कारण. चित्रा मेहेंदळे तेच सांगत आहेत, 'लाखातली एक' या पुस्तकातून.

चित्रा मेहेंदळे या स्वतःचा उल्लेख 'लाखताली एक' असा करतात. स्वतःच्या वेगळेपणासाठी ही बिरुदावली केव्हाही अभिमानाची ठरते. लाखातली एक या नजरेने कुणी पाहत आहे, ही गोष्ट तर अंगावर, मनावर मोरपीस फिरवणारी ठरते. परंतु मेहेंदळे ज्या लाखातली एकची गोष्ट सांगताहेत, ती ना मोरपीस फिरवणारी आहे ना मोहरून टाकणारी आहे.ती आहे सगळ्या सुंदर, मनोज्ञ, पारंपरिक कल्पनांना छेद देणारी गोष्ट.जिच्यापासून प्रत्येकजण पळण्याचा, बचावाचा पवित्रा घेतो अशी गोष्ट. फुलांच्या राशीऐवजी काट्यांच्या राशी तुडवणारी गोष्ट. तरीही स्वतः वरचा भरोसा आणि जगण्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन या गुणांच्या दृढ निश्चयामुळे त्यांना स्वतःविषयी ठामपणे म्हणता येते, होय आहे मी 'लाखातली एक'!

चित्रा मेहेंदळे यांना कॅन्सर या शब्दाने ओळख दिली, ती दुसऱ्या स्त्रीला झालेल्या ब्रेस्ट कॅन्सरमुळे. तिचे वर्णन ऐकून स्वतःची चाचपणी करून पाहिली. तिथे शंका डोकावली. डॉक्टरांचे उपचार आलेच. ग्रंथी निघाल्या मांसांच्या. पण रिपोर्ट आला तो 'नो मॅलिग्नन्सीचा'! शंकेपासून ते रिपोर्ट नकारात्मक येण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे अनेक भावभावनांचा.ते साल होते १९७२. त्यापूर्वी झाले ते आजार सुद्धा लाखात एक ठरावेत असेच. प्रथम झालेला आजार म्हणजे घटसर्प! ते साल होते १९५९. इथून त्यांची आणि आजारांची जणू मैत्रीच झाली. आले ते आजार हे लाखातली एक ठरावी, अशा इराद्यानेच जणू. टॉन्सिल, नाकात रंगीत खडा फसणे, डोळ्यात पंख्याच्या ऑईलपेंट जाणे, चामखीळ, अक्कलदाढेचे आडवे येणे, कुणीतरी भिरकावेलेल्या दगडाने डोक्याला खोक पडणे, मनगटावर गॅंगलिऑन होणे, मानेवर टीबीची गाठ येणे, असे सतत काहीना काही आजार. प्रत्येकवेळी दवाखाना, ऑपरेशन ठरलेले. प्रत्येक वेळी कॅन्सरची शंका. असा 'कॅन्सर' या शब्दाने चाळीस वर्षे त्यांचा पाठलाग केला. प्रत्येक आजाराच्या वेळी 'देअर इज नो एव्हिडन्स ऑफ मॅलिग्नन्सी', असे रिपोर्ट येत. हुश्श वाटायचे. परंतु शेवटी तो एकदाचा आलाच भेटीला. सुटले एकदाची, ही त्यावरची प्रतिक्रिया! या सगळ्यांतून जाताना शाळा, कॉलेज, प्रेम, लग्न, मुलांचे जन्म, त्यांचे शिक्षण हे सोबत होतेच.ते सारे निभावून आजारांशी सामना चालू. नंतर तर परतवूनच लावले. परंतु हे परतवून लावणे, स्वत:ला सावरणे अवघड होते. हा आजाराशी जसा लढा होता, तसा स्वतःशीच स्वतःचा होता.जीवन मरणाचा लढा होता, सीमारेषेवर उभे राहून खेळण्याचा. यात आईवडिलांनी खंबीरपणे साथ देणे, पतीचे ठाम उभे राहणे, प्रेमाला कुठे उणेपण येऊ न देणे, मुलांचे अभ्यासात हुशार असणे, परदेशात स्थायिक होणे, या गोष्टी आत्मबळ वाढवणाऱ्या ठरल्या. कौतुकाच्या, जिव्हाळ्याच्या गोष्टी कायम पाठीशी राहिल्या, ही जमेची बाजू. परंतु आजारपणातले दिवस आनंदी करण्यास इतकेच पुरेसे ठरत नाहीत. स्वतःला कुठेतरी सतत गुंतवून ठेवावे लागते. छंद, आवड यांची जोड द्यावी लागते. त्याचा अंगिकार केला. सतत वाचन करणे, कविता लिहिणे, ओरिगामी, रांगोळ्या यात मन गुंतवणे, त्यासाठी मुद्दाम अभ्यास करणे, आणि या छंदात प्राविण्य मिळवून पारितोषिके मिळविणे, इतपर्यंत प्रवास त्यातून झाला. हा सगळाच प्रवास वेधक आहे आणि तितकाच स्वत्वाची परीक्षा पाहणारा आहे.

लेखनासाठी वापरलेली शैली वेगळ्या धाटणीची आहे. ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आल्यानंतरचे वातावरण तसे गंभीर, क्लेशदायक असते. परंतु मेहेंदळे तिकडे लक्ष केंद्रित करीत नाही. तर त्या आपला भूतकाळ जागा करतात. आठवणींचे सुंदर गोफ विणत राहतात. लेखनातला मोकळेपणा आणि मनाचा मोकळेपणा, यामुळे वाचकाला एकाचवेळी दोन पातळीवरचे अनुभव अनुभवता येतात.त्यात आलेले तत्वज्ञान हे काही ओढूनताणून आणलेले नाही, ते अनुभवातून बाहेर आलेले आहे. त्यात सहजपणा पेरलेला आहे. माझा आजार, माझे दुखणे, हे रडगाणे नाही, आहे ते जीवनगाणे, जगण्याचे गाणे. 'अजिबात जाणवत नाही मला पसरू चाललेला काळेख घनदाट। माणुसकीचे उत्तम नमुने घेऊन येणार आहे नवी रम्य पहाट।।' अशा कवितेच्या उत्तम ओळी त्या लिहून जातात. स्त्रीसुलभता आणि लाज या एकमेकींच्या गळ्यात गळा घालून नांदणाऱ्या सख्ख्या संकोची मैत्रिणी. परक्याच्या समोर काय, डॉक्टरच्या समोरही त्यांची ताटातूट करायला मन धजावत नाही. त्याविषयी त्या लिहितात, 'एकदा बाईची आई झाली की ही सर्व लाज कुठल्याकुठे जाते. एका डिलिव्हरीत प्रत्येक स्त्रीला हा अनुभव येतो... आईपण असे खूप काही शिकवून जाते.'

सुंदर धवलकांतीचे गुलाबपुष्प, कुणाच्याही मनाला मोहिनी घालते. परंतु नेमका याच फुलाच्या देशाला विळखा बसलेला दिसला तर? तर मन थरथर करायला लागते.पण या विळख्याची तमा न बाळगता सूर्य किरणांचे स्वागत करण्यासाठी हे पुष्प उमलत जाते, तेव्हा ती ठरते, लाखातली एक गोष्ट. शीर्षक सार्थ करणारे हे मनोवेधक मुखपृष्ठ साकारले आहे सतीश भावसार यांनी.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

## विचारांचे मनस्वी तरंग

**मनतरंग**
**दीपक घैसास**




लेखक लिहितो म्हणजे काय करतो, हा प्रश्न अनेकांना पडतो. त्याचे साधे उत्तर आहे, तो मनातले विचार अनुभवांच्या पातळीवर तपासून कागदावर उतरवतो. हे उतरवलेले विचार घटनांचे, अनुभवांचे, नातेसंबंधांचे विविध रंग घेऊन येतात. साध्या-साध्या गोष्टींच्या निरीक्षणातून वेगळे कल्पित आकाराला येते. फक्त त्यासाठी हवी ती तरलता, निर्मळपणा, प्रगलभता, आणि तितकीच सहजता. हे सूत्र सर्वच ठिकाणी लागू होईल असे नाही, परंतु दीपक घैसास यांचे 'मनतरंग' हे पुस्तक या सुत्राला अधोरेखित करणारे आहे, असे विश्वासाने म्हणता येते.

गुलमोहोर हा रस्त्याच्या कडेला उभा असलेला संन्यस्त वृक्ष आपल्या चांगल्याच परिचयाचा आहे. त्याची रूपे ऋतूंप्रमाणे कधी मोहक, प्रसन्न, तर कधी उदास करणारी भासतात परंतु त्याच्यावर पक्षी कधीही घरटी बांधीत नाहीत, हे सत्य उमगते ते या लेखातून. लेखकाचा त्याच्याशी जुळलेल्या आंतरिक नात्याचा जिव्हाळा तर अंतर्मुख करणारा आहे. लेखकाने या वृक्षाचे केलेले वर्णन हेही तितकेच सुंदर आहे. 'वसंताच्या हिरव्या जंगलात लाल रंगाने भरलेला गुलमोहोर उठून तर दिसतोच, शिवाय जणू त्याने आपले प्रत्येक पान इतर वृक्षांना देऊन त्या बदल्यात त्यांची फुले आपल्याकडे आणल्याचा मला भास होतो.'

जॅकफ्रूट, पलापझम, कटहल, कंथाल, पनसम, मिट, नंग्का, कनून अशी अनेक नावे असलेले फळ म्हणजे फणस. वेगवेगळ्या देशांनी दिलेली आणि वेगवेगळ्या भाषेतली ही नावे. तामिळनाडूत आंबा आणि केळी यांच्याबरोबरीने तीन पवित्र फळांमध्ये मान आहे तो फणसाला. बांगला देशाचे हे राष्ट्रीय फळ आहे. ही माहिती मिळते ती 'फणस' या लेखातून. तीच गोष्ट सोन्याची. यात दिलेली आकडेवारी थक्क करणारी आहे. लग्न, बारसे, सणासुदी, गुंतवणूक, अडीअडचणीची सोय, भेट, आवड, अशी सोने खरेदी करण्यामागची कारणे. त्यांची माहिती टक्केवारीसह या लेखात आहे. जगात भारताचा सोने खरेदीत हिस्सा २६ टक्के आहे, हीही बाब उघड होते ती इथे. अधिकमासाची संकल्पना आणि त्यामागचे खगोलशास्त्र, पंचांग आणि गणितातील अचूकता यात भारताची आघाडी अधोरेखित केलेली आहे. कार्तिकेय यांनी विश्वप्रदक्षिणा केली ती मोरावर बसून. तर गणपतीने आपल्या आईवडिलांनाच विश्वरूप देऊन त्यांच्याभोवती प्रदक्षिणा घातली, ही पुराणकथा सर्वांना ठाऊक आहे. परंतु यात भेद आहे तो अभिप्रेत असलेल्या कल्पनेचा. कार्तिकेयाची प्रदक्षिणा ही सर्वसामान्यांना अभिप्रेत असलेली आहे. आणि गणपतीला स्वतःला अभिप्रेत असलेली कलपना ही भावविश्वाची आहे. चौकटी बाहेरचा विचार करून कुठलीही गोष्ट केली तर यशाची शक्यता अधिक असते, ही यातून लेखकाने दिलेली सूचकता कुणालाही आपलीशी वाटल्याशिवाय राहणार नाही. पाप आणि पुण्य यात समाजाची कशी फरफट चालू आहे, याविषयी 'पुण्याचे दुकान' या लेखात वास्तव मांडलेले आहे. पुण्य नावाचा शब्द इंग्रजी शब्दकोशात नाही म्हणजे पुण्य या शब्दाचे अस्तित्वहीनत्व लक्षात येते. तरीही जग त्याच्याच मागे कसे धावते, गाईला हिरवा चारा देऊन पुण्य कसे मिळवले जाते, हे श्रद्धेचे लक्षण आहे की अंधश्रद्धेचे? असा प्रश्न प्रत्येकाला पडावा. तीच गोष्ट श्राद्धाची. धर्मातील रुढीची सवंगता. मूळ शब्द आहे श्रद्धा परंतु तो झाला श्राद्ध. ही गफलत आणि त्या जोडीने आलेले संस्कृतीतील नियम, यांची सांगड कशी मूळ धरून आहे हे 'पितृपक्ष' या लेखात वाचायला मिळते. निळा चंद्र ही संकल्पना तशी मजेशीर म्हणायला हवी. ती आहे चंद्र पौर्णिमेशी जोडलेली. एकाच महिन्यात दोनदा पौर्णिमा आली तर दुसरी पौर्णिमा, किंवा एका तिमाहीत चारदा पौर्णिमा आली तर तिसरी पौर्णिमा ही निळ्या चंद्राची पौर्णिमा समजली जाते. 'आज सूर्य कुठे उगवला?' तर इंग्रजीत 'वन्स इन ब्ल्यू मून' असा वाक्प्रचार आला तो या निळ्या चंद्रावरून. रात्रीचे सण या लेखात नवरात्री विषयी सुंदर वर्णन केलेले आहे. गरबा हा पारंपरिक नवरात्रीतला नाच. गर्भ या शब्दापासून आलेला गरबा हा शब्द. मधोमध गर्भदीप लावून त्याच्याभोवती फेर धरत नाचायचा सण. घरोघरी ज्योतिकलश लावायचा उत्सव. माणसाला सतत पडणारे प्रश्न आणि त्यांची मालिका, परंतु न सापडलेली उत्तरे; सावरकरांचे ' सागरा प्राण तळमळला...' या कवितेचे उगमस्थान त्यामागील भावविभोरता, बाजीरावाचे अखंड अपराजित असणे, असे अनेक लेख आहेत, जे वाचताना हरखून जायला होते.

'सकाळ' मध्ये प्रकाशित झालेल्या लेखांपैकी निवडक लेखांचा हा संग्रह आहे परंतु वाचत असताना तो रतीब घातल्यासारखा एकसुरीपणा दाखवत नाही. प्रत्येक विषय वेगळा, अनुभव वेगळे, आणि त्यासाठी केलेला अभ्यास, हे सारे वाचत असताना ठळकपणे जाणवत राहते. वृत्तपत्रीय लेखनाला शब्दांची मर्यादा असू शकते, परंतु विचारांना आणि विषयांना मर्यादा नसते. ती पाळूनही लालित्य जपण्यातला तरलपणा कसा असतो, याचाच जणू हे लेख प्रत्यय देत राहतात. जाता-जाता नवीन काही देऊन जातात.

या संग्रहातील प्रत्येक लेख स्वतंत्र आहे. आशयात उजवेपण आहे. मांडणी, शैली यांचे भान उत्तमपणे जपलेले आहे. त्यामुळे लेखांचा शेवट होईपर्यंत लेखकाची पकड त्यावर कायम राहिलेली दिसते. एक चांगला लेखसंग्रह वाचल्याचा आनंद 'मनतरंग'ने दिला असे हमखास म्हणता येते.

मनतरंग हे मनातल्या विचारांचे रंग दाखवणारे पुस्तक. विविध छटा असलेले. हे रंग इंद्रधनुष्यात एकत्रित सापडतात, तसे मोराच्या पिसाऱ्यावर. सतीश भावसार यांनी अलगद तेच पीस मुखपृष्ठासाठी निवडले. देठाला लेखणीचे रूप बहाल केले. आणि बाजूला मनातला लहानसा पक्षी. हे मुखपृष्ठ पाहताच मनाला भुरळ घालणारे.

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रुपये**

## ग्रंथपान

**मला उमगलेला पुरुष**
**संपादन : अरुण शेवते**




### पुरुष : उमगलेला–न उमगलेला!

मुलगा, भाऊ, पिता, आजोबा ही पुरुषांची पारंपरिक रूपे. मित्र, शिक्षक, सहकारी, प्रियकर ही दुसरी रूपे. या सगळ्यांत वावरणारा पुरुष प्रत्येक वेळी एकसारखा असण्याची शक्यता नाही. तसे त्याचे अनुभवही सारखे असण्याची शक्यता नाही. अनेक भूमिका, रूपे, पैलू, गुणावगुण, वेळ काळ आणि प्रसंगानुरूप होणारे बदल या सगळ्यांचा तो लोलक म्हणता येईल. नजरेच्या परिप्रेक्ष्यातून दिसणारा रंग प्रत्येक वेळी वेगळा असेल. अशा पुरुषाशी आयुष्यभराचा संबंध, सहवास असलेल्या स्त्रीला तो कसा उमगला, त्या अनुभवांची एकत्रित गुंफण असलेला संग्रह म्हणजे 'मला उमगलेला पुरुष.'

या लेखसंग्रहात दहा लेख आहेत. त्यांच्या लेखिका आहेत ज्योत्स्ना संभाजी कदम, मल्लिका अमरशेख, नीला सत्यनारायण, डॉ. प्रतिभा इंगोले, लीना मेहेंदळे, डॉ. वृषाली किन्हाळकर, रझिया पटेल, रश्मी करंदीकर, मेघना पेठे आणि प्रतिभा रानडे. कर्तृत्व, प्रतिभा, क्षेत्र, अनुभव असा समृद्ध वारसा असलेल्या या लेखिका आहेत. त्यामुळे निरीक्षण, अनुभव, अभ्यास, चिकित्सा, अशा विविधांगी पैलूंचे दर्शन या संग्रहात तर घडते.

पिता हा पहिला पुरुष असतो ज्याची ओळख मुलीला प्रथम होते. आदर्श, संस्कार, शिक्षण–शिकवण, स्वभाव, वृत्ती, माणूसपण हे सारे संचित आयुष्यावर प्रभाव टाकणारे ठरते ते पित्याचेच. यातून जी प्रतिमा मुलीच्या मनात निर्माण होते, त्यातून ती जगातील इतर पुरुषांकडे पाहायला शिकते. पुरुष या भूमिकेचा मानदंड तिच्या मनात तयार होतो तोही पित्याकडे बघूनच. रश्मी करंदीकरांचे हे मनोगत कुणालाही आपले वाटावे इतके चपखल आहे. बहुतेक लेखांतून 'पिता' या व्यक्तीने दिलेल्या वारशाविषयी आपुलकीने लिहिलेले दिसून येते. परंतु त्याचवेळी प्रतिभा रानडे ना.सी. फडके यांचा अनुभव पुढे करतात. त्यांच्या कमलाशी लग्न करून घरातून निघून जाण्यामुळे पंधरा वर्षांची लेक मात्र टवटवीत केळ करपून जावी तशी उन्मळून पडली. तर त्याच्या उलट दुर्गाबाई भागवत यांचे वडील; ऐन तारुण्यात पत्नीचे निधन झाले तेव्हा दुसरे लग्न करण्याचा विचार त्यांच्या मनात आला नाही. तीन मुलींचा सांभाळ तर केलाच परंतु त्यांना परावलंबित्व येऊ नये म्हणून आयुष्यभराची बेगमी करून ठेवली. त्यामुळेच नीला सत्यनारायण लिहितात, 'खरा पूर्ण पुरुष, पुरुष आणि स्त्री या दोघांचे गुण घेऊनच असतो आणि म्हणूनच तो परिपूर्ण असतो हे माझ्या वडिलांकडे पाहून जाणवले.

घरात स्त्रीच्या आयुष्यात दुसरा पुरुष असतो तो भाऊ. स्त्रीसाठी फार वेगळे असे प्रेम घेऊन येणारा. मात्र बऱ्याचदा संरक्षण या भूमिकेत अधिक जागरूक दिसणारा, धाक, बंधने घालणारा असाते. समान वयाच्या वृत्तीतून हे वागणे होते, परंतु त्याचवेळी दुसऱ्याची बहीण ही आपलीही बहीण असावी, या न्यायाला हरताळ फासताना दिसतो.

तिसरा पुरुष असतो नवरा–पती, ज्याच्यासाठी जन्मभराचा वा जन्मोजन्मीचा संबंध जोडला जातो. या व्यक्तीविषयी स्त्रीची अपेक्षा असते, पुरुषोत्तम असण्याची. हळुवारपणाने बाईला फुलवणारा रोमँटिक तरी बुद्धिमान, वात्सल्यपूर्ण, समजूतदार तरी कर्तृत्ववान अन् कामसू. परंतु प्रत्येकीच्या वाट्याला ती अपेक्षा पूर्तता करणारा पुरुष येतोच असे नाही. उलट अपेक्षा ठेवणारे, संशयी, मदत करणारे, दुय्यम स्थान देणारे, भावना न समजणारे, समजून न घेणारे, धोका देणारे, कौतुक करण्यात जीभ जड असणारे, उद्धाराची भूमिका घेणारे, अवलंबून असणारे, हक्क गाजवणारे, भोगवस्तू समजणारे, असे नाना प्रकारचे स्वभाव असणारे हे पुरुष. त्यांचा थांग लागणे कठीण, मात्र मनापासून प्रेम करणारा, आधार देणारा, स्त्रीत्व आदराने जपणारा संभाजी कदम यांच्यासारखा कलावंत निराळाच. आत्मसन्मान देणारा नामदेव ढसाळ वेगळा. परधर्म, सामाजिक विरोध यांना तोंड देणारा संवेदनशील श्रीकांत वेगळा. रझियाला कोसळण्यापासून वाचवणारा श्रीकांत मोठा ठरतो.

मुलगा, मित्र या रूपातही पुरुष स्त्रीच्या आयुष्याला व्यापणारा दिसतो. त्याच्या भूमिकेविषयीची विश्लेषणे वेगवेगळी आहेत. परमजितसारखा निखळ मित्र मिळणे ही मलिकासाठी मोठीच जमेची बाजू आहे.

'ऋतुरंग' दिवाळी अंकातील हे लेख पुस्तकरूपाने वाचकांच्या हाती देण्याचे श्रेय जाते ते संपादक अरुण शेवते यांच्याकडे. एक विषय घेऊन माणूस, नाते, संस्कृती यांचा शोध घेत जाण्याची त्यांची उत्कंठा वाचकांना गेली पंचवीस वर्षे खिळवून आहे. प्रस्तुत लेखसंग्रह हा त्याच रांगेत बसणारा आहे. आपल्याला दिसलेला 'पुरुष' हा वेगवेगळ्या भूमिकेत वावरणारा असेल, परंतु त्याचे माणूसपणे कसे भावले, उमगले हे उत्कटपणे मांडले आहे. जीवनाचा धावता आढावा त्यातून घेतल्याचे जाणवत राहते. आशयाला थेट भिडल्याने अस्सल अनुभवांची शिदोरी वाचकांच्या हाती आली आहे. रानडे, कानिटकर, दुर्गाबाई, ना.सी. फडके, खलिन जिब्रान, मर्ढेकर, विंदा यांच्या संदर्भांनी लेखांच्या सौंदर्यात भर घातलेली आहे.

प्रत्येक लेखाच्या सोबत रेखाचित्र दिलेले आहे. शीर्षकाच्या आशयाशी जुळणारे. तसेच चिनार वृक्षाचे बहुरंगी पान मुखपृष्ठासाठी साकारलेले आहे. एका लोलकातून हे रंग कसे भासतात, ही कल्पना अंतरंगात डोकावण्यास उद्युक्त करणारी आहे. सतीश भावसारांनी ही उत्तम रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ साकारलेली आहेत.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रुपये**




## 'आयुर्वेदिक उपचारांनी रुग्णांचे हृदय सशक्त होण्यास मदत होते!'

–अत्याधुनिक निकषांवर आधारित रॅन्डमाईज्ड कंट्रोल ट्रायलचा निष्कर्ष*

दम लागणे, रोजचे काम करताना छातीत वेदना होणे, चक्कर येणे, पावले तसेच पायांवर सूज येणे, मधूमेह, हाय ब्लडप्रेशर, ब्लॉकिजेस, वाढलेले वजन अशी काही लक्षणे असल्यास खात्री करुन घ्या.

*For detailed information visit goo.gl/UZ1GwN

**'नववर्षा'च्या निमित्ताने करा दृढ निश्चय हृदयस्वास्थ्याच!**

- Mission 'Save My Heart' initiative by Vaidya Sane Trust -

### कार्डीॲक रिस्क असेसमेंट

तपासणी अंतर्गत:
इ सी जी, ब्लडप्रेशर,
आर बी एस (रँडम ब्लड शुगर)
एस पी ओ 2, बी एम आय

~~₹450~~ फक्त ₹150*

### कार्डीओ असिस्ट चेक-अप

तपासणी अंतर्गत:
कॉम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट, इ सी जी,
ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर),
एस पी ओ 2, बी एम आय

~~₹2450~~ फक्त ₹750*

सोबत एक्सपर्ट डॉक्टर्सचे कन्सल्टेशन आणि डाएट चार्ट

**माधवबागची वैशिष्ट्ये:**

| | | | |
|---|---|---|---|
| अत्याधुनिक व शास्त्रीय संशोधनातून सिद्ध झालेले आयुर्वेदीक विनाशस्त्रक्रिया उपचार. | उपचारांची उपयुक्तता आणि परिणामकारकता यांच्या क्लिनिकल टेस्ट तज्ज्ञ कार्डिओलॉजिस्टनी यशस्वीरित्या घेतल्या आहेत. | या उपचारांमध्ये लाखो रुग्णांसाठी गुणकारी ठरलेल्या आयुर्वेदीक वनौषधी असलेली दर्जेदार औषधे वापरली जातात. | माधवबाग क्लिनिकमध्ये अनुभवी डॉक्टर्स रुग्णांच्या उपचार आणि प्रकृती सुधारणेसाठी तत्पर असतात. |

अपॉइंटमेंटसाठी आजच मिस कॉल द्या:

**022-33494950**

किंवा लॉग-इन करा www.madhavbaug.org

माधवबाग™

व्हॉटएव्हर इट टेक्स

'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा. मिस्डकॉल नं. 022-67715442

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

उन्नती

सारस्वत बँक
मिले यहाँ, दोनो जहाँ
100 Years Young

यशाची शाश्वती,
सोबत असता
'उन्नती'!



## उन्नती व्यवसाय कर्ज

**कर्ज मर्यादा:**

- व्यावसायिक आणि छोटे व्यवसाय (उत्पादक) ₹५० लाख
- व्याज दर: ११.५०%*
- महिला **उद्योजिकांना** व्याजदरात ०.१०% सवलत

*नियम व अटी लागू.

**अधिक माहितीसाठी ९०२९ ०५० ०३२ वर मिस्ड कॉल द्या.**

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

देशातील सर्वात मोठी सहकारी बँक

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.